म. ग्रं. सं. ठाणें
विषय प्रवास
सं. क्र. ६०

स्वस्तिक वाचनालय
क्रमांक
नौपाडा-

38

REFBK-0020310

# माझी तीर्थयात्रा भाग २

## हिमालयांतील
## श्रीपशुपतिनाथाची यात्रा
## ...साच्या नकाशासह

लेखक:- गोविंद हरी फडके

HOME ... LIBRARY
No. ........
NAUPADA, THANA
20390




REFBK-0020310

या यात्रेचे क्लेश कसे निवारण करावे हें या पुस्तकांत मुद्दाम सांगितलें आहे
...ब हें पुस्तक विकत घ्यावें म्हणजे फारच उपयोग होईल. वाचल्यानें घरीं
...ून यात्रेचें पुण्य मिळेल.

...च्या नकाशा सुद्धां किं. दहा आणे. सुटा नकाशा किं. ४-. यात्रेकरूनी सुटा नकाशा अवश्य घ्यावा

पुस्तकें मिळण्याचें ठिकाणः—

गोविंद हरी फडके, (लेखक,)

मुक्काम व पोष्ट नेरळ, जिल्हा कुलाबा.

# माझी तीर्थयात्रा.

## भाग दुसरा.

हिमालयांतील

श्री पशुपतिनाथाची यात्रा.

प्रवासाचे नकाशासह.

ग्रंथकार

गोविंद हरी फडके.

आवृत्ति पहिली.

सन १९२६.

किंमत दहा आणे. सुटा नकाशा दोन आणे.

व्ही. पी. चार्जसह ८१५.

APTE HOME LIBRARY
No.
NAUPADA, THANA.
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
नौपाडा शाखा.
अ. क्र.
क्रमांक,
नों. दि.

हें पुस्तक मुंबई येथें गिरगांव खटाव मकनजीचे वाडींत
**मोरेश्वर चिंतामण लेले** यांनीं आपल्या विक्रम
छापखान्यांत छापलें.

व

**गोविंद हरी फडके** यांनीं नेरळ जिल्हा-कुलाबा येथें प्रसिद्ध केलें.

सर्व हक्क कर्त्यानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.

No............
NAUPADA. THANA.

# हें पुस्तक कसें आहे ?

हें सांगण्याचें कारण नाहीं. वाचल्यावर समजेल हें खरें आहे. पण हल्लीं पुष्कळ पुस्तकें निघत असून वाचकांना तीं वाचण्याला सवडच नाहींशी झाली आहे. त्यांतल्यात्यांत जी सवड मिळेल, तींत आपल्याला उपयुक्त अशीं कोणतीं पुस्तकें आहेत, हें त्यांच्या बाह्य स्वरूपावरून व नांवावरून ओळखणें अगदीं कठीण झालें आहे. कोणालाही नीटनेटकेपणा किंवा व्यवस्थितपणा नको आहे असें नाहीं, पण आंगीं विशेष गुण नसतां केवळ नटवेपणा करून लोकांस भुलविण्याची हल्लींची पद्धति शिष्टांस मान्य नाहीं. या चढाओढींत वाईटाबरोबर चांगलेंही त्याज्य होऊं नये, ह्मणून मी आपल्या पुस्तकमालेला हें सदर जोडलें आहे.

पुस्तकाची योग्यता समजण्यास पुस्तकांत जो विषय प्रतिपादिला आहे, तो जाणणाऱ्या मनुष्याच्या अभिप्रायाची जरूरी आहे. हें पुस्तक भारतीय यात्रांसंबंधींचें आहे, तरी त्यांत प्राचीन व आर्वाचीन इतिहास भूगोल, भरतखंडाविषयीं प्राचीन व आर्वाचीन माहिती, हीं यात्रेच्या धोरणांनीं आलीं आहेत. त्याविषयीं मत देण्यास भारतखंडाबद्दल ज्यांनीं अभिमानानें आजपर्यंत फार परिश्रम केले आहेत अशांचेच अभिप्राय दिले आहेत. त्यावरून व ग्रंथाची प्रस्तावना व अनुक्रमणिका यांवरून पुस्तकाची योग्यता कळेल. व तें वाचून त्यांची खात्री होईल. व हें पुस्तक आबालवृद्ध स्त्रीपुरुषांच्या संग्रहास योग्य आहे किंवा नाहीं तेंही ठरेल.

या पुस्तकाच्या उपसंहारांत जी माहिती दिली आहे त्यावरून हा ग्रंथकर्ता धार्मिक वृत्तीचा नसून नास्तिक वृत्तीचा किंवा सुधारक

असावा असें वाटेल परंतु ही चूक आहे. वाणी आपल्या तराजूची पूजा करितो, पेढीवाले पेढीची, व्यापारी आपल्या वह्यांची, नावीक समुद्राची व गलबतांची, सोनार आपल्या शेगडीची, यंत्रवाले यंत्राची, गोवारी गाईची, व सेनापति आपल्या निशाणाची व हत्याराची, स्वयंपाकीण बाई आपल्या चुलीची, अशी जो तो आपल्या व्यवसाय साधनाची त्यास तितक्यापुरतें आरंभीं देवत्व मानून यशाकरितां पूजा करितो. तसेंच शेतकरी आरंभीं आपल्या नांगराची व शेवटीं शेत कापण्याचे वेळीं शेताजवळ एका दगडाला शेंदूर फांसून अप्रत्यक्षपणें शेताची पूजा करितो व त्याला नारळ फोडितो, व मग शेतकापणीस लागतो. ह्या गोष्टी आजही आपण प्रत्यक्ष पाहातों. सारांश, कोठून तरी कृतज्ञताबुद्धि दाखविण्याची चाल ही मनुष्यस्वभावानुसारच आहे. श्रीकृष्णानें सुद्धां इंद्राला देव न मानितां गोवर्धनाला देव मानून त्याची पूजा केली होती, हें प्रसिद्ध आहे. अशा करण्यानें मूळ देवाची थट्टा न होतां ती त्याची भक्तीभावाची पूजाच होते. या दृष्टीनें ज्यावेळीं शेतीची अगदीं प्रथमच उत्पत्ती झाली त्यावेळीं देव कोणाला मानावा हें माहीत नसल्यामुळें किंवा कल्पना नसल्यामुळें त्यांनीं नांगराच्या आकाराचा देव करून त्याची पूजा करून यशाकरितां त्याची करुणा भाकली तर यांत काय वावगें आहे ? देव कशांत नाहीं ? तो “ **स्थिरचर व्यापुनि दशांगुलें उरला आहेच.** ”

आतां पिंडीचाच आकार त्यांना कां आवडला ? याचें कारण शंकराच्या पिंडीची रचना व नांगराची रचना सारखीच दिसते. वरील भाग म्हणजे शाळुंका, हें रुमण्यासारखें; जेथून पाणी पडतें तो भाग जोकडास बांधावयाच्या दांड्याचा व खालचा भाग जमिनींत गेलेला असतो तो नांगराच्या फाळासारखा असें स्पष्ट दिसतें. ह्या अवस्वारोप

नाहीं. सारांश, अशानें आपण त्या नांगराची पूजा न करितां या साधनानें त्या इष्ट देवतेचीच पूजा करितों असें होतें. रावबहादूर चिंतामणराव वैद्य यांच्यासारख्या विद्वानानें सुद्धां ही कल्पना ग्राह्य करण्यासारखी आहे, असेंच आपले अभिप्रायांत म्हटलें आहे. सबब तोच अभिप्राय प्रथम देतों.

भारताचार्य **चिंतामण विनायक** ऊर्फ **नानासाहेब वैद्य**
यांचा अभिप्राय:—

राजेश्री गोविंद हरी फडके राहणार नेरळ यांचें दुसरें पुस्तक "श्री पशुपतिनाथाची यात्रा, माझी तीर्थयात्रा भाग २ रा" मी समग्र वाचून पाहिलें. प्रवासवर्णन हें नेहमीं मनोरंजक असतेंच. आपल्या धार्मिक स्थळांचें **बद्रीनाथ, नेपाळ, पशुपतिनाथ**, अशा बिकट स्थळांचें वर्णन हिंदु धर्मीयांस मनोरंजक असलेंच पाहिजे. याशिवाय फडके यांची थोडीशी काव्यदृष्टी असल्यानें त्यांच्या वर्णनास मनोरंजकत्व आलें आहे. अशा दुर्गम प्रदेशांत प्रवास कसा करावा? याविषयींच्या त्यांच्या अनुभवसिद्ध सूचना त्या यात्रांचा प्रवास करूं इच्छिणारांस फार महत्वाच्या आहेत. **आपल्या वैदिक व पौराणिक देवकथांविषयीं उपसंहारांत दिलेल्या कल्पनाही कित्येक ग्राह्य करण्यासारिख्या आहेत.** तात्पर्य हें पुस्तक नव्या व जुन्या चालीच्या मताच्या सर्व लोकांस वाचनीय झालें असून आपले विचार व आपली माहिती राजश्री फडके यांनीं लोकांसमोर मांडली आहे, त्याबद्दल त्यांचे आभार मानणें योग्य आहे. या प्रवासवर्णनानें मराठी वाङ्मयांतही एक उपयुक्त व चित्ताकर्षक भर पडली आहे.

मुंबई ता. ३-२-२७. **चिंतामण विनायक वैद्य.**

---

दुसरे अधिकारी गृहस्थ रावबहादूर काशिनाथ नारायण उर्फ बाबासाहेब साने यांचा अभिप्राय थोडा लांब आहे. पण तो त्यानीं मुद्दाम दिल्यामुळें देत आहे.

## २

## रावबहादुर **काशिनाथ नारायण** ऊर्फ **बाबासाहेब साने**

यांचा अभिप्राय:—

" माझी तीर्थ यात्रा भाग पहिला " या पुस्तकांत हिमालयांतील यात्रांचें म्हणजे श्री केदारनाथ, बद्रीनाथ, जम्नोत्री, गंगोत्री, इत्यादिक यात्रांचें वर्णन राजश्री गो. ह. फडके यांनीं मागें केलें त्यांत श्री पशुपतिनाथ यांची यात्रा प्रविष्ट करितां आली नाहीं. कारण पशुपतीश्वर हें देवस्थान नेपाळच्या स्वतंत्र राज्यांत असल्यामुळें तेथें जाण्यास त्या सरकारचा परवाना घ्यावा लागतो. परवान्याशिवाय तेथें पाहिजे तेव्हां प्रवेश करितां येत नाहीं. आणि ह्या कारणांमुळें ती यात्रा त्यवेळीं वगळावी लागली. पशुपतिनाथाची यात्रा झाल्याशिवाय केदारनाथाची यात्रा परिपूर्ण होत नाहीं, म्हणून पशुपतिनाथास जाणें अत्यंत आवश्यक आहे. मात्र महाशिवरात्रीस तेथें कोणासही जाण्यास मुक्तद्वार असतें. सोळासतरा दिवस म्हणजे माघ वद्य ५ पंचमीपासून फाल्गुन शुद्ध ७ मीपर्यंत ही सवलत असते. ती संधि साधून पशुपतिनाथाची यात्रा करणें सोईस पडतें. अशा महाशिवरात्रीच्या मुक्तद्वारांत रा. फडके यांनीं ती यात्रा संपादिली. नेपाळ म्हणजे हिमालय प्रदेशाचाच भाग आहे. आणि ह्या यात्रेचें वर्णन पहिल्या भागांतच येणें इष्ट होतें. म्हणजे हिमालयांतील सर्व यात्रा एकत्र आल्या असत्या. परंतु वरील कारणानें ही यात्रा त्यावेळीं देणें राहिली.

भाविक यात्रेकरू असो वा इतर देशपर्यटण करणारा असो, त्यास ह्या दुसऱ्या भागाचा बहुत उपयोग होणारा आहे. मार्गांत अडचणी कोणत्या? व त्या कशा टाळतां येतील अशाविषयीं उपयुक्त सूचना रा. फडके यांनीं जागोजाग केल्या आहेत. नेपाळ देशाचें आणि तेथील लोकांचें वर्णनही चांगलेंच साधलें आहे. देवस्थानचें वर्णन, तेथील पुजारी, पशुपतिनाथाची पूजा, दक्षिणी पुजारी, त्यांचें वेतन, इत्यादि गोष्टींचें कथन करून त्या देशांत उत्पन्न होणारे पदार्थ, कस्तुरी, हत्ती, जिवंत शाळिग्राम इत्यादिकांचें वर्णन ह्या भागांत पाहण्यास सांपडेल. मार्गाचा हातनकाशा पुस्तकास जोडल्यानें फार सोयीचें झालें आहे. यावरून मुक्कामांच्या जागा व मधील अंतरें कळतील. तसेंच उतरण्याच्या सोयी आणि अडचणी इत्यादि सर्व नोंदून ठेवल्यानें सामान्य प्रवासी व यात्रेकरू या दोघांसही तें फार सोयीचें झालें आहे.

अशा प्रकारचें हें पुस्तक फार उपयोगी आणि मनोरंजक झालें आहे. अशीं प्रवास वर्णनें मराठींत फार थोडीं, करितां त्यांचा संग्रह लोकांनीं अवश्य करावा. अशी या पुस्तकाची योग्यता आहे.

रा. फडके यांचा " माझी तीर्थयात्रा भाग ३ रा " यांत हिंदुस्थानच्या दक्षिण भागांतील यात्रांचें वर्णन यावयाचें आहे. तो भागही असाच उपयुक्त आणि चित्तवेधक होईल अशी खात्री वाटते. असो या दुसऱ्या भागास लोकाश्रय चांगला मिळावा अशी इच्छा प्रगट करून हा माझा अभिप्राय संपवितों.

कल्याण.<br>
ता. ६-१-२७

काशिनाथ नारायण साने.

आणखी एक भारतीयांविषयीं स्वाभिमानानें विचार करणारे श्री. नारायण भवानराव उर्फ नानासाहेब पावगी यांचा अभिप्राय देतों.

३

## श्री. नारायण भवानराव उर्फ नानासाहेब पावगी

यांचा अभिप्राय:——

१ आपलें कृपापत्र व त्या समवेत आलेला "माझी तीर्थ यात्रा भाग २ रा" दाखल झाला. तो तारीख ३–१२–२६ रोजीं दुपारीं मला पावला.

२ हें पुस्तक हातीं येतांच तें मीं अथपासून इतिपर्यंत वाचून पाहिलें. आणि आपल्या उद्योगतत्परतेबद्दल मला खरोखर मोठें कौतुक वाटलें.

३ इतकी निरलसता, स्वदेशविषयक प्रेम, श्री परमेश्वराचे ठिकाणीं भक्ति व भाव आणि स्वकीयांसंबंधानें पूर्ण आस्था क्वचितच दृष्टीस पडते.

४ यात्रेकरूंची शक्य तितकी सोय होऊन पुढें येणाऱ्या अडचणी त्यांस अगाऊ कळाव्या, एवढेंच नव्हे, तर त्या दूर कोणत्या प्रकारानें होतील व तन्निमित्त कोणते उपाय योजले असतां यात्रा सुगम आणि सुखकर होईल, हें देखील आपण काळजीपूर्वक सुचविलें असल्यानें आपल्या श्रमांचें चीज आपण हा दुसरा यात्रा भाग लिहून केलेंत, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

५ आपली निरीक्षण लालसा, उत्कट असल्यामुळें ठिकठिकाणच्या गैरसोयी, स्थल–विशेषांतील गरजा, त्या भागविण्याविषयीं

तजाविजींचे मार्ग, अथवा त्या भासमानच होऊं नयेत, एतदर्थ सिद्ध ठेवावयाची सामग्री, नकाशांतर्गत अडचणीचे मार्ग, मुक्कामाच्या जागा, इत्यादींचेंही आपण विवेचन केल्या कारणानें आपल्या या पुस्तकाची योग्यता खचितच वाढली आहे.


६ ठिकठिकाणचे देखावे, रीतिरिवाज, पोषाख व पेहेराव, समाजाची स्थिती, निसर्ग–सौंदर्य, आणि त्याचा महिमा, श्रीपशुपति-नाथाचें भव्य मंदीर, तेथील पूजाअर्चा, श्रीचे भोग व दागिने, सेवक आणि पुजारी, वर्णाश्रम धर्म, राजगृह व इतर घरें इत्यादींची आवश्यक ती माहिती फार मार्मिकतेनें दिलेली आढळते.

७ एकंदरींत हें पुस्तक संग्रहणीयें आहे आणि विशेषतः तिकडील यात्रा करणारानें तर हें अवश्य आपणांजवळ निरंतर बाळगावें असें मला वाटतें.

मुक्काम पुणें, मार्गशीर्ष शुद्ध<br>
४ थी, शके १८४८<br>
गुरुवार ता. ९-१२-२६

**नाना पावगी.**

एवढें लहानसें पुस्तक वाचण्यासारखें आहे किंवा नाहीं याची परिक्षा करण्याकरितां यापेक्षां जास्त अभिप्राय कशाला? ह्मणून ते दिले नाहींत.



# अनुक्रमणिका

प्रस्तावना पान


प्रस्तावना ... ... ... ... १

दुसरा भाग नांव देण्याचें कारण ... ... २

या यात्रेंतील अडचणी ... ... ... ३


ग्रंथाचीं पृष्ठें


यात्रेकरूंचें धाडस ... ... ... २

पॅसेंजर गाडीचा उपयोग ... ... ... ३

बंगाल नॉर्थ वेस्टर्न रेलवेची माहिती ... ... ४

पडताळ्याचा फायदा ... ... ... ६

रिझर्व डब्याच्या सोई, गैरसोई ... ... ७

रेलवे प्रवासांतील मंदपणामुळें होणारे अनर्थ ... ... ८

कुर्लीचे ठराव ... ... ... १३

नकाशाचा उपयोग ... ... ... १७

प्रवासांत घेण्याच्या वस्तु ... ... ... १८

वीरगंज ... ... ... २४

हत्तींची मजा ... ... ... २५

पासपोर्ट घेणें ... ... ... २६

परमाणूपूर ... ... ... २७


शिमराबसा ... ... ... २९

मोठें जंगल ... ... ... ३०

भिक्षाथोरी ... ... ... ३१

हेटोडा, पोत्यांचे आरवाडे ... ... ... ३४

| | ग्रंथाचीं पृष्ठें |
|---|---|
| भीमफेरी; डॉक्टर तपासणी ... ... ... | ३७ |
| सीसागढी ... ... ... | ४१ |
| मारकु ... ... ... | ४७ |
| एकदंता ... ... ... | ४७ |
| चितलांग व चंद्रागढी ... ... ... | ४८ |
| थानकोट, व राजस्वारीचा थाट ... ... ... | ५१ |
| पोष्टाची सोय गैरसोय ... ... ... | ५५ |
| देव, देवस्थान व्यवस्था ... ... ... | ५८ |
| यात्रेची गडबड ... ... ... | ५९ |
| पुजाऱ्यांची व्यवस्था ... ... ... | ६३ |
| साधूंचा जलसा ... ... ... | ६५ |
| बाजार, मौल्यवान जिन्नस ... ... ... | ६६ |
| मृताची व्यवस्था ... ... ... | ६८ |
| भुते लोक ... ... ... | ७१ |
| बडोद्याच्या राजघराण्यांतील पुरुषांचें दर्शन ... ... | ७४ |
| गंडकीचें स्नान व हरिहरेश्वराचें दर्शन ... ... ... | ७४ |
| सामाजिक माहिती ... ... ... | ७७ |
| धंदे, कलाकौशल्य व सुधारणा ... ... ... | ७९ |
| पौराणिक व ऐतिहासिक माहिती ... ... ... | ८० |
| उपसंहार ... ... ... | ८१ |


खुणांचा खुलासा.
रेल्वे रस्ता
सरकारी पाण्याचे हौद
बैलगाडी सडक
धरमशाळा सरकारी
मुकामाचीं मुख्य स्थाने
शहर (राजधानी)
दोन ठिकाणामधील अंतर २ मैल
देउळ
चढावयाची टेकडी
ब्रिटिश हद्द
ने
पा
रक्सौल स्टेशन
वालुकामय प्रदेश
मोठे जंगल
नदी
तयार करणार
गोविंद हरी फडके नेरळ

टीप-

NAUPADA THANA.

# प्रस्तावना.

हिंदुस्थानांतील माझ्या बहुतेक पौराणिक यात्रा झाल्या. पण श्रीपशुपतिनाथाची यात्रा राहिली होती. ही राहण्याचें कारण हिची वेळ अगदीं नियमित आहे. नेपाळ हें स्वतंत्र राष्ट्र असल्यामुळें येथें परराष्ट्राच्या मनुष्याला बगर परवाना ( पासपोर्टाशिवाय ) जातां येत नाहीं. फक्त महाशिवरात्रीस श्रीपशुपतिनाथाच्या दर्शनास मुक्तद्वार आहे. परकीय मनुष्यास सुध्दां पासपोर्टाची जरूरी नसते. यावेळीं सुध्दां यात्रेकरूंना एक रक्सौल स्टेशन वरूनच जाणाऱ्या रस्त्याची परवानगी असते, दुसरे कोठूनही नेपाळांत शिरण्याची परवानगी नाहीं. ही यात्रा हिमालयाच्या मध्यावर दोन रांगांच्या अगदीं मधोमध आहे. जवळ आसपास, पण थोडी लांब एव्हरेस्ट सारखीं बर्फयुक्त गिरिशिखरें आहेत. हिमालयाचा, गंगोत्रीचा मला अनुभव आहे. तेथें माघ महिन्यांत बर्फाशिवाय चिटपांखरूंही नसतें. ज्येष्ठ आषाढांत गेलें तरी तेथील थंडी असह्य असते मग इकडे माघ महिन्यांत गेल्यास थंडी करितां काय तयारी करावी लागेल हें कांहीं समजेना, म्हणून कांहीं ग्रंथोक्त माहिती पाहिली. यात्रेकरू जाऊन आले होते त्यांस विचारलें. थंडी, पाऊस, वारा, जाण्याचा रस्ता, उतरण्याच्या सोई, वाटेंत येणाऱ्या, स्थानिक, ऋतुपरत्वें, परराष्ट्राच्या किंवा स्वतंत्रराष्ट्राच्या अडचणी कोणत्या आहेत, त्यांचें निवारण कसें करावें, या यात्रेंत विशेष लक्षांत ठेवण्याजोग्या गोष्टी कोणत्या, शारीरिक मानसिक व इतर काय तयारी केली पाहिजे, हिची मुख्य यात्रेंत गणना कशामुळें झाली, केदारेश्वराच्या यात्रेचा या यात्रेशीं संबंध जोडण्याचें कारण काय, वगैरे प्रश्न विचारीत असें. पण कोणाकडूनही समाधानकारक

उत्तरें मिळालीं नाहींत. थंडी, पाऊस, वारा फार नसतो, तुमच्या चौकशाच फार ! ही महायात्रा आहे, हजारों यात्रेकरू जातात, त्यांत तुह्मीं जाल. अशीं तुटक व तुसडेपणाचींही उत्तरें कांहींकडून मिळालीं ! यात्रेची किंवा प्रवासाची आगाऊ माहिती झाल्यास यात्राक्लेश सह्य होऊन यात्रेंत कोणत्या गोष्टींकडे विशेष लक्ष ठेविलें पाहिजे याचा अजमास लागतो व मग यात्रा किंवा प्रवास सुखावह होऊन तो ज्ञानदायकही होतो, वगैरे सांगणें त्यांना मुळींच रुचत नसे. अर्थात अशा मनुष्यांशीं न बोलणें हेंच उत्तम.

या यात्रेची जाण्यायेण्याची संक्षिप्त हकीगत १५।१६ पृष्ठांत देऊन तीं पृष्ठें पहिल्या भागाची पुरवणी ह्मणून पहिल्या भागास लावावीं असा माझा प्रथम मनोदय होता; परंतु लिहितांना तशा वर्णनानें माझ्या पध्दतीनें माझें समाधान होईना. ह्मणून हें स्वतंत्र पुस्तक करून त्यास भाग २ असें नांव देऊन तें अगोदर छापणें प्राप्त झालें. अर्थात आतां **दक्षिण हिंदुस्थानच्या यात्रेला भाग ३** हें नांव मिळेल. हाही भाग सवडीप्रमाणें लवकरच छापवूं.

श्रीपशुपतिनाथाची यात्रा स्वतंत्र आहे, केदारबद्रीवर हवाला देण्यासारखी नाहीं. तेव्हां हिची अशी हेळसांड होतां कामा नये ह्मणून हा विस्तार केला आहे. पण असे विस्तार कितीही वेळां वाचले तरी ते सर्व लक्षांत राहून, नकाशा नसला तर प्रत्यक्ष प्रवासाची कल्पना येत नाहीं. स्केलवर नकाशा बसविल्यास रस्त्याचीं वळणें व अंतरें समजतात पण यात्रेंत तो मुख्य विषय नसतो. रस्त्याचें स्वरूप व मुख्यत: उंची यांची माहिती असणें जरूर आहे, ह्मणून या सोबत सप्रमाण हातनकाशा जोडला आहे त्यांत ही माहिती देऊन विशिष्ट मुक्काम अंतरासुध्दां दिले आहेत, व तेच मुक्काम पुस्तकाचे शेवटीं

दिले आहेत. हा नकाशा ह्या पुस्तकावरून एकदां नीट समजून घेतला ह्मणजे हा खिशांत ठेऊन पाहिजे तेथें सोईस्कर जागीं आपण मुक्काम करावा. या नकाशाचे योगानें आपण आलें किती, जाणें किती आहे, पुढें रस्ता कसा आहे, व मुक्कामाला पोंचण्यास दिवस किती राहिले, याचा आपल्या चालीवरून चांगला अजमास करितां येतो. हा नकाशा पाहण्याकरितां वारंवार पुस्तक उघडण्याची पाळी येऊं नये ह्मणून हे नकाशे मुद्दाम जास्त काढले आहेत, व त्याची किंमत अगदीं थोडी ह्मणजे केवळ दोन आणे ठेविली आहे. उपयोगाचे मानानें यात्रेकरूला ही किंमत ह्मणजे कांहींच नाहीं. तरी प्रत्येक यात्रेकरूनें प्रवासाचे वेळीं याचा अवश्य संग्रह करावा.

ही यात्रा मागील हिमालयाचे यात्रेप्रमाणें कठीण नाहीं. भाषा हिंदुस्थानी, क्वचित मराठीहि चालते. भाषेची अडचण फारशी पडत नाहीं. थंडी, वारा, पाऊस, यांचा त्रास नसतो ह्मणजे हीं त्रासदायक नसतात. त्रास फक्त पुढील गोष्टींत आहे:--

१ ठिकठिकाणीं यात्रेकरूंकरितां चट्टया नसतात, क्वचित एक-दोन ठिकाणीं आहेत.

२ धर्मशाळा पुरेशा नाहींत. यामुळें यात्रेकरूला आश्रयार्थ रात्रीं स्थानिक लोकांचीं घरें शोधावीं लागतात, आणि तीं भरलीं ह्मणजे पंचाईत होते.

३ मुक्काम लांब लांबचे आहेत. कांहीं ठिकाणें अशीं आहेत कीं, मध्यें ८।१२ मैल मुक्काम करितां येतच नाहीं.

४ नियमित काळांत नियमित अंतर गेलेंच पाहिजे. याकरितां वृध्द व अशक्त यात्रेकरूंनीं माघ वद्य ३ ला संध्याकाळपर्यंत वीरगंजाला हजर असावेंच. ह्मणजे शिवरात्रीचे आदले दिवशीं त्यांस श्रीपशुपतिनाथाचें अनायासें दर्शन होईल.

५ काशीपासून रक्सौल पर्यंतचा रेल्वे रस्ता, मध्यें गाड्यांची चुकाचूक झाली नाहीं तर, किंवा पडापड झाली नाहीं तर, चोवीस तासांचा आहे. गाड्या प्राय: सकाळीं, संध्याकाळीं व रात्रीं अशा असतात. ह्मणजे एक गाडी चुकली किंवा लेट झाली तर निदान सहा तासांशिवाय दुसरी गाडी मिळत नाहीं. ह्मणून काशीहून निदान माघ वद्य २ ला तरी निघावें. सशक्त व माहितगार यात्रेकरू वद्य ६ ला काशीहून निघाला तरी चालतो. पण आपण त्याच्या नादीं लागूं नये. त्यास रोज २० मैलप्रमाणें अविश्रांत चालावें लागतें !

६ ज्याला भाकरी किंवा पोळीची संवय असेल त्यानें आपल्याजवळ निदान २।३ दिवसांचें तरी तशा प्रकारचें पीठ बाळगावें. वाटेंत क्वचित् ठिकाणीं पीठ मिळतें.

७ पान—तंबाकु, मेतकूट, लोणचें, आटीव किंवा गोठलेलें दूध वगैरे आपल्या आवडीचे पदार्थ बरोबर घ्यावे.

८ परत येण्याची मुदत फार थोडी आहे यामुळें स्थानिक माहितीचा तपास करितां येत नाहीं.

९ कांहीं ठिकाणीं गांवकऱ्यांस आपले घरीं उतारू घेण्याची सक्त मनाई आहे, यामुळें उतारूंस त्रास होतो.

१० दुर्बीण, कॅमेरासारखीं यंत्रें नेणें त्रासदायक असतें. कोठें झडतींत हीं सांपडल्यास झडतीच्या अंमलदारास ह्यांत कांहीं पोलिटिकल मतलब आहे कीं काय, असा संशय येतो.

पुस्तकांत चित्रें घातल्यानें त्यास विशेष शोभा येते पण त्यामुळें खर्चा किंमतही वाढवावी लागते. अंदाजापेक्षां किंमत वाढल्यास सामान्य लोक बूक घेण्यास नाखुष असतात. आणि हीं पुस्तकें तर सामान्य लोकांकरितांच मुद्दाम लिहिलीं आहेत ह्मणून यांत फारशीं

चित्रें घातलीं नाहींत. तरी मुख्य पशुपतिनाथाच्या देवळाचें, निदान त्याच्या कळसाचें तरी चित्ररूपानें दर्शन, भाविकांना होणें जरूर आहे. तसेंच महाशिवरात्रीचा व वाघमती, गंगेचा उत्सव त्यांच्या मनास पवित्र करण्यास त्याचें निदान चित्र तरी देणें जरूर आहे, असें वाटल्यावरून तीं चित्रें मुद्दाम दर्शनींच दिलीं आहेत. सदर चित्रें फोटोचीं दिल्यास त्यांत सर्व भागांचा उलगडा होत नाहीं, असें पहिल्या भागावरून नजरेस आल्यामुळें हीं वर्णनाप्रमाणें लिथोचीं चित्रें दिलीं आहेत. तसेंच प्रवास–वर्णनांत नकाशा दिला नाहीं तर तें वर्णन फुकट जातें; म्हणून अनुभवास येईल; किंवा समजूत पटेल, रस्त्याची, चढउताराची व लांबीची कल्पना येईल असा सोयीचा तो दिला आहे. नकाशांत दोन ठिकाणांत अंतर दाखविणारे मैल दिले आहेत, व शेवटच्या परिशिष्टांत प्रत्येक ठिकाणचे रक्सौल रेल्वे स्टेशनपासून मैल दिले आहेत. ह्मणजे रेल्वे स्टेशनपासून आपण किती लांब आलों किंवा परत जातांना तें किती लांब राहिलें, हें त्यावरून समजेल. मुक्तिनाथ व दामोदर कुंड यांचा रस्ता चंद्रागढी उतरून गेल्यावर, थानकोटपासून फुटतो. मुक्तिनाथास कदाचित् माही शिमग्यांत जातां येतें पण दामोदरकुंड ह्मणजे जेथें गजेंद्रमोक्ष झाला, ज्यांत खरे जिवंत शालिग्राम सांपडतात, व जेथून गंडकीचा उगम आहे, तें हिमालयाच्या अगदीं शेवटच्या ह्मणजे उत्तरेच्या बर्फयुक्त रांगेंत असल्यामुळें तेथें गंगोत्री–जम्नोत्रीप्रमाणें ज्येष्ठअखेर बर्फ वितळण्याचे सुमारास निघावें लागतें आणि त्याची तयारी पहिल्या भागांतल्या प्रमाणेंच नेपाळांतून करावी लागते. नियमित मुदतीपलीकडे यात्रेकरूस राहतां येत नाहीं यामुळें दामोदरकुंडाची यात्रा नेपाळांत राहणाऱ्या गोसाव्या बैराग्यांशिवाय किंवा तशी सरकारची मुद्दाम परवानगी

घेतल्याशिवाय होत नाहीं. मुक्तिनाथाचा रस्ता निराळा व तें स्थान नकाशाच्या शेवटीं दत्तस्थानापलीकडे दाखविलें आहे. यावरून वाचकांचा घोटाळा होईल. पण बर्फाच्या रांगा श्रीपशुपतिनाथापासून उत्तरेस किती लांब आहेत हें दाखविण्याकरितांच ती योजना आहे. आणि त्या बर्फाच्या रांगेच्या पायथ्याशीं दामोदरकुंड असून तो रस्ता चंद्रागढीपुढें थानकोटपासून गंडकीचे काठानें जातो, हें दाखविण्याकरितां थानकोटपासून हा फाटा फोडला आहे.

नेपाळांत किंवा त्याच्या आसपास प्लेग, कॉलरा, देवीसारखे सांथीचे रोग उत्पन्न झाले असल्यास, त्यावर्षीं यात्रा बंद असते. नेपाळ सरकारकडून त्यावेळीं यात्रेस परवानगी मिळत नाहीं. ह्मणून यात्रेची परवानगी आहे किंवा नाहीं याची चौकशी काशीस करावी. तेथें पंड्याकडे ही माहिती मिळते. निदान तो खातरीचा तपास करून आणून देतो. तसेंच रेलवे रस्ते सुरक्षित आहेत किंवा नाहींत कोणता सुरक्षित आहे याची चौकशी करून मग पशुपतिनाथावर भाव धरून निघावें.

पहिला भाग लोकांना आवडून बहुतेकांनीं दुसऱ्या भागाची मागणी केली त्यांना हा भाग लवकर देतां यावा ह्मणून अगदीं खात्रीच्या व भरंवशाच्या मनुष्याजवळ हा भाग छापण्याकरितां दिला पण परमेश्वरी इच्छा तशी नसल्यामुळें नसतीं विघ्नें व अडचणी उत्पन्न होऊन हें अगदीं लहानसें काम विनाकारण एक वर्षपर्यंत कुचंबत पडून राहिलें ! आणि लवकर मिळण्याच्या ऐवजीं हें पुस्तकच हातीं येतें किंवा नाहीं किंवा त्याचा हस्तलेख तरी परत मिळतो किंवा नाहीं याचीच काळजी पडली होती ! ! पण आतां तें कसें तरी सुखरूप-

पणें हातीं आल्यामुळें त्याची वाच्यता करण्यांत अर्थ नाहीं ह्मणून सोडून देतों.

हें हातीं आलेलें पुस्तक पहिल्या भागाप्रमाणें आबालवृद्ध स्त्री-पुरुषांच्या उपयोगी व संग्राह्य आणि यात्रेकरूंना,—मुख्यत: मध्यम स्थितीच्या यात्रेकरूंना व धाडशी प्रवाशांना—शोधकांना उपयुक्त झालें आहे किंवा नाहीं हें ठरवावें; व हस्तें परहस्तें याला मदत करावी. ह्मणजे असें वाङ्मय बाहेर पडून वाचकांच्या चित्तांचें मन-रंजन करून त्यांच्या ज्ञानांत भर घालील. याच्या विक्रीचे पुरेसे पैसे मिळाले ह्मणजे दक्षिण हिंदुस्थानचा तिसरा भाग लवकरच प्रसिद्ध होईल.

नेरळ —जिल्हा कुलाबा,
त्रिपुरी पौर्णिमा शके १८४८
१९-११-२६

गोविंद हरी फडके,
ग्रंथकर्ता.

विभाग क्रमांक



# माझी तीर्थ यात्रा.

## भाग २ रा.

### श्रीपशुपतिनाथाची यात्रा.



**मा**झी तीर्थयात्रा भाग १ आवृत्ति १ यांतील पान १६० यांत श्रीपशुपतिनाथाची यात्रा झाल्याशिवाय हिमालयाच्या सर्व यात्रांची, विशेषेंकरून केदारेश्वराची परिपूर्णता होत नाहीं असें सांगितलें आहे. सबब सवड झाली तेव्हां म्हणजे शके १८४६ च्या माही शिवरात्रीस जाण्याचा मी बेत केला. सर्व ठिकाणची माहिती गोळा केली पण त्यानें समाधान झालें नाहीं. कारण ह्या प्रवासांत अडचणी कोणत्या येतात, व त्यांचें निवारण कसें करावें, शरीरशुद्धी उर्फ तपश्चर्या किती व कशी केली पाहिजे, वाटेंत निसर्गाची—ऋतूंची—बाधा कितपत होते, स्थानिक अडचणी काय येतात यांचा खुलासा कोणीच केला नाहीं. तरीपण मिळाली तेवढी माहिती गोळा करून व वाटेंत पुष्कळ माहितगार मंडळी

मिळेल अशा भरंवशानें तारीख ५ फेब्रुवारी १९२५ रोजीं म्हणजे माघ शु० १२ शके १८४६ गुरुवारीं प्रवासाला निघालों. इतक्या लवकर निघण्याचें कारण ह्या वर्षी माघ शु० १५ ला ग्रहण होतें. हें पर्व काशीस साधावें म्हणून निघालों. काशीस जाण्याचें दुसरें कारण ही यात्रा दक्षिणी लोकांना काशीवरूनच करावी लागते, हें आहे.

मी यात्रेस निघालों तों कल्याण स्टेशनवरच या यात्रेस सांगली मिरजच्या ११।१२ बायका एका वृद्ध गृहस्थाबरोबर निघाल्या आहेत असें दिसलें. मी त्यांना रीतीप्रमाणें यात्रेची माहिती विचारिली, पण ती मंडळी म्हणाली आम्हांला कांहीं माहिती नाहीं ! पण विशेष तपास करितां कांहीं कांहीं बायकांनीं आपआपल्यापरी एका कागदाच्या चिठोऱ्यावर शिसपेनाशिलीची माहिती लिहून घेतली होती. पण त्यांना वाचतां येत नव्हतें. मग या माहितीचा उपयोग काय ? म्हणून मी त्यांस विचारलें तेव्हां त्या म्हणाल्या, आपल्यासारख्यांस दाखवून वाचून घेऊन पुढें जावयाचें. पण पुढें मराठी भाषेचा उपयोग नाहीं मग हें कोण वाचील ? व रस्ता कसा समजेल ? तुम्हांला हिंदुस्थानी येतें काय ? म्हणून मी विचारलें, तर आम्हांला मराठीवांचून दुसरें कांहीं येत नाहीं, असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. हिमालयाची यात्रा तुमच्या कल्पनेइतकी सोपी आहे असें तुम्हांला वाटतें काय ? तुम्हीं हा काय वेडेपणा आरंभला आहे असें मी त्यांस विचारलें. पण त्यांनीं आम्हीं श्री पशुपतिनाथावर भार घालून निघालों आहों तो काय करील तें खरें, असें उत्तर दिलें. तेव्हां त्यांच्या अंधश्रद्धेची मला धन्यता वाटली. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांना श्री पशुपतिनाथ भेटून त्यांनीं त्यांची यात्रा सफल केली व तीं सुखरूपपणें घरीं येऊन पोंचलीं; व त्यांच्या ईश्वर विषयक

श्रद्धेचें त्यांना पूर्णपणें फळ मिळालें. हें कसें मिळालें हीच

**मनोरंजक गोष्ट**

या यात्रेंत आहे. त्यांचा असा दृढ निश्चय पाहून मला

**अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते ।**

ह्या भगवद्वाक्याची आठवण झाली. आणि यांचें आतां कसें होईल याचा मी विचार करूं लागलों.

श्रीपशुपतिनाथाला काशीवरून जावें लागतें म्हणून मी काशीचें तिकीट काढलें होतें. पण ही मंडळी ग्रहणाकरितां प्रयागास ( तीर्थराजाला ) जाणार होती. मला गाडी बदलण्याची वेळ आली तेव्हां त्यांनीं फार विनवून सांगितलें कीं आम्हांला घेतल्याशिवाय जाऊं नका हो ! आम्हीं ग्रहणाचें स्नान करितांच येतों. त्यांनीं आपला काशीचा पत्ता मला दिला व माझाही त्यांनीं लिहून घेतला. वाटेंत अशा बायका कधीं कधीं गाडी चुकेल म्हणून धास्तीनें स्नान करावयाच्या नाहींत किंवा तोंडांत पाणी घालावयाच्या नाहींत, व असे दोन दोन चार चार दिवसही उपास करतात. धन्य आहे त्यांची ! मोठ्या स्टेशनवर पॅसेंजर गाडी अर्धा अर्धा तास किंवा तास तास उभी असते व ती कोठें किती उभी राहते हें टाईमटेबलवरून मला माहित होतें. त्यामुळें माझे शौचविधी स्नान संध्या फराळ वगैरे पद्धतशीर होत असत हें त्यांनीं पाहिलें होतें. त्याप्रमाणें त्याहि करूं लागल्या. गाडी स्टेशनवर येतांच सर्वांना नळावर नेऊन त्यांजपाशीं मी घड्याळ ठेवीत असें व गाडी केव्हां सुटणार हें त्यांस सांगून ठेवीत असें. त्यामुळें त्यांची फारशी धांदल न होतां सर्व कार्यें उरकत. त्यांनीं आपलेबरोबर निरशनाचें फराळाचें घेतलें होतें, त्याचा त्यांनां उपयोग करतां येऊन त्यांचा प्रवास सुखावह होत चालला. यामुळें त्यांचा माझ्या बोलण्यावर विश्वास बसत चालला.

ठरल्याप्रमाणें ग्रहणानिमित्त त्यांचें **प्रयागास** स्नान होऊन ती सर्व मंडळी काशीस येऊन त्यांची व माझी भेट होऊन सर्वांस आनंद झाला. मी पुढच्या तयारीला लागलों. एकट्याचा प्रवास निराळा व समुदायाचा निराळा. सर्व यात्रेकरूंची सकाळ संध्याकाळ गंगेवर भेट व्हावयाचीच. तेथें गेलों असतां एक नागपूरचे श्रीमंत गृहस्थ आपल्या लवाजम्यानिशीं याच यात्रेस निघाले होते तेही हा प्रवास सुखावह कसा होईल याचा तपास करीत होते, त्यांची मी भेट घेतली व त्यांस कळविलें कीं बनारस कँटोनमेंट स्टेशनवर बसलें तरी ४।५ ठिकाणीं अवेळीं गाड्या बदलाव्या लागतात. सामान नेणारे तुमचे स्वत:चे गडी असले तरी प्रत्येक गाडीमध्यें सामानासुध्दां सर्वांची एके ठिकाणीं नेहमीं सोय होणें अशक्य आहे म्हणून तुम्हीं रिझर्व डब्बा करीत असाल तर मी आपले सोळा पॅसेंजरांसह तुमच्या डब्यांत येतो. त्यांचीही १५।१६ मंडळी होती मिळून ३२।३३ मंडळी झाली. डबा ४० मंडळीचा असतो म्हणून आणखी मंडळी मी पहातच होतों. पण भलतीच मंडळी मला नकोत; त्यापेक्षां ७।८ मंडळींचें भाडें मी स्वत: भरतों असें सांगून डबा रिझर्व करण्याचे ते तयारीस लागले. त्याप्रमाणें डबा मिळाला. व आमची अनायासें उत्तम सोय झाली.

हिमालयाच्या पायथ्याशीं पोंचविणाऱ्या ४।५ रेलवे कंपन्या आहेत. नकाशावर पाहिलें असतां हिमालयाच्या सृष्टिनिर्मित तटावर हे तोफांचे मोर्चेच लाविले आहेत असें वाटतें. त्या कंपन्यांपैकीं हिचें नांव B. & N. W. R. बंगाल नॉर्थ वेस्टर्न रेलवे असें आहे. ही लहान रुळाची गाडी आहे. ह्या सर्व रेलवेंच्या मुख्य लाइनी हिमालयाचे पायथ्याशीं समांतर आहेत व बाकीचे सर्व फाटे आहेत. ह्यामुळें हिमालयाच्या पायथ्याच्या कोणत्याही स्टेशनवर जाणें झालें तर ठिकठिकाणीं गाड्या बदलाव्या लागतात. ह्या रेलवेची मेन लाईन ऊर्फ मुख्य फाटा कटीहार ते अलाहाबाद

आहे; म्हणून त्या फाट्यावर कोठेंही जाणें झालें, तर गाडी बदलावी लागत नाहीं. पण आपणांस हिमालयाचे पायथ्याशींच जावयाचें असल्यामुळें फाट्याफाट्यांनीं जावें लागतें, व त्यामुळें गाड्या बदलाव्या लागतात. श्रीपशुपतीश्वरास हजारों यात्रा जाते, आणि ती मुख्यत्वेंकरून काशीवरूनच जाते, व तिचे जाण्यायेण्याचे दिवस नक्की ठरले आहेत. सबब अशावेळीं रेलवे कंपन्या थेटच्या स्पेशल गाड्या काढतात, पण ही कंपनी काढीत नाहीं. यामुळें यात्रेकरूंना ओझें घेऊन उतरण्याचा व चढण्याचा फारच त्रास होतो. शिवाय बरोबर बायकामुलें असलीं म्हणजे हमालांची कटकट होते. ते पैसे आडवून घेतात. व नियमानें ते द्यावे लागतात. कारण बदलावयाची गाडी जवळ नसते, ती बहुधा पूल उलटून पलीकडे कोठेंतरी असते. गाडी जंक्शनवर बदलते व तेथें रेलवेचीं उलाढाल बरीच असते, यामुळें आपली गाडी कोठें येतें व कधीं येते हें स्टेशन हमालाशिवाय किंवा चांगल्या माहितगार मनुष्याशिवाय समजत नाहीं. एखाद्या वेळीं दोन गाड्यांमधला वेळ दोनदोन तीनतीन तास असतो, पण एखादे वेळीं एक येण्याबरोबर दुसरी गाडी सुटण्याचे बेतांत असते, किंवा आपली गाडी उशिरां आली तर दुसरी गाडी सुटूनही जाते. अशा वेळीं घाई केली नाहीं तर निष्कारण ८—१२ तास किंवा कधीं कधीं एक दिवसही बसावें लागतें ! या बाजूला मजुरी स्वस्त असल्यामुळें या लाइनीचे दर स्वस्त आहेत. तसेच कुलींचे दरही स्वस्त आहेत. एका बोजाला अर्धा आणा आहे. सबब जरूर तर कुलीकरितां नित्यनेमानें निराळाच बोजा बांधून ठेवावा, व लहान लहान बोजे आपण घेऊन त्याच्याबरोबर चालावें. श्रीपशुपतीश्वरास जाण्यास प्रथम नेपाळची राजधानी काटमांडू येथें जावें लागतें. नकाशावरून पाहिलें असतां काटमांडूला जवळचें स्टेशन भिकनाथोरी आहे असें दिसतें. पण येथून काटमांडूला किंवा नेपाळ शहरास जाण्यास सोईचा रस्ता नाहीं;

तो रक्सौल स्टेशनपासून आहे. टपालही याच मार्गानें जातें, म्हणून श्रीपशुपतीश्वरास जाण्यास शेवटचें रेल्वे स्टेशन रक्सौल हेंच आहे. काशीवरून येथें येण्यास दोन मार्ग आहेत. एक भटनी, गोरखपूर व नरकटिया जंक्शनवरून रक्सौल, व दुसरा गाझीपूर, सोनीपूर, मुझफरपूर, सगोलीवरून रक्सौल. दुसऱ्यापेक्षां पहिला थोडा जवळ आहे व त्यांत थोडे ठिकाणीं गाड्या बदलाव्या लागतात म्हणून सर्वांनीं तोच मार्ग पसंत केला आहे. पण आम्हीं ज्यावेळीं गेलों त्यावेळीं पहिल्या फाट्यावरील गंडकीचा पूल पडल्यामुळें गोरखपूरचा फाटा बंद होता, हें आम्हांस काशीस कळलें होतें; यामुळें आह्मीं मुझफरपूरच्या मार्गानें गेलों, पण कांहीं लोक आपल्या माहितीच्या घमेंडीनें गोरखपूर मार्गानें गेले त्यांमुळें त्यांना नदी उतरण्याचा त्रास पडला, एक दिवस थंडीनें कुडकुडत उघड्या रस्त्यावर राहावें लागलें व शेवटीं उशीर झाल्यामुळें शिवरात्रीस श्री पशुपतीश्वराचे दर्शनास त्यांस अंतरावें लागलें ! सारांश आपल्याला कोणतीही गोष्ट माहीत असली तरी तिचा पडताळा स्थानिक लोकांपासून घेत जावा. फारतर एक दोघांना विचारण्याऐवजीं ४-५ जणांना विचारावें व आपली माहिती निश्चित करून घ्यावी, ह्मणजे असला अनवस्था प्रसंग येणार नाहीं. तसेंच मार्ग निश्चित झाल्यावर रेल्वेचें चालू टाईमटेबल पाहून कोठेंकोठें गाड्या बदलाव्या लागतात तें ठरवावें. नंतर रक्सौलला दिवसाउजेडीं जी गाडी जात असेल तिच्या हिशोबानें काशीच्या बनारस कँटोनमेंटच्या स्टेशनवर कोणत्या गाडीनें निघावें हें ठरवावें व त्याप्रमाणें निघावें. आह्मीं संध्याकाळच्या गाडीनें रक्सौलला पोंचल्यामुळें रहाण्याचा किंवा वस्ती करण्याचा फार त्रास पोंचला. अनोळखी ठिकाणीं अवेळीं कधीं जाऊं नये. बनारस कँटोनमेंट स्टेशनपासून एकदम रक्सौलचें तिकीट घ्यावें व तें तसें मिळतेंही. एकदम तिकीट घेतलें ह्मणजे तिकीट काढण्याचा त्रास वांचतो व

स्टेशनवरून बाहेर जावें लागत नाहीं. आणि पोलीस व तिकिट कलेक्टर यांचा त्रास चुकतो. मात्र मेल किंवा प्यासेंजर गाडी पाहून बसावें लागतें; भलत्याच बाजूच्या गाडींत बसतां कामा नये.

याप्रमाणें विचार व तपास करून आह्मीं बनारस कँटोनमेंट स्टेशनवर माघ वद्य ४ स संध्याकाळच्या गाडीनें बसलों. आमचा डबा रिझर्व होता. श्रीमंतांनीं आह्मांला जी जागा नेमून दिली होती त्या जागेंत आमची मंडळी बसली होती. आमचा डबा लहान असल्यामुळें त्यांत लघवीची व शौचविधीची सोय नव्हती ही मोठी गैर सोय होती व ती स्त्रियांना विशेषेंकरून नडे. या रेल्वेवर थर्ड क्लासांत लहान डब्यांत लघवीची सोय केलेली नसते, मोठ्या डब्यांत मात्र असते. पण एवढा मोठा ह्मणजे ८० माणसांचा डबा रिझर्व घेण्यास आह्मांस सवड नव्हती. गाडी कोठें किती उभी रहावयाची आहे हें मला माहीत असल्यामुळें योग्य वेळीं आमचे शौचविधी, मुखमार्जन. स्नान वगैरे सुद्धां होत असे. तसेंच आमचा डबा योग्य जंक्शनवर दुसऱ्या गाडीस परभारें रेल्वेकडून लागत असे, यामुळें सामानाची नेआण करण्याचा व हमालीचा त्रास चुकला. तसेंच गाडी चुकण्याची भीतीही राहिली नाहीं. आमची गाडी चंपारण्यांतून जात होती. येथें मजुरी स्वस्त असल्यामुळें पुष्कळ युरोपियन कंपन्यांनीं येथें उसाचे मळे लावले आहेत. येथील हवापाणी उसाला इतकें उपयुक्त आहे कीं जमीन एकदां नांगरावयाची, त्यांत ऊस लावावयाचा व दोन वर्षांनी तो मोठा झाल्यावर तोडावयाचा, याशिवाय दुसरें काम नाहीं! युरोपियन लोक शेताचें राखण करीत नाहींत, फार काय कुंपणसुद्धां घालीत नाहींत. या त्यांच्या उसाकडे माणसें पहात नाहींत, इतकेंच नव्हे तर त्यावर जनावरें सुद्धां जात नाहींत! इतका वचक युरोपियनांनीं ह्या प्रांतावर

बसविला आहे. गाडींत आम्हांला एक दक्षिणी मनुष्य भेटला, तो तेथें मोठ्या हुद्यावर होता, त्यानें सांगितलेली ही हकीकत ऐकून आम्हांला मोठा अचंबा वाटला. हिमालयाच्या पायथ्याची तराई ह्मणतात ती येथपासूनच लागते; येथील हवा सर्दगरम आहे.

याप्रमाणें आह्मीं ठिकाठकाणची शोभा पहात असतां मुझफरपूर जंक्शनला आलों. त्या वेळीं आमची गाडी लेट आल्यामुळें १०॥ वाजले होते, आणि दुसरी गाडी ११ वाजतां निघणार होती. ही वेळ स्नानाची होती व तेथें पाणीही विपुल होतें. यापुढें अशी सोय नव्हती ह्मणून स्टेशन येतांच आह्मीं सर्व मंडळी खालीं उतरलों व मी कांहीं मंडळीला घेऊन पुलावरून जेथें आह्मांला दुसऱ्या गाडींत बसावयाचें होतें त्या प्लॅटफॉर्मवर गेलों व बाकीच्या मंडळीस तेथें येण्यास सांगितलें. गाडीला उशीर झाला आहे तेव्हां लवकर चला, आपला डबा त्या गाडीला लागेल, सामानाची धास्ती नाहीं, असें मी त्यांस बजाऊन पुढें गेलों. जसजसें रक्सौल म्हणजे शेवटचें स्टेशन येत चाललें, तसतशी गर्दी फार होऊं लागली. माझी स्नानसंध्या झाली, तरी मंडळीचा पत्ता नाहीं; पुढें गेलों, इतक्यांत गर्दीतून मंडळी येतांना दिसली. इतक्यांत आम्हांला जावयाची ती गाडीही प्लॅटफॉर्मवर आली; व आमचा डबाही तिला लागलेला पाहिला. तेव्हां मंडळीस सांगितलें कीं, लवकर आटपा, दहा मिनिटें राहिलीं आहेत; आपला डबा शेवटीं आहे, तरी गाडी सुरू होतांच कोठेंहि बसा; मग आपले डब्यांत जातां येईल. माझी वाट पाहूं नका, मी सर्वांचा तपास करून कोठेंहि बसेन. मी गाडींत बसलों, गाडी सुरू झाली, तरी मंडळीचीं स्नानें व शौचविधि चाललेच आहेत! अखेर २-४ मंडळी ओलेत्यानेंच गाडी जवळ आली व त्यांस मीं गाडींत ओढून घेतलें. तरी तपास करितां ४ बायका व एक वृद्ध गृहस्थ पाठीमागें राहिलेच! सांखळी ओढून गाडी थांबवीन म्हटलें,

तर गर्दी अतिशय होती व साखळीही लांब पाहिली ! आम्हीं त्यांना व ते आम्हांला पहात असतां गाडी निघून गेली. तेव्हां गाडींतील आमच्या बरोबरच्या बायकांचें देहावसान जाऊन त्या घाबरल्या. आम्हीं कोठल्या खालीं उरतलों, आम्हीं ज्यांच्या-बरोबर आलों तेच चुकले, आतां आमचें कसें होईल, त्यांचें कसें होईल, त्यांच्याजवळ नेसूंच्या वस्त्राशिवाय कांहीं नाहीं ! काका ओलेतेच आहेत, त्यांच्याजवळ सुखें नेसण्यास सुद्धां नाहीं, बंडी नाहीं, कोट नाहीं, डोकीचा रुमाल नाहीं, खाण्यास भांडेंकुंडें नाहीं, एक दिडकीसुद्धां कोणाजवळ नाहीं. अशा स्थितींत त्यांनीं कोणापुढें उभें रहावें, कसें मागावें, कोण देईल, कोणाला दया येईल, कसली यात्रा नि कसलें काय ! सुखाचा जीव मात्र दु:खांत घालून बसलों आहों. मला ह्मणा-ल्या, अहो, तुम्हीं तरी पुढच्या स्टेशनवर उतरून आमच्या मंडळींची व्यवस्था करा. पण ते निघण्यापूर्वीं मला गाडीच नव्हती ! चालत जावें तर अंतर फार लांब. कोणी म्हणे तार करा, कोणी म्हणे तारेची मनीऑर्डर करा. त्यांच्याजवळ तिकिटें नाहींत, दुसरीं तिकिटें काढ-ण्यास पैसा नाहीं. कायहो ! त्यांचें काय होईल ? वगैरे प्रश्न विचा-रून त्यांनीं मला अगदीं त्रासवून सोडलें. मी त्यांना सांगितलें, झाल्या गोष्टीस इलाज नाहीं; पण तुम्हीं काळजी करूं नका. ते जंगलांत नाहींत, माणसांत आहेत. आतां थोडा त्रास पडेल, पण आपण कितीं जरी प्रयत्न केला, तरी यात्राक्लेश हे थोडेबहुत होणारच; यापेक्षां दुसरें कांहीं होणार नाहीं. त्यांना येण्यास पुन: संध्याकाळीं सहा वाजतां गाडी आहे, त्या गाडीनें ते येतील. ते जर आले नाहींत, तर तुम्हांला प्रथम ठिकाणावर पोंचवितों, व त्यांना आणण्यास परत जातों. आतांच परत गेलों तर मी तेथें पोंचण्यापूर्वींच त्यांची गाडी निघते; तिनें ते निघाले म्हणजे त्यांची व माझी चुकामूक पडेल, व पुन्हां गोंधळ होईल; सबब

त्यांचे गाडीची वाट पाहूं, व मग काय करणें तें करूं; आतां सहा वाजेपर्यंत म्हणजे त्यांची गाडी निघेपर्यंत त्यांस आपलेकडून कोणत्याहि प्रकारची मदत होणें शक्य नाहीं. अशी त्यांची समजूत घातली, पण पुनः ते दृष्टीस पडेपर्यंत आमचा जीव खालीं होणार नाहीं, असें प्रत्येक बाईनें आपआपल्या परीनें मला बोलून दाखविलें, व सगळ्या वाटभर मला नको नकोसें केलें. त्यांचें ह्मणणें सर्व खरें होतें, पण असा त्रागा करून काय उपयोग? युक्तीनें प्रसंगांतून मोकळें होण्याचा त्यांना विचारच नाहीं! ते येईपर्यंत मध्येंच उतरावें, तर डबा रिझर्व होता, यामुळें आमच्या पुरतीं तिकिटें श्रीमंतांकडून मिळतना. जो तो मला दोष देऊं लागला कीं, तुह्मीं उतरावयास सांगितलें नसतें तर आमच्यावर असा प्रसंग आला नसता. मी त्यांस ह्मटलें, आज तुह्मांस रिझर्व डबा मिळाला, पुन्हां परत येतांना मिळेल काय? तेव्हां तरी ओझ्यासह उतरावें लागेलच कीं नाहीं? त्यावेळीं असा मंदपणा केल्यास गाडी चुकेलच. ह्मणजे चूक उतरण्याची नसून मंदपणाची आहे. भलत्याच ठिकाणीं सोंवळें ओंवळें व स्पर्शास्पर्शाचा विचार करीत बसून कसें चालेल? आजपर्यंत ठिकठिकाणीं तुह्मीं उतरलां, व त्यामुळें तुमचा फायदा झाला तो तुमच्यामुळें झाला असें कोठें ह्मटलें नाहीं तें? आणि आतां तुमच्या चुकीमुळें तुम्हांस त्रास झाला त्याचा जबाबदार मी काय? पण ही जगाची रीतच आहे. त्यांत तुह्मांस शब्द नाहीं. असो, पण या गोष्टीची त्यांना मोठी अद्दल घडली.

दोन चार स्टेशनें निघून गेल्यावर मी आमच्या रिझर्व डब्यांत आलों, व तेथें बसलेल्या श्रीमंतांच्या कारभाऱ्यांशीं विचार करूं लागलों. तार केली पाहिजे हें खरें, पण ती कोणास करावी? यात्रेकरूंस (आमच्या मंडळीस) करावी तर त्यांचा कदाचित् तपास लागणार नाहीं. ते स्टेशनवर असतील किंवा त्यांस बाहेर घालविलें असेल.

रिप्लाय ( जबाबी ) करावी, तर आमचेंही ठिकाण स्थिर नाहीं. कारण, आम्हीं एकवार एकाद्या स्टेशनवर ते येईपर्यंत उतरलों असतों, पण श्रीमंत व त्यांचा रिझर्व डबा कसा रहाणार ? तेव्हां तो बेत रद्द करून मुझफरपूरच्या स्टेशनमास्तरास तार करण्याचें ठरलें. आमच्या रिझर्व डब्यांतील ४।५ पॅसेंजर आपल्या स्टेशनवर चुकून राहिले आहेत, त्यांस पाठीमागच्या गाडीनें रक्सौलला रवाना करावें. मध्यें सगोलीला गाडी बदलण्याबद्दल जरूर सांगावें, व त्यांना धीर द्यावा, अशी तार करण्याचें ठरलें. मधील स्टेशनवर गाडी फार उशीर उभी रहात नाही सबब सगोली जंक्शनवर आमचा डबा दुसऱ्या गाडीस लागेपर्यंत तार करण्याचें ठरविलें. आणि सगोली स्टेशन येतांच तार केली, व सगोली स्टेशनमास्तरासहि आमचे ४।५ पॅसेंजर राहिले आहेत, ते मागच्या गाडीनें येतील, त्यांजवळ तिकिटें नाहींत; त्यांस रक्सौलच्या गाडींत बसवावें, असें बजाविलें. त्याप्रमाणेंच पुढें रक्सौलच्या स्टेशनमास्तरासहि सांगितलें होतें. याप्रमाणें संगति लागल्यामुळें आमच्या मनाचें समाधान झालें.

आमची गाडी दिवे लागण्याच्या सुमारास रक्सौल स्टेशनवर आली, आणि त्याच वेळीं, नरकटिया जंक्शनवरून ह्मणजे दुसरे बाजूनेहि गाडी आली, आणि दोन्ही गाड्या सबंध खालीं झाल्या-बरोबर प्लॅटफॉर्मवर जिकडे तिकडे माणसेंच माणसें झालीं ! स्टेशन लहान असल्यामुळें प्लॅटफॉर्मवर कंदील नाहीं; जिकडे तिकडे अंधार व त्यांत शेंदोनशें नेपाळी कुली व कंडीवाले यांची गर्दी. जो तो आपणास पॅसेंजर मिळावा ह्मणून गांठोडीं हिसकीत होता. त्यांची भाषा समजत नसल्यामुळें गोंधळांत विशेष भर पडली होती. ' जरा खडे रहो, हमारे सब् बोजा निकलनेका है. ' असें सांगितलें तरी त्यांना तें समजेना. तेव्हां सगळें सामान उतरेपर्यंत सर्व सामानाभोंवतीं आह्मांला गराडा करून राहणें भाग पडलें ! अर्ध्या तासानें गर्दी कमी

झाल्यावर आह्मीं कुलींचा, राहण्याच्या जागेचा, धर्मशाळेचा वगैरे शोध केला, तेव्हां, गांव नजीक नसून २ फर्लांगांवर आहे, त्या गांवांत धर्मशाळा वगैरे नाहीं; येथून २ मैलांवर वीरगंज ह्मणून ठिकाण आहे, तेथें धर्मशाळा वगैरे सर्व सोयी आहेत अशी माहिती मिळाली. पण अंधारांतून अशा अप्रसिद्ध ठिकाणीं जावयाचें कसें ? शिवाय आमची राहिलेली मंडळी दुसरे दिवशीं यावयाची होती, ह्मणून आह्मांला फार लांब जातां येईना, व तेथें तर राहण्यास जागा नाहीं, तेव्हां आतां काय करावें याचा मोठा विचार पडला. शेंकडों यात्रेकरू सडकेवरच पडले होते, कांहीं गांवांत गेले, व कांहीं पुढें वीरगंजलाही गेले ! नंतर मी एका टांग्यांत बसून टांगेवाल्याच्या सहाय्यानें गांवांत एका श्रीमंत गिरणीवाले मारवाड्याकडे गेलों. तो घरांत उतरण्यास जागा देईनाच. परंतु जरा दोन गोष्टी सांगितल्यावर मोठ्या मिन्नतवारींनें त्यानें आम्हांस गुरांची उघडी पडवी उतरण्यास दिली ! आह्मीं त्यांत संतोष मानून सामानासह तेथें आलों. झाडलोट, स्वच्छता करून पाणी आणून फराळ केला, व रात्र कशी तरी काढली; असा त्रास पडतो, सबब संध्याकाळच्या मुक्कामाला येऊं नये. कदाचित् प्रसंग आला तर येथें एक राष्ट्रीय शाळा स्थापन झाली आहे, तेथें महाराष्ट्रीयांनीं उतरावें ह्मणजे त्यांची सोय होईल; किंवा जवळच स्टेशनमास्तर राहतात, त्यांचे घराजवळ विहिर आहे, तेथें शेतांतच कोठेंतरी मैदानांत एकसमुदायानें उतरावें व पहांटे उठून जवळच्या वीरगंज गांवीं जावें.

दुसरे दिवशीं सकाळीं उठून मी प्रथम स्टेशनवर गाडीवर गेलों. जातांना ( आमच्या वृद्ध गृहस्थांना ) काकांना इकडे बोडक्यानें व उघडे नागडे येण्याचा प्रसंग येऊं नये, ह्मणून मी त्यांचा कोट व फेटा घेऊन गेलों होतों. गाडी १५।२० मिनिटांनीं आली; तींतून ती वृद्ध मंडळी आलेली पाहून मला व त्यांनांहि फार आनंद झाला. आमची

राहिलेली मंडळी ती हीच असें स्टेशनमास्तरांस सांगतांच त्यांनीं सर्वांना सोडून दिलें. मंडळी उघडी बोडकी होती त्यांना कपडे दिले. मग विचारपूस सुरू झाली. हालहवाल काय झाली, मी तार केली होती तिचा कांहीं उपयोग झाला किंवा नाहीं ? त्याबद्दल त्यांनीं सांगितलें कीं, इतरांस तिकिटांकरतां हटकींत होते, तसें आह्मांला कोणी हटकलें नाहीं. मुझफरपुराहून दुसरी गाडी केव्हां निघते तें त्यांनीं आह्मांस सांगितलें, व तोंपर्यंत स्टेशनवर एका बाजूस बसण्यास त्यांनीं आह्मांस जागा दिली होती. गाडी आल्यावर तपास करून आह्मीं गाडींत बसलों. आह्मांला सगोलीस रात्रीं २ वाजतां उतरण्यास सांगितलें होतें, त्याप्रमाणें आह्मीं उतरलों व ह्या गाडींत बसलों. व येथें उतरलों, येथें तुह्मीं होतांच; ह्मणून आम्हांला रेलवेच्या नोकरांकडून तिकिटांचा किंवा कसलाहि त्रास झाला नाहीं. अर्थात् तारेचा उपयोग पूर्णपणें झालाच व अजमासाप्रमाणें सर्व गोष्टी घडून आल्या. पुढें बिन्हाडीं पोंचल्यावर सर्व मंडळी एकत्र मिळाली म्हणून सर्वत्रांस जिकडे तिकडे आनंदीआनंद झाला, व सर्वांचा जीव एकदां ठिकाणावर आला. मग बायकांच्या चौकशीला पारावारच नव्हता !

आम्हीं येथें उतरलों होतों हें कंडीवाले व कुली यांस माहीत होतेंच. सकाळपासूनच त्यांची ये जा सुरू झाली. येथपासूनच कुली व कंडीवाले जाण्यायेण्याचे ठरवावे हें उत्तम. मध्यें कुली किंवा कंडीवाले केल्यास पैसे जास्त मागतात व तेहि टिकत नाहींत. मधूनच पैसे घेऊन कांहीं तरी ढोंग करून निघून जातात. एक कुलीला जाण्यायेण्याबद्दल सरासरी ७—८ रुपये द्यावे लागतात. सामान कमी असल्यास दोघांचौघां-मिळूनहि एक कुली करतां येतो व त्यासही ८ रुपयेच पडतात. ह्मणजे हे आठ रुपये विभागले जातात; पण तो दर नव्हे. तसेंच कंडीवाल्यास १०—१२ रुपये पडतात. कंडी दोघांचौघांमिळूनही ठरविता येते. ह्मणजे

एकानें उतरावें दुसऱ्यानें बसावें, मग तिसऱ्यानें बसावें, म्हणजे जो दमेल त्यानें बसावें असें चालतें; मात्र तशी शर्त प्रथमपासून पाहिजे, व त्याबद्दल जरा जास्त पैसे पडतात. इतके पैसे दिले म्हणजे कुलींचें व कंडीवाल्यांचें जेवण आपलेकडे नसतें, व तें कधीं घेऊंहि नये. तरीपण रोज संध्याकाळीं चर्णाचबिन्याकरितां प्रत्येक कुलीस १–२ दिडक्या कधीं कधीं द्याव्या लागतात. पण हा करार नव्हे. पण अशानें ते खुष असतात. श्रीपशुपतीश्वरास किंवा दुसरे कोठें एक दिवसापेक्षां जास्त दिवस राहणें झाल्यास कुलीस रोज पोटाकरितां ४–८ आणे जास्त द्यावे लागतात. शिवाय, पशुपतीश्वरापुढें **मुक्तिनाथ, दामोदरकुंड, गंडकीचा उगम**, वगैरे अगम्य स्थळें पहाणें असल्यास, तसेंच नेपाळांतील **दत्तस्थान** व दुसरीं, **कीर्तिपूर, पाटण, भाटगांव, गोकर्ण** व जवळचें **देवीचें स्थान** हीं पहावयास करार असल्याशिवाय, कुली किंवा कंडीवाले येणार नाहींत. **मुक्तिनाथा**सारखीं अगम्य ठिकाणें पाहण्याच्या भरीस पडूं नये. कारण तीं लांब म्हणजे पशुपतीपासून शंभर मैल लांब आहेत व रस्ता वाईट आहे. थंडी कडाक्याची असल्यामुळें वैशाख जेष्ठांत तेथें जाण्याचा बेत करितात. ही यात्रा गंगोत्रीजमनोत्रीसारखी कठीण आहे; तेथें जाणें झाल्यास पहिल्या भागाप्रमाणें हिमालयाच्या यात्रेची तयारी करून घ्यावी लागते. शिवाय नेपाळ सरकारची रहाण्यास परवानगी पाहिजे हें निराळेंच. मुक्तिनाथाजवळच गंडकीचा उगम दामोदरकुंडांतून आहे. ही यात्रा केली नाहीं तरीपण, ज्याला दत्त म्हणतात तें ठिकाण येथून पांचसहा मैल दूर आहे, तेथें जाण्याचा करार अवश्य करावा. जसजसें लांब जावयाचें असेल तसतसे पैसे जास्त पडतात; पण लांब जाण्यास ताकद रहावी लागते, ती रहात नाहीं. थांबून थांबून जावें म्हटलें तर नेपाळ सरकारची नियमित मुदतीपुढें राहण्यास परवानगी नसते; मिळून त्रासच असतो. नेपाळ हद्दींत माघ वद्य ५ पासून फाल्गुन

शुद्ध १० पर्यंतच राहण्याची परवानगी असते पुढें नसते; कदाचित् राहणें झाल्यास सरकारची विशेष परवानगी मिळून नेपाळांतील स्थानिक मनुष्यानें त्याच्या वर्तनाची हमी घ्यावी लागते. पण बहुधा सरकाराला ज्या मनुष्याची जरूर नाहीं अशा मनुष्यास परवानगी मिळतच नाहीं. कुली, कंडीवाले ठरले म्हणजे त्यांचीं नांवें, गांवें, पत्ते, साधल्यास त्यांचीं घरें पाहून ठेवावीं. आम्हीं कुली रक्सौलचे केले होते, म्हणून त्यांचीं घरें पाहून ठेविलीं होतीं. कराराच्या शर्ती, पैसे देण्याच्या शर्ती वगैरे सर्व एका कागदावर लिहून काढून त्यावर सह्या किंवा डाव्या हाताचे आंगठे उठवून घ्यावे, सर्व पैसे एकदम देऊं नयेत. जरूर तसतसे द्यावे. त्याशिवाय माणसांच्या कंडीवाल्याबद्दल पुढें सरकारांत माणशीं तीन किंवा चार आणे कर घेतात, तोहि आपणांसच द्यावा लागतो; असा नीट विचार करून भाडें ठरवावें लागतें. भाडें बहुधा कंपनी रुपयांतच घेतात.

नेपाळांत कंपनी व नेपाळी अशीं दोन्हीं नाणीं चालतात. कंपनी रुपाया नेपाळीपेक्षां फार मोठा आहे, व तो सर्वत्र चालतो. अगदीं थोडे ठिकाणीं मात्र नेपाळी पैशावांचून अडतें, तेवढ्याकरितां १–२ रुपयांचा खुर्दा करून ठेवावा. नेपाळांत दक्षिणी लोकांना नोटींची फार जरूर असते, सबब रोख नाणें फारसें घेऊन जाऊं नये. नेपाळांतून ब्रिटिश राज्यांत मनीऑर्डर होत नाहीं, फक्त इन्शुअर होतें, सबब त्यांना घरीं पाठविण्यास नोटी लागतात, व त्याबद्दल ते काकळूतहि करतात.

नेपाळांत गुरखे लोक राहतात. गोरखपुरावरून तेथले राहणारे अशा अर्थी गुरखे नांव निघालें आहे. हे लोक जपानी लोकांसारखे ठेंगू, गोरे, अवयवानें नीटस असतात, सुंदर असतात; नाक मात्र बसकें असतें. यांचा पोषाख म्हणजे, ढुंगणास चोळणा, अंगांत लहान बंडी, व डोक्यास मुसलमान पांढरी टोपी घालतात, तशी टोपी असते, व प्रत्येकाच्या पाठीवर कंडी असते. असे कुली ठिकठिकाणीं मजुरी-

करितां हिंडत असतात. हे मोठे ताकदवान आहेत. मागें भाग १ यांत नेपाळी कुली ८।१० मण ओझें पहाडावर चढवितात, म्हणून लिहिलें आहे, पण तें प्रत्यक्ष पहातां खोटें दिसलें. तरी पण ज्या चढावावर आपल्याकडील ताकदवान मनुष्य हातांत कांहीं ओझें न घेतां चढतांना ४।५ ठिकाणीं बसतो, त्या चढावावर हे गुरखे बंगाली तीन मण ओझें घेऊन चढतात, हें मी प्रत्यक्ष पाहिलें. म्हणून कुली किंवा कंडीवाले या गुरख्यांपैकींच करावे हें उत्तम. पण हे लोक गंगोत्री केदारसारखे असावे तितके प्रामाणिक नाहींत. म्हणजे चोरटे किंवा दगलबाज नाहींत, पण अविश्वासू आहेत असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. सबब त्यांना पुरे पैसे कधीं देऊं नयेत, ते शेवटीं द्यावेत, नाहीं तर ते मध्येंच सोडून जातात ! वाटेंत मुक्कामावर ते दुसरे ठिकाणीं गेले तरी त्यांची कंडी आपले जवळ ठेवावी म्हणजे ते येतील, नाहींतर त्यांचा विश्वास नाहीं. श्रीमंत व खाऊन पिऊन सुखी असणाऱ्या नेपाळी गृहस्थांचा पोषाख खिस्ती कॅथॉलिकांसारखा टोपीसुद्धां सर्व काळा असतो. मात्र यांच्या कपाळीं तांबडें गंध व कस्तुरीदर्शक अगदीं लहान काळा ठिपका असतो. कस्तुरी ही नेपाळच्या वैभवाची खूण आहे.

**' नेपाळेश्वर भाललग्न चिखला, कस्तूरिका मानिती । '**

रक्सौल हा बडा गांव ब्रिटिश हद्दींत आहे. येथें सर्व वस्तु मिळतात. एकदोन गिरण्याहि आहेत. येथें आम्हीं दुपारीं जेऊन ठरविलेल्या कुली व कंडीवाल्यांना बरोबर घेऊन २ वाजतां निघणार होतों. आम्हीं ज्यांच्याबरोबर रिझर्व डब्यांत आलों, तेहि याच वेळीं निघणार होते, त्यांनीं घरधन्याच्या ( मारवाड्याच्या ) मार्फत कुली व कंडीवाले केले होते. आमच्यापेक्षां दोन दोन रुपये त्यांनीं जास्त ठरविले होते. तरी हे श्रीमंत आहेत, आपण त्यांस आयते वेळीं अडविल्यास जास्त पैसे मिळतील, असें समजून त्यांनीं आयतेवेळीं येण्याचें नाकारलें ! त्यांनीं

सुद्धां आमचेप्रमाणें करार करून घेतले होते, पण परदेशांत त्यांच्याशीं भांडत कोठें बसणार ? शिवाय प्रथमपासून भांडून निघून पुढें काम तें काय करणार ? तेव्हां तो नाद सोडून त्यांनीं दुसरे कुली केले, व निघाले; यामुळें त्यांची वेळ चुकली. करारांचा असा उपयोग झाला नाहीं तरी, करार करण्याचें सोडूं नये. कारण पोलीसांनीं पकडलें, किंवा कुलीनें कांहीं तक्रार केली, तर पोलिसांस किंवा सरकारी अंमलदारांस दाखविण्यास आपणांजवळ आधार असावा.

यापुढील मार्ग नीट समजावा, व पुढच्या मार्गाचें धोरण नीट लक्षांत यावें, म्हणून सोबत नकाशा जोडला आहे, तो या वर्णनाचे वेळीं अवश्य पहावा. कारण, वर्णनें कितीहि वाचलीं तरी एकसमयावच्छेदेंकरून नकाशावरून जशी समजूत होते, तशी वर्णनानें होणार नाहीं. हा नकाशा मुद्दाम स्केलवर फारसा बसविला नाहीं; कारण, रस्त्यासंबंधीं जरूर ती माहिती म्हणजे, त्याचें स्वरूप, अंतर, ठिकठिकाणची विशेष माहिती, पाण्याची सोय, येणाऱ्या अडचणी व त्यांचा परिहार कसा करावा हें त्यांत दाखविलें नसतें, तें ह्यांत स्पष्ट दाखविलें आहे. तसेंच पुढें हिमालयाचे बिकट मार्गाची कल्पना करतां यावी, म्हणून त्यांच्या गढ्यांचें उंचीसुद्धां सामान्य स्वरूप दाखविलें आहे. यामुळें हा नकाशा स्केलच्या नकाशापेक्षां फार उपयुक्त झाला आहे. या पुस्तकावरून याची नीट समजूत करून घेतली, व प्रवासांत हा वारंवार पाहण्याकरितां खिशांत ठेविला तर सहसा पुस्तक उघडावें लागणार नाहीं. याकरितां यात्रेकरूनें याचा अवश्य संग्रह करावा.

ही यात्रा अगदीं नियमित मुदतीची आहे असें मागें सांगितलेंच आहे. या नियमित मुदतीमुळें यात्रेकरूंच्या फार गैरसोई होतात. गंगोत्री केदारकडे जशा मार्गांत चट्ट्या असतात, तशा येथें नसतात; कोठें तरी घरांत उतरावें लागतें. घरवाल्यांनीं यात्रेकरूंकरितां मुद्दाम

जागा केलेल्या असतात, व माणशीं एक आणाप्रमाणें त्या रहावयास देतात. यांत दोन अडचणी उत्पन्न होतात. एक, मनुष्य एकटा असला तर एक आण्याकरितां स्वतंत्र जागा मिळत नाहीं, दुसरी, मंडळींत गेल्यास आपली स्वतंत्रता रहात नाहीं. जसजशी मंडळी जास्त असेल, तसतशी जागा बरी मिळते. मंडळी एकदिलाची असली म्हणजे जेवण एका ठिकाणीं होतें, जास्त चुली पेटवाव्या लागत नाहींत, चोरटेपणाचा संभव कमी असतो, एकमेकांविषयीं विश्वास उत्पन्न होतो; पण हीच भिन्न मंडळी असली म्हणजे भिन्न संस्कृतीमुळें व आचार विचारामुळें भांडणें उत्पन्न होतात, व कधीं कधीं नुकसानही होण्याचा संभव असतो. एकट्या मनुष्याकरितां एक आणा देण्यास कांहीं हरकत वाटत नाहीं, पण १०-२० मनुष्यें एका कुटुंबाचीं असलीं, म्हणजे, प्रत्येक रात्रीं राहण्याबद्दल रुपाया सव्वा रुपाया देणें जिवावर येतें; आणि अशा रीतीनें रोज खर्च केल्यास नुसत्या राहण्याचेच २०-२६ रुपये होतात! शिवाय उतरण्याचे हाल होतात; दिवसा झाडाखालीं सुद्धां उतरतां येतें. पण हे दिवस थंडीचे असल्यामुळें रात्रीं निवाऱ्याची जागा जरूर पाहिजे. केदार नारायणाकडे चट्टीवाल्याकडे सामान घेतलें, म्हणजे निराळ्या भाड्याबद्दल पैसे द्यावे लागत नाहींत. पण, येथें तसें नाहीं. सामान खरेदी करून फिरून भाडेंहि दिलें पाहिजे!

या यात्रेला 'माझी तीर्थयात्रा भाग १' या पुस्तकांत सांगितल्याप्रमाणें हिमालयाची तयारी करावी लागत नाहीं. मुख्यत: पाऊस नसतो, आणि हा खुद्द हिमालय नसल्यामुळें थंडीहि कमी कमी होत असते. यामुळें पुष्कळशा अडचणी व त्रास नाहींसा होतो. थंडीचे वेतावाताचे कपडे असले म्हणजे झालें. पण याशिवाय या यात्रेंत फराळाचें फार करून घ्यावें व तें टिकाऊ असावें. हवा शुद्ध व कोरडी असल्यामुळें तें फार दिवस टिकतेंही. या कामीं मी तळलेल्या डिंकाचे लाडू व साबू-

दाण्याचा चिवडा हीं पसंत केलीं आहेत. तेथें पोहे चांगले व स्वस्त मिळतात, पण ते फारसे खाऊं नयेत, ते पोटाला नडल्याशिवाय रहात नाहींत. या यात्रेंत मुक्काम लांबचे असतात, व ठिकठिकाणीं पाणी मिळतेंच असा नियम नाहीं. यामुळें हिमालयांत वागण्याचे धर्माप्रमाणें जेथें जेथें चांगलें पाणी व विश्रांतीचें स्थान मिळेल तेथें तेथें खाऊन पिऊन आपली शक्ती कमी न होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. व ठरलेल्या मुदतींत ठरलेले मुक्काम गांठले पाहिजेत, तरच शिवरात्रीचे आधीं श्रीपशुपतीश्वराचें दर्शन होतें, नाहींतर व्यर्थ श्रम होतात. म्हणजे दर्शन होत नाहीं असें नाहीं, पण शिवरात्रीस दर्शन व्हावें या हेतूनें आपण घर सोडलें, तो उद्देश फुकट जातो.

सोबत नकाशा जोडला आहे त्यवरून पाहतां, रक्सोल स्टेशनपासून **श्रीपशुपतीश्वर** सुमारें १०० मैल आहे; त्यांपैकीं पहिले ६० मैल सडक आहे, व पुढचा ४० मैलांचा रस्ता डोंगराळ व त्रासदायक आहे. विशेष त्रासदायक होण्याचें कारण ह्मणजे मनुष्य प्रथम चालून थकला असतो, व नंतर त्याला हा चढउताराचा त्रास होतो. माघ वद्य ५ पासून तिकींटें ऊर्फ पासपोर्ट मिळतात, व शिवरात्रीचे आदले दिवशीं तरी **श्रीपशुपतीश्वरास** पोंचावें लागतें. ह्मणजे नऊ दिवसांत शंभर मैल जावें लागतें. ह्मणजे चालण्याची सरासरी रोज ११ मैल पडते. ह्मणजे चढणीचा व अजारीपणाचा विचार केल्यास प्रथम प्रथम रोज १५।२० मैल तरी गेलें पाहिजे. या प्रवासांत जिकडे तिकडे वाळू आहे व वाऱ्याचा अप्रातिबंध संचार आहे, यामुळें खाण्यापिण्याच्या पदार्थांत तिचें व्यंजन अगर मिश्रण बिनतक्रार होतें. तुम्हीं कांहीं खा किंवा प्या, दाताखालीं कचकच लागतेच. या वाळूमुळें व तिकडचे ताजे पोहे खावेसे वाटल्यामुळें मनुष्याची पचनशक्ति फार कमी होऊन हगवणीचे विकार उत्पन्न होतात. ह्यापा-

ण्यांत बदल होत असल्यामुळें हा रोग औषधाला जुमानीत नाहीं, व अनवस्था प्रसंग येतो. आमच्या मंडळींतील हे पोहे खाणारी एक दोन मंडळी ह्या तडाक्यांत सांपडली होती. खालीं आल्यावर त्यांचे विकार गेले. परंतु खालीं येईपर्यंत औषधानें त्यांचे विकार जास्त होऊं दिले नाहींत येवढेंच! आमच्या बरोबरच्या श्रीमंत गृहस्थांच्या बरोबर एक वृद्ध बाई आली होती, ती तर पशुपतिनिवासीच झाली! रक्सौल स्टेशनपासून हिमालयाच्या प्रत्यक्ष पायथ्यापर्यंत, म्हणजे भीमफेरीपर्यंत ६० मैल सडक आहे असें सांगितलें आहे. पण ही सडक नांवाचीच आहे. हिच्यावर गाड्या चालविण्यापेक्षां सडकेखालूनच गाडी नेणें सोईचें वाटून लोक तसेंच करितात. सडकेचें काम पुष्कळ ठिकाणीं अपुरें आहे. कोठें भराव चालले आहेत, कोठें पुलाचें काम चाललें आहे, कोठें रेलवेचे रूळ पडले आहेत, कोठें वाफेचा रूळ चालू आहे! एकंदरींत ही सडक रेल्वेला योग्य करून येथपर्यंत रेल्वे येणार असें म्हणतात. काम जारीनें चालू आहे तरी रेल्वे पुरी होण्यास निदान पांच वर्षें तरी लागतील असा अजमास आहे. आणि रेल्वे जरी झाली, तरी ती टिकणें अशक्य आहे; कारण. रस्ता वाळूचा, डोंगरांची पडापडी, पावसाळीं नद्या तुफान होतात, सबब पुलांची अशाश्वती. बरें इतकें करून रेल्वे चालविली तरी तिला उत्पन्न कांहीं नाहीं. नेपाळांत स्थानिक उत्पन्नच कांहीं नाहीं. इमारती लाकूड नाहींच. एकादा सागाचा तुकडा लागला तर तो खालून न्यावा लागतो! धान्य तेथें जेमतेम पुरेसें आहे. परदेशीं पाठविण्याइतकें नाहीं. खालून सर्व देशी व विलायती माल जातो; तो किती दिवस जाणार? व्यापार नाहीं, अर्थात् दळणवळण नाहीं. फक्त ही एक यात्रा असल्यामुळें वर्षांतून १५।२० हजार यात्रा येते. तिला नेहमीं मोकळीक असती, तर आणखी १५।२० हजार येती; पण तिलाहि राजकारणाकरितां

प्रतिबंध आहे. तेव्हां रेलवे झालीच तर आणखी एवढी यात्रा येऊन १५।२० दिवस धुडकूस चालेल, पण व्यापाराशिवाय रेलवे टिकत नाहीं. ही रेलवे, तारायंत्र, टेलिफोन वगैरे केवळ राजाच्या संतोषाकरितां व हौसेकरितां केलीं जात आहेत. रेलवेसंबंधीं इतकें केलें तरी मध्यें ज्या २।३ गढ्या आहेत, तेथें कांहीं उपाय चालणार नाहीं. काय होईल तें कळेलच. येथील लोकांना व राजाला विलायती मालाची फार चटक लागली आहे असें दिसतें. त्यांचा सर्व ड्रेस, टोपीसुद्धां, युरोपियन फॅशनचा असतो असें सांगितलें आहेच.

ह्या साठ मैल सडकेवरून सर्व प्रकारचीं वाहनें जातात; बैलगाड्या, तांगे, मोटारीसुद्धां जातांत. पण आंत बसणारे, हे लाह्या भाजतांना जशा उडतात, तसे उडत असतात ! अर्थात् त्या वाहनांचा बसणारास काय उपयोग ? वाईट रस्त्यामुळें माणसें, जनावरें व वाहनें यांना व्यर्थ त्रास होतो. त्यापेक्षां पायीं जाणें केव्हांहि उत्तमच. बैलगाडी केली तर ती अगोदर बसण्यासारखी नसते. तशांत तिच्या मंदपणामुळें व वारंवार मुक्कामांमुळें ती मुदतींत पोंचणें जड जातें. म्हणून गाडींत बसणारे पॅसेंजर मला मुळींच आढळले नाहींत. तांगे १।२ आहेत. पण काशी, प्रयागप्रमाणें ते रथासारखे असतात; व त्यांत एक दोन माणसेंच मोठ्या मुष्किलीनें बसतात. आणि धावतांना ते अशा रस्त्यावर केव्हां कलंडतील याचा नेम नाहीं ! म्हणजे इतकें अगदीं जपून बसलें पाहिजे, मग त्यांत सुख कसलें ? मोटारी आहेत, पण त्या राजघराण्यांतल्या व दरबारच्याच आहेत. अर्थात् त्यांच्या तोडीच्या संस्थानिकास, सरदारास, वशिल्याच्या श्रीमंतास किंवा फार मोठ्या ऑफिसरासच त्या मिळतात. पण त्यांत वैभवापेक्षां सुख मुळींच नाहीं. शिवाय रस्ता वाईट, यामुळें त्या केव्हां बिघडतील याचा नेम नाहीं. याशिवाय राजघराण्यांत मेणे, पालख्या वगैरे आहेत, पण तो लवाजमा नुसता

पहावयाचा. त्याचा उपयोग नाहीं. लोकांच्या उपयोगी म्हणजे बाकी राहिलेलीं वाहनें, कंड्या, झंपानें, बरेलीदांडी वगैरे आहेत. त्यांचें वर्णन 'माझी तीर्थयात्रा भाग १' यांत केलें आहेच. पण हें विशेष खर्चाचें काम आहे. सामान्य जनांना पायीं जाणेंच उत्तम. आणि रस्त्यावर खडी नाहीं, जिकडे तिकडे बारीक वाळू यामुळें चालण्याचा त्रास मुळींच नाहीं. शिवाय वाटेचे विशेष श्रम पडूं नयेत म्हणून काशीहून माघ वद्य २ स निघावें, म्हणजे झालें. रक्सौलला रेल्वेनें जाण्यास सुमारें एक दिवस म्हणजे २४ तास लागतात; आणि कितीहि जलद गेलें तरी पुढें पांच दिवस लागतातच. म्हणूनच यात्रेच्या तिकि-टाची मुदत माघ वद्य ९ पर्यंत ठेविली आहे. यापुढें निघून जाणें शक्य नसल्यामुळें पुढें आंत जाण्याचीं तिकीटें बंद होतात. याउप्पर ज्यानें त्यानें आपल्या सवडीप्रमाणें व हिमतीप्रमाणें निघावें.

ह्या प्रवासासही बुटाची आवश्यकता आहे. आतां हा होलबूट नसला तरी चालेल. पण बऱ्यापैकीं मऊ असावा. प्रवासाच्या वेळीं चाकू, विळ्या, सुई, आगपेटी, मेणबत्ती, पाणी पिण्याचें भांडें, दोन-चार ग्राइ किंवा कांहीं खाण्याचे पदार्थ, घड्याळ व दोन रुपये किर-कोळ इतकें सामान घ्यावें. यापेक्षां जास्त कांहीं घेऊं नये. नेहमीं कुलीबरोबर चालावें, निदान त्यास दृष्टीच्या टप्प्यांत ठेवावा. कंडी केली असल्यास कुलीची कंडी नेहमीं आपण जेथें वस्ती करितों, तेथें ठेवावी; कुलीला बरोबर नेऊन देऊं नये. कुली किंवा कंडीवाले यांची चुकामुक पडल्यामुळें कधीं कधीं मोठा घोटाळा होतो. एका मद्रासी शास्त्र्याचा कुली चुकला होता; तेव्हां वाटेंत त्याचे फार हाल झाले. खालीं थंडी कमी, पण पुढें पुढें थंडी जास्त होते, राहण्यास बंदो-बस्ताची जागा मिळत नाहीं, कपडे अपुरे असतात. खाण्याची अबाळ होते व सर्व असून नसल्यासारखें होतें. मोठ्या महत्वाच्या ठिकाणीं

मोठमोठ्या धर्मशाळा आहेत, पण हजारों यात्रिपुढें त्यांचा काय टिकाव लागतो! शिवाय या धर्मशाळांचा वरचा महत्त्वाचा भाग वशिला लावून श्रीमंत व अधि... मनुष्यांनीं अडकविला असतो. मग गरीब यात्रेकरू थंडीनें कुडकुडत सडकेवर किंवा रानोमाळ पसरलेले असतात. एखा-द्यानें झगरी केल्यास त्या सभोंवतीं पुष्कळ मंडळी वसते. धर्मशाळेचा नाद आपण सोडून द्यावा. भाड्याच्या जागेसारखें सुख नाहीं; या कामीं पैशाकडे पाहूं नये. भाड्याचे घरीं वस्तु जाण्याची भीती नसते. आपल्या सामानांत एक हरिकेन लॅंटर्न किंवा कसला तरी कंदील शक्य असल्यास घ्यावा. निदान काशीचा मोड कंदील घ्यावा; फार उपयोग होतो. आम्हीं दक्षिणी पाहून तो मद्रासी आमची कपड्यालत्त्याकरितां व जागे-करितां फार विनवणी करी, व त्याकरितां आशीर्वादही देत असे! शक्य असल्यास आम्हीं त्यास मदत करीत असूं पण ती सर्व प्रकारें कशी होणार? जास्त वस्तु कोण बाळगतो? शिवाय याची स्थिती खरीच अशी आहे कशावरून? कांहीं लोक ढोंग करूनहि फसवितात, व दुसऱ्या मंडळीच्या आश्रयास जाऊन तेथून चोरी करून नाहींसे होतात. पण तसा हा नव्हता हें त्याच्या संगतीवरून समजलें, हा विद्वान भिक्षुक होता. पुढें त्याची व त्याच्या कुळीची गांठ पडून आनंद झाला. कुली चोऱ्या करून किंवा फसवून बहुधा जात नाहींत. पण चुकभूल झाल्यास सामानाचा त्याला व आपल्यालाहि उपयोग होत नाहीं, व फार हाल होतात. एका गृहस्थाची एक वृद्ध बाई चुकली, ती अखे-रपर्यंत त्याला सांपडली नाहीं. त्यानें मागें पुढें पुष्कळ तपास केला पण कांहीं तपास लागला नाहीं. त्याबद्दल तो फार हळहळला. पण उपयोग काय? गर्दीत कोण कोणास विचारतो? आणि विचारावें तरी काय? एक म्हातारी कोणाच्या दृष्टीस पडली काय! आणि याचें उत्तर तरी कोण काय देणार? सर्वत्र म्हाताऱ्या आहेतच!!

शिवाय भाषा समजत नसल्यामुळें बोलण्याचाहि उपयोग नाहीं. आम्हीं महाराष्ट्रीय म्हणून घरच्या माणसांप्रमाणें तो आमच्याशीं मनसोक्त बोलला. काय करूं, कसें करूं, म्हणजे ती मला मिळेल ? असा तो वेडा झाला होता. असो. इतकी प्रास्ताविक माहिती पुरी करून आतां—

## यात्रा–वर्णन.

करूं. ठरल्याप्रमाणें आम्हीं रक्सौलवरून दुपारीं २ वाजतां कुली, कंडीवाल्यांसुद्धां निघालों. सर्व रस्ता पुळणीचा आहे. गांव सरल्यावर एक ओहोळवजा नदी लागते, तिच्यावर पूल बांधिला आहे. ही नदी ब्रिटिश व नेपाळ सरकारच्या सरहद्दीवर आहे. ती उलटून पुढें एक मैल गेलें ह्मणजे,

### वीरगंज

हा शहरवजा गांव लागतो. मोठमोठ्या दुमजली इमारती, बाजार मोठा, मोठमोठ्या धर्मशाळा व सरकारी ऑफिसें. यांनीं या गांवास विशेष शोभा आली आहे. बाजारांत सुधारलेल्या जगाच्या बहुतेक सर्व वस्तु व त्यांची व्यवस्थेशीर मांडणी, चहाकॉफीचीं हॉटेलें, कुली व कंडीवाले यांची रस्त्यावर गर्दी, धनधान्याचीं दुकानें, गाड्या, टांगे, मोटारी यांची मोठी रहदारी, तारायंत्रांचे खांब, अशा संपन्न स्थितींतला नेपाळ हद्दींतील हा पहिलाच गांव पाहून मनाला फार आनंद वाटला, व नेपाळचें राज्य चालू काळाप्रमाणें पूर्ण सुधारलेलें असावें असें वाटलें. मागें सांगितलेल्या सर्व वस्तु आमच्या पूर्ण परिचयाच्या होत्या, पण येथील नेपाळची अपूर्वता ह्मणजे येथील गलेलठ्ठ हत्ती होय. सर्व प्राण्यांमध्यें हत्तीसारखें वाटोळें, मोहक व सौम्य शरीर दुसरें कोणाचें नाहीं. इतर ठिकाणचे हत्ती थोडे सुरकुतलेले तरी दिसतात, पण हिमालयाच्या पायथ्याची तराई हें त्यांचें मूलस्थान असल्यामुळें, येथील हत्ती फारच बांधेसूद, पूर्ण

वादीचे, व माणसाळलेले, अर्थात प्रेक्षणीय असे पाहून मला फारच कौतुक वाटलें. अगदीं लहान मुलें सुद्धां हत्तीजवळ जातात, पण हत्ती त्यांना कांहीं करीत नाहीं हें पाहून, मीहि अगदीं जवळ जाऊन त्याचे डोळे, तोंड, कान व सोंड यांची रचना लक्षपूर्वक पाहिली. आणि काय हें अजस्र शरीर, काय त्याचे सुपासारखे कान मागेंपुढें फडकत आहेत, सोंड व शेंपूट मागेंपुढें हलत आहे ! कांहीं पांढरे, कांहीं काळे, कांहींचे दोन दोन हात लांब व मोठ्या मुसळाएवढे दांत पुढें आलेले ! कांहींच्यावर मोठमोठ्या पेट्या, पेटारे, व पर्वतप्राय ओझीं लादलेलीं आहेत, कांहीं ओझीं चढविण्याकरितां बसलेले आहेत, आणि बसले आहेत तरी सामान चढविण्याकरितां एक शिडी लावावी लागतच आहे ! सामान वर गच्च बांधण्याला हत्तीजवळ कांहीं साधन नाहीं, सर्व शरीर वाटोळें. मग त्याच्या पोटाखालून. शेपटीखालून किंवा मानेखालून मोठमोठे सोल घालून अंबाऱ्यांसारखी सामान ठेवण्याची रचना केली असते; कांहींवर शोभेकरितां साज. झुली, घंटा बांधून कपाळावर आडवें गंध व शिरोभूषण घालून दरबार स्वारीकरितां ते तयार केले होते; आणि एवढ्या मोठ्या अजस्र जनावरांवर एक लहान मुलगा बसून तो लहान काठी घेऊन त्याला हवा तसा वळवतो आहे, हें पाहून तर मी अगदींच विस्मयचकित झालों ! असा सर्व साज ( शोभेच्या वस्तु ) घातलेला व आडवें गंध लावून बसलेला, असा पांढरा हत्ती पाहिला ह्मणजे विघ्नहर्त्या श्री गजाननाचेंच प्रत्यक्ष ध्यान मनांत येतें. इतकेंच नव्हे तर तो गणपति आपली सोंड हलवून तुह्मी खुशाल जा, तुमच्या प्रवासांत कांहीं विघ्न येणार नाहीं हा माझा तुम्हांला पूर्ण आशीर्वाद आहे असेंच दर्शवीत आहेसें मला दिसलें. मीहि सद्भावनेनें त्याला नमस्कार करून निघालों. कांहीं यात्रेकरू सद्भावनेनें त्याच्यापुढें दिडकी टाकीत. कोणी चवली

टाकीत, पण ती तो सोंडेनें घेऊन वर आपल्या धन्याजवळ देत असे; जणूं मी एवढा मोठा आहे खरा, पण पैशाचा उपयोग मला कांहीं समजत नाहीं, तूं याचा उपयोग माझ्याकरितां कर ! नंदीबैल जसे घरवाल्याजवळ पैसा मागण्याकरितां सामोरे जातात, तसे कांहीं हत्ती धन्याचे हुकमावरून यात्रेकरूंजवळ पैसा मागण्याकरितां जातात ! ! हत्ती आपल्याजवळ येत आहे असें पाहून यात्रेकरू पळूं लागतो, पण तुम्हीं भिऊं नका, त्याला दिडकी द्या म्हणजे तो तुम्हांला सोंडेनें सलाम करील व निघून जाईल असें त्याचा धनी सांगत असतो. त्याप्रमाणें त्याची कृति पाहून कोणाला कौतुक वाटणार नाहीं ? अशा हत्तींचे समुदाय मनुष्यांच्या गर्दीतून अगदीं पाऊल न वाजवितां रस्त्यावरून जातात. अगदीं जवळ येईपर्यंत पाऊलसुद्धां वाजत नाहीं; मग जवळच्या माणसानें, अरे हत्ती आला असें सांगावें व माणसानें दूर जावें असा प्रकार चाललेला असतो. पण कोणाला कधींहि इजा झालेली नाहीं ! येथें लग्नसमारंभाच्या किंवा कसल्याहि मिरवणुकीकरितां अगदीं गरिबासहि दहावारा सजवलेले हत्ती सहज मिळतात. हिमराजाच्या क्रीडांगणांतील त्याला शोभेशा या त्याच्या अजस्र बालकांचें हें कौतुक पाहून कोणाला आनंद वाटणार नाहीं ! अशी मजा पहात असतां, आमचें

## पासपोर्टाचें किंवा तिकिटाचें ऑफिस

जवळ आलें. तेथें यात्रेकरू व कंडीवाले यांची गर्दी होती. आमचे कुलीनें सांगितलें कीं, त्या ऑफिसमध्यें जाऊन आमचेसुद्धां सर्वांचे पास घ्या. आमचे कुली ब्रिटिश हद्दींतील होते व कंडीवाले नेपाळी ऊर्फ पहाडी होते. नेपाळी लोकांना पास लागत नाहींत. तें त्यांचें स्वराज्यच आहे. परक्याला मात्र पास पाहिजे. हा पास म्हणजे एका दिडकीएवढ्या पातळ कागदावर नुसता नंबर मांडून दिला असतो.

कागद मात्र नेपाळी असतो, हा आपलेकडील पातळ जुनरी कागदासारखा असतो, हें कसलें तरी चिठोरें असतें खरें, पण तें हरवतां कामा नये. हरवल्यास पुनः परत मागें येऊन तें घ्यावें लागतें, ह्मणून नोटपेक्षांहि. यास फार जपावें. हे पासपोर्ट सर्वांचे एका ठिकाणीं न ठेवतां ज्याचा त्यानें ठेवावा हें उत्तम. कारण मंडळी मागें पुढें चालते व मग पासाकरितां खोटी होते. आमच्या पासावर नंबर पांच हजाराच्या वर होता. अर्थात् यात्रा पांच हजार गेली होती. यात्रा पूर्ण आल्यास वीस हजारपर्यंत येते असें ह्मणतात ! आह्मीं गेलों त्या वर्षी यात्रा कमी आली होती असें ह्मणतात. याचें कारण गोरखपूरचा पूल पडला होता, व राजेसाहेब शिकारीकरितां तराईंत उतरले होते. राजे राजधानींत नाहींत, सबब यात्रेला परवानगीच मिळणार नाहीं, असें लोक बोलत होते; पण अखेर राजे येऊन यात्राद्वार मोकळें झालें.

या पुढचा सर्व प्रदेश वाळूचा असून त्यांत थोडी उंच वाळूची सडक आहे. हें हिमालयाचें क्रीडांगण आहे. जिकडे तिकडे वाळू व तिचीं मैदानें आहेत. कांहीं ठिकाणीं ऊंस व पानें यांचे मळे आहेत. सर्व यात्रा मोठ्या थाटानें चालली होती. या वाळूमध्यें पायीं चालणें सुखावह खरें. पण ह्याच वाळूंत, कांचेचे तुकडे, कांटे, दगडांच्या किंवा शिंपल्यांच्या बोंची असतात; त्यामुळें पाय कापतो. याकरितां पायांतला जोडा किंवा बूट सहसा काढूं नये. असें चालतां चालतां आह्मीं संध्याकाळीं ६ मैलांवर परमाणुपूर येथें आलों. व रात्रभर तेथेंच वस्ती केली.

## परमाणुपूर.

हें लहानसें खेडें आहे. येथें आपले ओळखीचे ठिकाणी कुली उतरले. उतरण्याची जागा मोठी व बंदोबस्ताची पडळ होती. जमिनीवर पेंढा व गवत पसरलें होतें. आमची मंडळी तें साफ करूं लागली तेव्हां

मीं सांगितलें कीं, तें थंडीच्या निवारणार्थ हंतरलें आहे, तें काढूं नका त्यावरच तुम्हीं आपले कपडे पसरा ह्मणजे झालें. प्रवासामध्यें स्पर्शास्पर्श किंवा एवढा विटाळ मानणें बरें नाहीं. या ठिकाणीं माणशीं एक आणा कर कुलीनें ठरविला होता. आह्मीं १६ व कुली ६ मिळून २२ मंडळी होती. यांपैकीं आमचे पैसे एक रुपया तुला देऊं, कुलींबद्दल कांहीं देणार नाहीं असें मी सांगितलें. हो ना करतां करतां आमचे दुकानचें सामान घ्या, मग कुलींचे पैसे दिले नाहींत तरी चालेल असें ठरलें. संध्याकाळीं रस्त्याचे बाजूला धान्य, भाजी, लांकडें वगैरे आवश्यक पदार्थांचीं दुकानें बसलीं होतीं, त्यांत बोरें होतीं तीं आह्मांला फारच आवडलीं. या ठिकाणीं दूध मात्र फारच महाग मिळत होतें, पण चहाकरितां आमच्या मंडळीनें तें घेतलें. या प्रवासांत दूध ६ ते ८ आणे व क्वचित् १० आणे शेरहि मिळत होतें; क्वचित् कोठें मिळतहि नसे !

थंडी गुलजार पडली होती, आमची रात्र येथें सुखानें गेली. पहाटेस चहा करून मंडळी निघाली. रस्ता सारखाच होता. यात्रेचा थाट मात्र पहाण्यासारखा होता, कोणी गजारूढ, कोणी अश्वारूढ, कोणी डोली, पालख्या यांत बसलेले, कोणी कंडींत बसलेले, कोणी पायीं चालणारे ! जो तो आपलें गाठोडें खाकोटीस मारून पुढें जाण्याच्या लगबगीनें चालला आहे, असा स्त्रीपुरुषांचा थाट फारच मजेनें चालला होता. थंडी फारच बहारीची पडली होती. वेळ सकाळची. सूर्यानें आपले तांबडे किरण पृथ्वीवर पसरून जिकडे तिकडे जणूं सडासारवण घातलें होतें; रस्त्याचे बाजूस ठिकठिकाणीं लहान मोठ्या झाडांच्या कुंड्या व भोंवतीं पाण्याचे पाट वहात होते. याप्रमाणें सृष्टिदेवी यात्रेकरूंचें स्वागत करण्यास तयार होती. मधून मधून थकलेल्या भागलेल्यांना ती वारा घाली. यामुळें आह्मीं किती चालून

आलों याची मला दादच नव्हती. पुढें १० वाजून गेल्यावर मात्र सूर्यानें आपलें पूर्वरूप टाकून दिल्यामुळें आह्मांला तो त्रासदायक झाला; इतका कीं त्याचें आह्मांला दर्शनसुद्धां नको ! पण त्याच्या साम्राज्यांत हें कसें घडणार ? कसा तरी त्याचा ताप सहन करीत आह्मी

## शिमराबसा

येथें आलों, तों ११॥ वाजले. या ठिकाणीं सर्व व्यवस्था केवळ यात्रेकरूंकरितांच केली होती. ठिकठिकाणीं झोंपड्या बांधल्या होत्या व त्यांत दुकानें ठेविलीं होतीं. ज्या ठिकाणीं उतरावयाचें तेथलेंच सामान घेतलें पाहिजे. येथें मात्र चट्टीला भाडें नव्हतें, पण महागाई फार होती. चार आण्यांचे लांकडानें चार माणसांचा स्वयंपाक सुद्धां होत नव्हता! या ठिकाणीं पाण्याची व्यवस्था मात्र फारच उत्तम होती. पुण्यांतील सदाशिव पेठच्या हौदाएवढा मोठा हौद बांधला असून त्याला नळानें पाणी आणलें होतें. नळ एकसारखा वहात होता यामुळें हौद नेहमीं भरलेला असे. अतिशय उन्हांतून थकून आल्यामुळें हा हौद पाहून सर्वांना फारच आनंद झाला. या ठिकाणीं बद्रिनारायणाच्या मार्गाप्रमाणेंच विस्तृत, बंदोबस्ताच्या व सोईच्या चट्ट्या होत्या. स्वयंपाकाला मोठीं भांडीं मिळत पण तीं नियमित असत. या ठिकाणीं आमचा कुली चुकला तो एक तासानें आला ! भांडीं आल्याशिवाय काय करावयाचें !! तो पुढें गेला, किंवा मागें राहिला हें कांहींच समजेना, तेव्हां आमचे कुली म्हणाले, घाबरूं नका, तो मागें झाड्याला बसला होता, लवकरच येईल; त्याला पुढें जातांच येत नाहीं हीच मुक्कामाची जागा आहे; तुह्मीं स्नानें आटपा ह्मणजे झालें. त्याप्रमाणें आह्मीं स्नानें आटोपून सिधासामान, लांकूडफांटें घेतलें, इतक्यांत तो कुली आला व आमची सर्व व्यवस्था लागली. आमचे कुली ह्मणाले, लवकर आटपा, पुढें

आठ मैलांचें मोठें जंगल आहे, त्या जंगलाच्या पार संध्याकाळपर्यंत गेलें पाहिजे; मध्यें राहण्याची सोय नाहीं, तीन वाजल्यापुढें येथून निघण्याचा हुकूम नाहीं, त्याप्रमाणें जलदी करून आह्मीं तीन वाजतां निघालों, तों तेथूनच

## मोठें जंगल

लागलें. हिनराजाचें आंगणें सरून त्यानें आपणांस बसण्याकरितां हें हिरव्यागार लतावृक्षांचें आसन घातलें आहेसें वाटतें. जंगल मोठें असल्यामुळें व हिंस्र जनावरांच्या भीतीमुळें सडकेच्या दोन्ही बाजूला सुमारें वीस वीस फूट रुंद जंगल खच्ची केलें होतें. यामुळें त्याचा भयाणपणा थोडा कमी झाला होता. माणसें फारतर ३।४ तासांत ८ मैल जातील, पण भरलेल्या बैलगाड्या ह्या रेताडांतून लवकर कशा जाणार? सबब येथें प्रत्येक दोन मैलांवर मागच्यासारखे पुष्करणी हौद बांधले आहेत. ह्या जंगलांत पाणी नाहीं. पण तें लांबून नळानें आणून ह्या अरण्यांत प्रत्येक २ मैलांवर असे हौद बांधले आहेत. रस्ता पुळणीचा असल्यामुळें ओझ्याची गाडी जनावरांना ओढण्यास जड जाते; सबब दोन दोन मैलांवर ते तळ देऊन राहतात. २५।३० गाड्या एकत्र असल्याशिवाय ह्या जंगलांतून जात नाहींत. जंगलाच्या मध्यभागावर एक अशीच पुष्करिणी आहे, तेथें मात्र गाडेकऱ्यांच्या बंदोबस्ताकरितां पोलिस स्टेशन आहे, पण तेथें यात्रेकरूंच्या सोईकरितां धर्मशाळा नाहीं. मी जलद चालून सर्व जंगल ओलांडून पलीकडे गेलों तों सूर्यास्त होऊन अंधार पडत चालला होता. या ठिकाणींही यात्रेकरूंकरितां दुकानें व मागच्यासारखी पुष्करिणी होती; पण राहण्यास झोंपड्या नव्हत्या. पलीकडे गावांत जाऊन वस्ती करावी ह्मणून जाऊं लागलों, तों पोलीसनें मज्जाव केला. यानंतर अवेळ झाल्यामुळें पुढें जाण्याचा हुकूम नाहीं असें तो ह्मणाला, मीं म्हटलें, आम्हीं पुढें

जान नाहीं, एका घरांत वस्ती करितों, आह्मांला रस्त्यांत उघड्या जागेवर राहणें सोसणार नाहीं; पण त्यानें ऐकिलें नाहीं. तेव्हां त्याची थोडीशी समजूत घालून एका दुकानदाराच्या मांडवांत माणशीं एक आणाप्रमाणें देण्याचें ठरवून जागा घेतली व रस्त्यावर आमच्या मंडळींची वाट पहात बसलों. रात्रीं ९ वाजले तरी मंडळी दिसेना. सकाळचे १२ मैल व हे ८ मैल मिळून वाळूंतून २० मैलांची आज दौड झाली. पण त्यास उपाय नव्हता. मध्यें मुक्कामाला ठिकाण याशिवाय चांगलें नव्हतें. मंडळी बसत बसत एकदांची आली. या ठिकाणाचें नांव

## भिक्षाथोरी

होतें. ही वसाहत यात्रेकरूंकरितांच होती. मंडळी आली, त्यावेळीं त्यांनीं त्या मैदानावर असंख्य यात्रेकरूंचा जमाव पाहिला. जिकडे तिकडे मैदानावर चुली व दिवेच दिवे दिसत होते. पाण्यावर व दुकानांवर जिकडे तिकडे गर्दीच गर्दी! जसजसा पशुपतिनाथ जवळ येत चालला, तसतशी गर्दी मनस्वी होत चालली. माणसांची चुका-चुकी व चोऱ्या यांचेंहि प्रमाण वाढलें. नेपाळ सरकारनें यात्रेकरूंचा संबंध कोणत्याहि गांवच्या लोकांशीं करूं दिला नाहीं. यात्रेकरूंचा तळ कोणत्याहि गांवीं होतां कामा नये. त्यांचीं दुकानें व उतरण्याच्या जागा बहुधा अगदीं स्वतंत्र राखिल्या होत्या. शिवाय सर्व गांवकऱ्यांस सक्त ताकीद होती कीं, कोणीहि यात्रेकरूला घरांत पैसे घेऊन किंवा फुकटखुद्दां आश्रय देतां कामा नये. बरें चट्टयाहि फारशा नव्हत्या. यामुळें यात्रेकरूंना मैदानांत उघड्यावर पडल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. पन्नास पन्नास मैलांवरून लोक येथें यात्रेकरूंकरितां दुकानें घालण्यास आले होते! मी त्यांस विचारिलें, तुमीं एवढ्या लांबून इतका खर्च करून आलां, तर तुम्हांस फायदा तरी काय होतो? ते ह्मणाले या

यात्रेच्या १० दिवसांत आह्मांला खर्च वेंच जाऊन सबंध वर्षाची प्राप्ति होते ! ! आह्मीं येथें यात्रेकरूंकरितां चट्टया बांधल्या असत्या, परंतु नेपाळ सरकारची परवानगी नाहीं. शिवाय एवढा मोठा खर्च केवळ १० दिवसांकरितां करून तसा फायदाहि होणार नाहीं. यामुळें यात्रेकरूंना हाल सोसावे लागतात. आपल्या रयतेशीं यात्रेकरूंचा संबंध जडल्यास चोऱ्या वगैरे होऊन भांडणतंटे होतील व मग न्याय करण्याचा प्रसंग येईल तो येऊं नये ह्मणून नेपाळ सरकारचा हा नियम झाला असावा.

दुकानांमध्यें तेलाची मिठाई, भजीं, बोंडें व असेच चवींचे पदार्थ मिळत. शिधा सामान सर्वत्र मिळतें. येथून पुढें संत्रें व केळीं मिळूं लागलीं. यावरून तीं या ठिकाणीं उत्पन्न होत असावीं असें दिसतें. संत्रीं नामांकित नव्हतीं. पण त्यांनीं या प्रवासाला फारच मदत केली. याशिवाय या ठिकाणीं वांगीं बटाटेहि मिळत होते. दूध मात्र क्वचित् मिळे. यामुळें आमच्या मंडळींतील चहाचे तल्पी मनुष्यांची फारच फजीती होत असे. पण ती मंडळी फारच खमंग होती. त्यांनीं आपल्याबरोबर चांगले उंची पेढे घेतले होते. ते ह्मणाले, आह्मांला चहा मिळाला ह्मणजे श्रमांची कदर मुळींच वाटत नाहीं. इतके ते चहाचे व्यसनी झाले होते. आमची मंडळी बरीच थकल्यामुळें फराळ करून चहा घेऊन निजली.

दुसऱ्या दिवशीं पुन्हां पहांटे उठण्याचा तगादा होताच. सर्व लोक त्रिझालेल्या झगऱ्या पुनः तयार करून हुक्कापाणी करून चालूं लागले. आह्मींहि तयारी करून शौचविधि मुखमार्जन करून चालूं लागलों. मला या यात्रेची माहिती नव्हती, व कुलीहि तसें कांहीं सांगतना. हिमालयांत पायीं प्रवास कसा करावा याबद्दल मी ' माझी तीर्थयात्रा भाग १ ' यांत सांगितलें आहे त्याप्रमाणें मी पहांटे उठे, सर्व मंडळीला

कुलींसुद्धां सर्वांना पुढें रवाना करी व आपले जागेंत कांहीं शिल्लक सामान राहिलें नाहीं अशी मी आपली खात्री करून घेतल्यावर निघत असें. माझी चाल इतरांपेक्षां जलद असे यामुळें मी सर्वांच्या पुढें जाऊन दहा वाजून गेले ह्मणजे विश्रांतीकरितां जागा पाहून ठेवीत असे; याप्रमाणें चाललें होतें.

गांव सोडतांक्षणीं आमचा मार्ग एका नदींतून निघाला. ही नदी मोठ्या विस्तीर्ण रुंद पात्राची होती, पण तींत पाणी मात्र क्वचित् ठिकाणीं अगदीं लहान प्रवाह-रूपानें असे. बाकी सर्व नदींत दगड गोटे याशिवाय कांहीं नाहीं. नदीच्या दोन्हीं बाजूंस मोठें जंगल असून नदीशिवाय दुसरा मार्गच नव्हता. या नदीवर ठिकठिकाणीं लोखंडी पूल बांधण्याचें काम चाललें होतें. हे पूल कशाकरितां तर रेल्वेकरितां असें सांगत. मागें एके ठिकाणीं रेल्वेचे रूळ, लाडिसाचीं चाकें व लांकडी फ्लाट्स यांचे ढीग दिसले खरे. ही रेल्वे सरकारी असल्या-मुळें जेथें तेथें कुली व एंजिनियर यांची गर्दी होती. यात्रा मुंगीसारखी चालली होती. असें होतां होतां दहा वाजले पण नदी कांहीं संपेना. नदींत पाण्याच्या आश्रयानें कांहीं झोंपड्या लागत, पण तेथें उतर-ण्याची सरकारची मनाई ! कारण त्या झोंपड्या मजूर लोकांकरितांच केल्या होत्या. अखेर १२ वाजले तेव्हां नदी संपली. आतां उतरण्याचें ठिकाण लागेल ह्मणून पाहिलें, पण गांव लागलें नाहीं, पुढें २ मैलांवर एक ओढा लागला, तेथेंसुद्धां झोंपड्या दिसल्या. पण तेथेंसुद्धां पुलाचें काम चाललें होतें त्याच्या त्या होत्या यामुळें तेथें उतरण्याची सोय नव्हती. ओढ्यावर उतरावें तर खालीं वाळू तापलेली, झाड ना झूड, शिवाय शिधा पाण्याकरितां दुकान नाहीं, तेव्हां उतरतां येईना. मग आणखी एक मैल पलीकडे गेलों, तेथें यात्रेकरूंकरितांच झोंपड्या बांधलेल्या दिसल्या. पाणी जवळच नदी होती. या ठिकाणाचें नांव

## हेटोडा.

येथें येण्यास मला दोन वाजले ! उतरण्यास जागा ठरवून थोडी विश्रांति घेतली. डोळे रस्त्याकडे ठेविले होते पण आमची मंडळी कांहीं दिसेना. यात्रा मात्र चालली होती. अखेर तीन वाजले, तेव्हां मंडळी पहाण्याकरितां परत फिरलों, तों मागच्या ओढ्यावर आमच्यापैकीं कांहीं बायका स्नान करून फराळ करीत होत्या. बाकीची मंडळी कोठें आहे म्हणून विचारतां ती अजून फार लांब आहे असें म्हणाल्या. उतरण्याचें ठिकाण कोठें आहे म्हणून त्यांनीं विचारलें. तें अजून एक मैलावर आहे असें त्यांस सांगतांच त्यांचें पायच मोडले !! अखेर सर्व मंडळीसुद्धां हेटोड्याच्या पर्णकुटींत आम्हीं पांच वाजतां पोंचलों. यापुढें जेवणखाण होण्यास रात्रीं ८ वाजले. हाहि दिवस आह्मांला त्रासाचाच गेला. मजल ह्मणजे फार आलों असें नाहीं. सारी बारा मैल मजल झाली, पण नदीच्या रेताडानें फारच त्रास दिला. वरून उन्हाचा कडाका व खालून वाळू तापलेली, जरा कोठें विश्रांति घेईन ह्मणावें तर रस्त्यावर कोठें झाडसुद्धां नाहीं. मंडळी जुन्या मताची असल्यामुळें बायकांच्या पायांत जोडा नाहीं. स्नान केल्याशिवाय खाणें नाहीं. यामुळें हा त्रास विशेष जाणवला. याकरितां प्रत्येक यात्रेकरूनें हिमालयाच्या धर्माप्रमाणें खिशांत किंवा जवळ आपणांला योग्य असें खाणें ठेवावें; व पाणी मिळतांच स्नान वगैरे जशी आपणांस पाहिजे असेल तशी शुद्धी करून खात जावें. ह्मणजे हुशारी राहील व आजारी पडण्याचा संभव कमी होईल.

ह्या ठिकाणीं पोह्यांचे मोठमोठे कारखाने आहेत. प्रत्येक झोंपडींत पोह्यांचा डंका आहेच. व त्यांचे घाव रात्रंदिवस चालूच असतात. पोह्यांस ह्या बाजूला चिवडा ह्मणतात. सर्व ठिकाणच्या पोह्यांपेक्षां येथील पोहे फार नामांकित आहेत, व यात्रेकरू यांचा फार संग्रह

करितात. यात्रेकरू हे पोहे बाधूं नयेत ह्मणून भिजवून थोडा वेळ ठेवून फुगले ह्मणजे आंत तिखट मीठ किंवा गूळ साखर घालून खातात. हा इकडील लोकांचा आहार आहे, पण आपला नाहीं. सबब फार खाऊं नयेत. आपला आहार ह्मणजे जवळ फराळाचें असेल तेंच खावें. कोरडे पोहे खाऊन पाणी प्याल्यानें अवश्य बाधतात, आंतडीं बिघडतात, व ढेंढाळी सुरू होते; सबब जपून वागावें. आमच्या जवळील एक बाई पोहे चांगले लागतात, चांगले लागतात, असें ह्मणून खाऊन फसली. तिचा आजार बरा होईना, मग खालीं आल्यावर तिची प्रकृति सुधारली. त्या पाण्यावर औषध सुद्धां लागू पडेना !

या ठिकाणीं आमच्याबरोबरच्या बायकांनीं स्नान करून लुगडीं वाळत घातलीं होतीं. जेऊन रात्रीं पहातात तों एकीचें लुगडें नाहीं ! रात्र अंधारी, व सर्वच लुगडीं नजरेसमोर कशीं राहणार ? ह्मणून झोंपड्याच्या आसपास सर्वांनीं लाविलीं होतीं; पण जेथें चोरी करण्याचा इरादाच आहे, तेथें जपणारा तरी किती जपेल ! बदरीनारायणाप्रमाणें येथील पहाडी लोक प्रामाणिक नाहींत. असा प्रसंग आल्यास सर्वांनीं आपले कपडे मैदानावर एका स्वतंत्र जागीं चक्क मातींत घालावे, व त्यावर एकाची राखण ठेवावी. यात्रेकरूंनीं ह्या व अशाच दुसऱ्या ठिकाणीं आपल्या वस्तूंविषयीं सावध रहावें ह्मणून ही सूचना मुद्दाम केली आहे.

रात्रभर आह्मीं या ठिकाणीं राहिलों. दुसरे दिवशीं पहांटे उठून शौचविधि, मुखमार्जन करून, चहा करून घेतला, कारण त्याशिवाय आमच्या मंडळीस कंटकपणा येत नाहीं. चहाचा बेत केल्यामुळें जरा उजडलें. सर्व यात्रा केव्हांच गेली. या ठिकाणीं एक दोन मंडळी थकल्यामुळें त्यांस कंडी करून दिली. असे कंडीवाले मध्यें मध्यें

मिळतात. पण ते प्रामाणिक नसतात. ते वाटेल तो ठराव करतात, व ठरावाप्रमाणें त्यांस प्रथम एक तरी रुपाया द्यावा लागतो. तो दिला म्हणजे जेमतेम एक मजल जातात व दगाबाजी करून नाहींसे होतात. त्यांचीं घरें जवळपासच असतात, व अशा रीतीनें ते जवळपास जाण्याची कंडी करून पैसे मिळवितात. लांबचे कंडीवाले केले तर मालकापासून शक्य तितके जास्त पैसे उपटण्याचा त्यांचा कल असतोच. कंडी मुख्यतः बायकांकरितां करावी लागते. व हे कंडीवाले दारुडे ह्मणजे दारू पिणारे असतात. ते दारूच्या नादांत एकादे वेळीं त्यांना वाटेल तशा शिव्या देतात. भाषा समजेल त्याला तें असह्य वाटतें. पण जंगली लोकांच्या प्रत्येक शब्दास शिवी असते, हें ज्याला माहीत आहे त्याला त्याचें कांहीं वाटत नाहीं ! आपण फारसें तिकडे लक्ष देऊं नये व त्यांच्या संतोषाकरितां पैसे खर्च करूं नयेत. पण त्यांस वचक बसण्याकरितां मी पुरुषांना सांगेन, पैसे देणार नाहीं, फार गडबड करशील तर पोलीसचे स्वाधीन करीन वगैरे बोलावें.

या ठिकाणापासून डोंगराळ मुलूख लागला. येथून हिमालयाच्या घरास आरंभ झाला. हिमालयाचीं हीं सुंदर लहान मोठीं गोंडस बालकें अंगांत वनश्रीचीं झबलीं घालून, डोक्यांवर ढगांच्या व सूर्य किरणांच्या टोप्या कुंच्या घालून व रस्त्यांच्या सडकांच्या माळा घालून नदीच्या पात्रांत डुंबत आहेत असें वाटलें ! यांत कांहीं लहान व कांहीं बरींच मोठीं, अगदीं प्रौढ वयांत आलेलीं हिमालयाच्या बरोबरीचींहि होतीं. वर्ष दोन वर्षांच्या अंतरानें असलेलीं एकाद्याचीं सर्व मुलें एका ठिकाणीं दृष्टीस पडल्यास जसें कौतुक वाटतें, तसें ह्या रस्त्यानें जातांना व ही लहानमोठ्या डोंगरांची शोभा पहातांना मला वाटलें. असे डोंगरांचे पडदे व पूल उलटींत असतां मला ११ वाजले

ह्या वाटेनें जातांना मला एक इंग्रजी जाणणारे काशीकडचे वकील भेटले. ते या यात्रेचे माहितगार होते. खुद्द नेपाळच्या राजाच्या राजकुमारांना शिकविण्यासच ते होते. त्यांना व त्यांच्या कुटुंबाला नेपाळी हवा न मानवल्यामुळें ते परत गेले. त्यांच्या सहवासानें व सकाळची थंड वेळ असल्यामुळें आह्मीं किती मार्ग चाललों याचें मला भानच राहिलें नाहीं. अखेर १२ ॥ वाजतां

## भीमफेरी

येथें आलों. हा गांव मात्र अगदीं प्रथम लागलेल्या वीरगंजाप्रमाणेंच होता. मात्र यांत धर्मशाळा नव्हत्या ही अत्यंत मोठी उणीव होती. येथें आल्यावर पोलिसांनीं आह्मांला अडविलें व बसा ह्मणाला. या ठिकाणीं डॉक्टरची तपासणी होऊन पुढें जाण्यास नवे पास मिळतात. डॉक्टर फारशी तपासणी करीत नाहींत, कारण जे इतक्या लांब ह्मणजे ६० मैल चालत आले त्यांच्या शक्तीची आणखी काय तपासणी करावयाची राहिली? जे लोक कंडींत बसून येतात किंवा पालखीसारख्या वाहनांत बसून येतात त्यांची थोडीबहुत तपासणी करितात पण उत्तर हिंदुस्थानांत प्लेगसारखे सांथीचे रोग कोठें उद्भवल्याची बातमी नसेल तर फारशी तपासणी करीत नाहींत. ही तपासणी दूषित हवेचीं रोगबीजें त्या राज्यांत शिरूं नयेत एवढ्यापुरतीच आहे वृद्ध किंवा अशक्त यांकरितां नाहीं. सर्व यात्रा तमाम बसली होती. मग कांहीं वेळानें डॉक्टरसाहेब आले व त्यांनीं जुने पास घेऊन नवे पास देण्यास सुरुवात केली. पास घेतल्यावर मी उतरण्यास जागा पाहूं लागलों तों जागा कोठें मिळेना. त्यांनीं सांगितलें कीं, या गांवाचा दुसरा भाग नदीपलीकडे आहे, तेथें यात्रेकरूंकरितां धर्मशाळा बांधिली आहे तेथें उतरावें. तेथें शिधा सामान, राहण्याच्या वगैरे सर्व सोई बऱ्या आहेत. मग मी आपल्या मंडळीचा शोध करूं

लागलों. दोन वाजले तरी त्यांचा पत्ता नाहीं, मग अनुमान केलें कीं ही सर्व मंडळी तिकिटांचे तेथें अडली असेल. मग मी फिरून तिकिटांचे ठिकाणीं गेलों, तों तेथें आमची कांहीं मंडळी बसली होती ! तुह्मी पुढें कां येत नाहीं असें त्यांस विचारतां ते ह्मणाले, आमचे पास मागील मंडळीजवळ राहिले ! ती मंडळी बसत बसत चार वाजतां आली व पुढें पास बदलून मुक्कामाला आलों तों सहा वाजले ! ! त्याबरोबर धर्मशाळा गच्च भरून गेली, राहण्यास सुद्धां जागा मिळेना ! मग मोठ्या प्रयत्नानें धर्मशाळेच्या मॅनेजराची गांठ घेऊन आह्मी मुंबईकडचे व्यापारी असून आमचेबरोबर बायकामंडळी पुष्कळ आहेत, तरी आह्मांला शिलकी ठेवलेल्या जागांपैकीं थोडी तरी जागा द्या म्हणून विनंति केली. तो ह्मणाला, ही जागा सरकारी नोकरांकरितां राखली आहे, ही श्रीमंतां-करितां, ही जहागिरदारांकरितां, अशा सगळ्यांच्या वर्ण्या लागल्या होत्या. पण विशेष विनवणी केल्यामुळें कशी तरी जागा मिळाली. ह्या ठिकाणीं सरकारी सदावर्त होतें. त्याची व्यवस्था माडीवर होती, ती पाहून मला आनंद झाला. एका मोठ्या द्रोणांत एका मनुष्याला पुरतील इतके सडीक तांदूळ व त्याच्यावर एक मोठी कागदाची पुडी, मीठ, मिरची, हिंग, जिरें, गूळ व पीठ यांच्या पुड्या घातलेली, होती. असे शेंकडों द्रोण तेथें ठेविले होते. जो कोणी सदावर्त मागेल, त्याला तो द्रोण व चार पांच लांकडें अशीं द्यावयाचीं. रात्रीं ११ वाजून गेले ह्मणजे तेथील मुख्य अंमलदार शिलकेची तपासणी कर-ण्यास येई. गोसाव्यांची नोंद असल्यामुळें हा अजमास समजे. हें पाहून मी खालीं आलों. मग पाण्याची सोय पाहूं लागलों तों एका खांबाला दोन तोट्या असून त्यांवर शेंकडों लोक, कोणी हांडे, कोणी घासलेटचे डबे, कोणी तांब्या घेऊन पाण्याकरितां बसले आहेत.

सर्वांची एकच वेळ असल्यामुळें भांडणें, तंटे, ढकलाढकली चालली होती ! आतां पाणी मिळणार कसें ? आणि स्वयंपाक, वृद्ध बायांचीं स्नानें, त्यांचें सोवळें ओवळें होणार कसें ? मग एका पोलीस शिपायाचे मदतीनें दोन घागरी पाणी मिळवून एका बाईला कसें तरी स्नान घालून स्वयंपाकाला लावली. रात्रीं ९ वाजतां थोडी गर्दी कमी झाल्यावर बाकीच्यांचीं स्नानें झालीं व जेवणें झालीं तों ११ वाजले ! ! ह्मणजे सकाळीं बारा वाजतां आलों ते रात्रीं ११ वाजतां अन्न मिळालें ! ! ! सर्व दिवस उपास, स्नान फराळाविरहित तो सगळा दिवस त्रासाचा गेला. याचें कारण मार्गाची किंवा सोईगैर-सोईची माहिती नाहीं. प्रथम तिकिटांकरितां खोटी झाली, ह्मणजे ज्यानें त्यानें आपापलें तिकीट ठेवलें असतें तर असा घोंटाळा होताना. बरें ज्याजवळ तिकिटें आहेत, त्यानें तरी पुढें यावें तर तेंहि नाहीं ! असा त्रास पडूं नये ह्मणूनच हें पुस्तक लिहिणें भाग झालें आहे.

भीमफेरी हा गांव उत्तम, मोठ्या रहदारीचा, बाजार मोठा, दवाखाना, सरकारी कचेऱ्या, पोलीसचा बंदोबस्त, पाण्याचे हौद व तोट्या आहेत, असें वर्णन जिकडे तिकडे आहे. आणि तें खोटेंहि नाहीं, अगदीं खरें आहे. पण अडचणी काय येतात आणि त्यांचें निवारण कसें करावें, याचा पत्ता नाहीं, मग त्या वर्णनांत अर्थ काय ? आणि यात्रेकरूला या ठिकाणीं मुक्काम करणें भागच येतें. कारण यापुढें शिसा गढीची भयंकर चढण व उतरण येते. ह्मणजे तो निदान सहा तासांचा रस्ता आहे. तेव्हां ही चढण चढावयास सकाळींच आरंभ करावा लागतो. ह्मणजे रात्रीं येथें प्रत्येकास मुक्काम करावाच लागतो. अगोदर यात्रेकरूला उतरण्याला पुरेशी धर्मशाळा नाहीं आणि दुसऱ्याचे घरीं उतरण्यास सरकारची परवानगी नाहीं ! तीच गोष्ट हौद, पुष्करिणी व नळ यांची. पाण्याचे हौद नळ आहेत-

पण ते ज्या ठिकाणीं आहेत, त्या ठिकाणीं सरकारी ऑफिसें व्यापाऱ्यांचीं दुकानें आहेत. तेथें यात्रेकरूंना उतरण्याची सोय नाहीं, मग त्या हौद व नळांचा उपयोग काय? याकरितां भीमफेरली येण्यापूर्वी मार्गांत सर्वत्र नद्या आहेत, त्या एका नदीच्या कांठीं झाडाखालीं किंवा सोईच्या ठिकाणीं उतरून स्नान, भोजन उरकून घेऊन संध्याकाळीं ५ चे किंवा ६ चे आंत वरील धर्मशाळेच्या ठिकाणीं विश्रांतीकरितां यावें. जेवण करण्याकरितां येथें कधींहि येऊं नये. ही गोष्ट पक्की लक्षांत ठेवावी.

हा गांव फार रहदारीचा आहे. नेपाळ सरकारचें घाटाखालचें हें मुख्य ठाणें आहे. येथपर्यंत सडक असल्यामुळें सामानाच्या गाड्या, टांगे, मोटारी, स्वारी शिकारीचे व ओझ्याचे हत्ती यांचे येथें तळ पडलेले असतात. तसेंच येथपर्यंत येऊन जे थकले असतील त्यांच्याकरितां कंडी व झंपानवाले यांचीहि गर्दी असते. शहरच्या दोन भागांमध्यें एक विस्तीर्ण पात्राची कोरडी नदी आहे, तेथें हे तळ बहुधा पडलेले असतात. दोन्ही भागांत दुकानें व सरकारी ऑफिसें जरूर तसतशीं ठेविलीं आहेत. येथपर्यंत येऊन थकले असतील व ज्यांस चढाव चढण्याची ताकद नाहीं अशा लोकांस येथें कंड्या झंपानें वगैरे वाहनें मिळतात. कंडी करणारास नेपाळ सरकारचा प्रत्येक कंडीस कंपनी ३।४ आणेप्रमाणें कर आहे. टेंकडी चढण्यापूर्वी तेथें एक सरकारी ऑफिस आहे, तेथें कंडीचे पैसे भरून पावती घ्यावी लागते. कुली बदलल्यास नाहीं तर ही पावती जातांना व येतांना चालते. पण कुली बदल्यास पुनः पैसे भरावे लागतात! ओझ्याचे कंडीवाल्यास पैसे पडत नाहींत. हे कंडीचे पाससुद्धां ज्याचे त्यानें ठेवावे. ठिकठिकाणीं तपासण्या होतात तेथें दाखवावे, नाहींतर पुढें जाऊं देत नाहींत.

## सीसागढी

ही गढी व यापुढच्या गढ्या चढण्यास फार कठीण आहेत. थकून भागून आल्यावर तर त्या विशेष त्रासदायक होतात. ह्मणून नुसत्या गढ्या चढण्याउतरण्यापुरतेहि ठिकाठिकाणीं कंडीवाले मिळतात, जरूर तर त्यांचा उपयोग करावा. आमची मंडळी प्रात:काळीं शौचविधि, मुखमार्जन व चहा करून घेऊन निघाली. यात्रेकरू सूर्योदयापूर्वींच निघाले होते. गांव सरतांच टेकडी चढण्यास आरंभ होतो. टेकडीच्या तोंडाशीं शिपाई असतो, तो माणसांच्या कंडीवाल्यांचे पास पहातो पास नसल्यास तेथें जवळच पास देण्याचें ऑफिस आहे, तेथें कंपनी ३।४ आणे कर देऊन पास घ्यावा लागतो. कुली बदलला नाहीं तर तो पास सर्वत्र चालतो. कुली बदलल्यास पुन: पैसे भरून काढावा लागतो. हा पासही ज्याचा त्यानें ठेवावा म्हणजे मध्यें तपासणीचे वेळीं अडथळा होणार नाहीं. याप्रमाणें पास घेऊन टेंकडी चढूं लागलों. टेंकडीवर जाण्यास प्रशस्त सडक आहे. आकार सडकेचा आहे, पण त्यापेक्षां पायवाट बरी, इतकी ती खराब आहे! सर्वत्र गाटे गोटे आहेत व चढाव फारच उंच आहे. पाऊल ठेवतांना जपून ठेवावें लागतें, नाहीं तर पाय घसरण्यास वेळ मुळींच लागणार नाहीं. यामुळें एकपट वेळ लागावयाच्याबद्दल तिप्पट वेळ लागतो, व थकवा जास्त येतो. शिवाय इतकें जपून चाललें तरी एकादे वेळीं तरी पाय घसरतोच! आणि तें अपरिहार्यहि आहे. पण सडक रुंद असल्यामुळें केवळ डोंगराखालीं गडगडून जाण्याचा संभव नसतो. ही टेंकडी त्रासदायक वाटण्याचें दुसरें कारण असें आहे कीं, या टेकडीवर झाडझूड वगैरे मुळींच नाहीं, यामुळें ऊन फार लागतें, आणि तें समप्रमाणांत वाढत जातें. ह्मणजे, जसजसें आपण थकून भागून वर जावें, तसतसें तें दिवस वर आल्यामुळें जास्त होतें,

यामुळें यात्रेकरू नाउमेद होतो. पण येथील नेपाळी गुरखे लोक बरोबर तीन तीन बंगाली मण लोखंडाचे गरडल, तुळ्या, खांब, पेटारे वगैरे अवजड वस्तु पाठीवर बांधून सहज नेतांना पाहून त्यांच्या सामर्थ्याचें आश्चर्य व कौतुक वाटतें ! मोठमोठ्या मोटारी उखडून त्यांचे सांगाडे ५०।५० असामींचे ताफे करून एकजुटीनें वाहून नेतात ! ! त्याचप्रमाणें अवजड यंत्रांचे भागही नेतात. कोणी कोणी लोखंडी बीम्स, सागवानी तुळ्या व मोठमोठाले पेटारे पाठीवर घेऊन खुशाल जातात. धन्य त्यांची ! ! ! आपली शक्ती त्यांच्या पासंगासही लागावयाची नाहीं. त्यांच्याकडे पाहिलें ह्मणजे आपल्या श्रमांचें हसूंच येतें, काय ही अचाट शक्ती व दमदारपणा हिमालयाच्या मुलांचा ? हा जर राष्ट्रकार्याकरितां खर्च झाला असता तर हिंदुस्थान देश सर्व जगास अजिंक्य झाला असता, पण त्यांची शक्ती केवळ पशूसारख्या कार्याकडे लावावी लागत आहे हें देशाचें दुर्भाग्य आहे. पण जेव्हां केव्हां देशाचा उद्धार होणें असेल, तेव्हां तो अशाच सारख्या लोकांकडून होईल, सुशिक्षित लोकांकडून मुळींच होण्याचा संभव नाहीं. मात्र त्यांचें नियंतृत्व एकाद्या कर्तृत्वसंपन्न मनुष्याकडे असलें पाहिजे. जेव्हां जेव्हां राज्यक्रांति होते, तेव्हां तेव्हां ती अशाच लोकांच्या कर्तृत्वानें होते. लॉर्ड बेकननें इंग्लिशांना हाच उपदेश केला कीं, राष्ट्राचें सामर्थ्य तरवारींत असतें. ज्याची तरवार लवली त्याची मान लवलीच ह्मणून समजावें. रामकृष्णांना व सर्व अवतारांना देवत्व आलें तें मुख्यत: पराक्रमानेंच आलें. कपिल महामुनींसारख्या तत्वज्ञाला तितकें आलें नाहीं. शिवाजी, बाजीराव यांचे उत्सव करण्याचें कारण तरी हेंच, कीं, जे लोक राष्ट्राचें तेज वाढवितील तेच श्रेष्ठ होतील. निदान जगतील तरी. त्यांचा निर्वंश होणार नाहीं ! हल्लीं हिंदुस्थानांतील लोकांचें लक्ष शक्तीवरून उडून विद्येकडे लागलें

आहे. क्षत्रियसुद्धां मोठे विद्वान होण्यांत भूषण मानीत आहेत. पण हा त्यांचा अध:पात आहे. ‘परधर्मो भयावह:’ हें भगवंतांचें वाक्य त्यांनीं लक्षांत ठेवावें. अशानें विद्याहि पुरी होणार नाहीं आणि शक्तीही जाईल! अशानें ते आपल्या क्षात्रत्वाला कायमचे मुकतील! जो तो आपलें कर्तव्य सोडून या घाणेरड्या नि:सत्व विद्येच्या पाठीं लागून यूरोप अमेरिकेपर्यंत जाऊन आपल्या शरीराची खराबी करीत आहे, हें हिंदुस्थान देशाचें नष्टचर्यच आहे. विद्वान स्त्रीपुरुषांस बहुधा संततीच होत नाहीं. झाल्यास निर्बळी व नि:सत्वच होते, असें इतिहासाचें तत्व आहे. आपलीं पुस्तकें खपावीं व आपणांस पैसे मिळावे यापेक्षां अशिक्षित वर्ग सुशिक्षित करण्यांत सुशिक्षितांचा कांहीं उद्देश दिसत नाहीं; पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं कारण जिवंत विद्येचें अस्तित्व जिवंत देशाशिवाय मिळणें शक्य नाहीं. हल्लीं जी हिंदुस्थानांत विद्या शिकविली जाते, ते व्यर्थ श्रम मात्र आहेत; पैसा, काल व शक्ती यांची व्यर्थ हानी आहे. फार काय हल्लीं सुशिक्षितांनीं परक्यांच्या अनुकरणानें जो जीवनक्रम आंखला आहे तो सर्वच चुकीचा, मनोदौर्बल्याचा, पिछेहाटीचा आहे. तो कसा हें दाखविण्याचें हें स्थळ नाहीं. त्याचें दिग्दर्शन माझ्या आरोग्याचे निबंधांत आहे. याचे योगानें शरीर व मन नि:सत्व होऊन, व्यर्थ चोचले वाढून, त्यांचा परिणाम शक्तीवर होत आहे व व्यर्थ द्रव्य व आयुष्यहानी होत आहे. या गोष्टीचीं उर्फ या सुधारणेचीं फळें जगाच्या निदर्शनास येतच आहेत. नेपाळ सरकारही नवीन सुधारणेस भुलून रेल्वे करीत आहे व शिक्षण देत आहे, हें सुद्धां त्याच्या सामर्थ्याला कमीपणा आणणारेंच आहे. म्हणूनच आमच्या पूर्वजांनीं भलत्याच लोकांना त्यांचें कर्तव्य सोडून विद्येच्या नादीं लावलें नाहीं.

ही टेंकडी तीन मैल उंचीची आहे. मध्यें मध्यें एक मैलावर

पाणी पिण्याचे झरे आहेत. तेथें लोक खाऊन व पाणी पिऊन ताजे तवाने होऊन नव्या दमानें चढूं लागतात. दुसऱ्या मैलावर एक लहानसा टुमदार गांव आहे. यांच्या घरांवर पन्हळी पत्रेसुद्धां दृष्टीस पडले ! घरें चुनेगच्ची आहेत. येथें एक पाणपोई आहे, व सरकारी ऑफिस आहे. येथें पहिलीं तिकिटें घेऊन दुसरीं देतात. बायका, पुरुष व मुलें यांचीं तिकिटें निरनिराळीं देतात, यामुळें अनायासें स्त्रीपुरुषांची नोंद होते. येथें बाजार आहे, चणे फुटाणे व पोहे मिळून शिवाय संत्रींहि मिळतात. येथें क्षणभर बसून विश्रांती घेत आहों तों पुढील चढणीकडे लक्ष जाऊन मन खट्टू होतें. आतां एवढें वर गेलें ह्मणजे झालें, असें वाटून कितीतरी वेळां टेकडीनें यात्रेकरूंला फसविलें आहे ! हिमालयाच्या दृष्टीनें किंवा गुरख्यांच्या दृष्टीनें ही टेंकडी असेल, पण ही टेंकडी नव्हे. हिमालयाचा आकार द्रोणासारखा उर्फ होडीसारखा आहे, त्याची ही दक्षिणेकडची बाजू आहे. ह्मणजे हा लहानसा हिमालयच आहे. मात्र थोडा जास्त उंच असता तर प्रत्यक्ष बर्फच दिसून हिमालय हें नांव सार्थ झालें असतें. या ठिकाणीं एक जुना किल्ला व चिंध्या देवीचें स्थान आहे. यापुढें सुमारें एक मैल चढाव चढून गेलें ह्मणजे पर्वताचे शिखरावर मनुष्य जातो. तेथें गेल्यावर भोंवतालची सृष्टिशोभा फारच मजेदार दिसते. सर्वत्र पर्वतशिखरावर ही मजा असतेच. पण ही हिमालयाची ( पर्वत-राजाची ) आहे. येथें विशेष प्रकार असावयास पाहिजे होता. पण तो तसा दिसला नाहीं. पण एक मात्र विशेष चमत्कार दृष्टीस पडला. तो ह्मणजे हिमालयाच्या शरीराचा ! येथून थेट उत्तरेस पाहिलें असतां हिमालयाचीं बर्फयुक्त शिखरें व त्याचें खरें सौंदर्य दिसूं लागतें. सोबतच्या नकाशावर पाहिलें असतां अगदीं शेवटची जी टेंकडी दाखविली आहे, तेथें ह्या टेकड्या पूर्वपश्चिम लांबवर पसरल्या आहेत. हा

नकाशा केवळ रस्त्याचा आहे ह्मणून त्यांचा विस्तार येथें दाखवितां आला नाहीं, पण हा विस्तार दृष्टीच्या टप्यापलीकडे फार आहे. या यात्रेंत जें कांहीं पहावयाचें, ज्याच्याकरितां आपण येवढे परिश्रम घेतले, त्यापैकीं हा एक देखावा असल्यामुळें मी येथें पुष्कळ वेळ पहात बसलों. येथून तीं शिखरें शंभर मैल लांब असावीं असा अजमास आहे. प्रत्यक्ष हिमालयाचें दर्शन व्हावें, त्याच्या विस्ताराची, सामर्थ्याची व अमर्याद शोभेची कांहीं तरी कल्पना व्हावी, याच हेतूनें ही यात्रा सांगितली असावी; ह्मणून ह्या गोष्टी विशेष लक्षपूर्वक व चिकित्सक बुद्धीनें पाहिल्याशिवाय या यात्रेचें सुफल मिळणार नाहीं.

अशा रीतीनें नगाधिराज आपल्या चिल्यापिल्यांना घेऊन बसलेला आहे, लहान मुलांनीं उच्छृंखलपणानें आपल्या जागेचें अतिक्रमण करूं नये ह्मणून त्यांस नद्यांच्या दोऱ्यांनीं बांधून टाकिलें आहे व स्वारी तपश्चर्या करीत बसली आहे असा येथें देखावा दिसला, किंवा प्रत्यक्ष उमामहेश्वर आपल्या भूतगण वगैरे परिवारासुद्धां ध्यानस्थ बसला आहे असें वाटून मी त्याचें मनमुराद दर्शन घेतलें! नंतर त्यानें लोकसंग्रहार्थ घेतलेल्या विभूतींचे ह्मणजे पशुपतीश्वराचे दर्शनाचा मार्ग पत्करला. हिचें नांव **सीसागढी**. ही शिशाप्रमाणें चढण्यास जड खरी! हिमालयाचें सर्वच मोठें, मग ही चढण मोठी कां नको? श्रीपशुपतिनाथाच्या दर्शनार्थ ही तपश्चर्या आहे. ह्या तपश्चर्येनें देह पुनीत झाल्याशिवाय तो दर्शनास योग्य नाहीं. जे कंडी कारितात, ते ही तपश्चर्या विकत घेतात असेंच ह्मटलें पाहिजे. यापुढें जितका चढाव तितकाच, थोडा कमी इतका उतार आहे. रक्सौलपासून चढाव कसकसा आहे हें सोबतच्या नकाशावरून समजेल. भीमफेरीपासून मारकूची धर्मशाळा फारशी उंच दिसत नाहीं, व तिच्या

पायथ्याशीं असलेल्या नदीला तितका वेगही नाहीं. ह्या टेकडीवरून रेल्वे होणें बरेंच कठीण आहे. बोगदा पाडणें, हें तर फारच कठीण आहे. तेव्हां रेल्वे आली तरी भीमफेरीपर्यंतच येणार; कदाचित् नद्यांच्या कांठानें रेल्वे आली तर येईल, पण अशानें फारच हेलपाटा पडत असेल, आणि तसा निघण्यासारखा रस्ता असता तर एवढी गढी चढण्याचा कोणीहि त्रास घेतला नसता.

यानंतर मी गढी उतरण्यास सुरवात केली. उतरतांना सर्वत्र जंगल आहे. सूर्य दुसऱ्या बाजूला असल्यामुळें उन्हाचा बिलकूल त्रास झाला नाहीं. रस्ताही दवामुळें ओलसर होता. या बाजूला सडकेवर मोठमोठे चिरेवजा धोंडे पसरले होते. रस्ता चढणीप्रमाणेंच एकदम उताराचा होता, आणि नकाशावरही तशीच उतरण दाखविली आहे यामुळें अशा धोंड्यांवर बूट घालून उतरणें जरा धोक्याचें असतें. एकवार खडी चढण पत्करते पण उतरण पत्करत नाहीं. कारण चढणीवर पाय घसरण्याचा संभव कमी, पण अशा उतरणीवर तोल जाऊन घसरणें कधीं कधीं अपरिहार्य असतें. अशा वेळीं यात्रेकरू घसरतातही. पण परिणाम फारसा अनिष्ट होत नाहीं. कंडीवाले व मजूर यांच्या पाठीवर ओझें असल्यामुळें त्यांना विशेष जपून उतरावें लागतें. घोड्यांना सुद्धां ही चढण उतरण जड जाते. ह्या उतरणीवरहि कोठें कोठें पाणी आहे. या जंगलांत सागवान मुळींच नाहीं असें दिसतें. कारण लहान मोठे आयते चौपाट केलेले सागवानी तुकडे कुली एकसारखे वर नेत होते. सागवान ही उष्ण प्रदेशांतील वनस्पति आहे. पण हिमालयाचे पायथ्याशीं उष्णता कमी नाहीं, तरी तराईंत सुद्धां हीं झाडें दिसलीं नाहींत. तसेंच, आंबे, फणस किंवा सुंदर वासाचीं फळेंफुलें, यांचीं झाडें, बदरीनारायणाचे बाजूला जशीं दिसलीं तशीं येथें दिसलीं नाहींत. मग कसलें रान किंवा

[stamp]

वनस्पति असतील याची माहिती नाहीं. विलायतप्रमाणें कोठें कोठें निरनिराळ्या रंगाच्या पानांचीं झाडें मात्र दिसलीं. कदाचित् मी गेलों तो त्यांच्या फुलाफळांचा हंगाम नसेल. आह्मांला तर लहानमोठ्या झाडांच्या दाट जंगलाशिवाय कांहीं दिसलें नाहीं.

उतार उतरून गेल्यावर आह्मांला एक नदी लागली. ही केवळ कोरडी नव्हती. पाणी बरेंच वहात होतें. जवळ सडकेच्या कांठीं पंधरावीस घरांचा गांव होता. त्या गांवीं रहाण्यास जागा मिळाल्यास पहात होतों, पण कोठेंहि मिळाली नाहीं. पुष्कळ यात्रेकरू येथें नदीवर उतरून शौचविधि, मुखमार्जन, स्नान, फराळ करून निघाले. आमची मंडळीहि त्याचप्रमाणें करून निघाली. मंडळी थकली भागली असल्यामुळें येथें भोजन करण्याची त्यांची इच्छा होती. पण, पुढें पल्ला फार लांब आहे, लवकर चला असा यात्रेकरूंनीं आह्मांला सल्ला दिल्यामुळें आह्मींही फराळ करूनच निघालों. पण तसें करूं नये. ह्या नदीच्या लोखंडी पुलापलीकडे उंचावर फार मोठी व प्रशस्त दुमजली धर्मशाळा आहे. तेथें उतरून, भोजन करून, विश्रांती घेऊन जावें. आह्मांला प्रथम हें

## मारकू

ठिकाण व धर्मशाळा माहीत नसल्यामुळें आह्मांला फार त्रास झाला. आह्मीं धर्मशाळेचा शोध केला पण तो कोठें लागला नाहीं. मग येतांना हें ठिकाण समजलें. ह्मणून आतां याची नोंद करून ठेविली आहे. पुढें ५।६ वेळां आह्मीं नदी ओलांडल्यावर **कुलेखानी** नांवाची चट्टी लागते. तेथें पण आह्मीं उतरलों नाहीं. पुढें एक मैल उंचीची

## एकदंता

गढी लागते; ती चढून गेलों. या टेंकडीचें वळण गणपतीच्या सोंडे-

प्रमाणें वांकडें असल्यामुळें हिला एकदंत। हें सार्थ नांव मिळालें आहे. ही गढी चढूं लागलों, त्यावेळीं अपराण्ह असल्यामुळें व ही टेंकडी वृक्षहीन असल्यामुळें चढाव बेताचा होता तरी बरोबरीच्या वृद्ध माणसांना बराच शीण झाला. पण ही गढी पूर्ण चढून गेल्यावर उतार नसून सडक सपाट व मऊ लागते. ही वेळ संध्याकाळची असल्यामुळें शेवटीं हा प्रवास सुखकर झाला. संध्याकाळ झाली, कोठें तरी वस्ती केली पाहिजे; वस्तीसारखें गांव व पाण्याची सोय बहुतेक ठिकाणीं होती. पण माझ्यापुढें कांहीं बायका गेल्या होत्या त्यांचा तपास लागेना ह्मणून पुढें गेलों. सूर्यास्त होऊन अंधार पडूं लागला, आतां किती लांब जावयाचें ! पण त्या बायका पुढें गेल्यामुळें गेल्याशिवाय गत्यंतर नव्हतें म्हणून गेलों. नंतर

## चितलांग.

येथील धर्मशाळेजवळ ही मंडळी सडकेजवळ बसली होती. मी त्यांना मला विचारल्याशिवाय तुह्मी पुढें कशाला आल्यात ? आतां मागची मंडळी केव्हां येईल कोणास ठाऊक ? ह्मणून ह्मटलें. एकंदर पुढच्या मागच्या मंडळीचा आज थोडा घोंटाळा झाला. आज सकाळपासून संध्याकाळपर्यंत मंडळी २६ मैल चालली. यापुढेंच

## चंद्रागढी

हा मोठा चढाव असल्यामुळें सर्व यात्रेचा मुक्काम येथें झाला होता. सर्व दुमजली मोठी धर्मशाळा व तिचें प्रशस्त आवार चिकार भरून लोक रस्त्यावर अर्धा मैलपर्यंत पसरले होते ! जसजसे आह्मीं हिमाळ्यांत जाऊं लागलों तसतशी थंडीहि दटावूं लागली. लोकांनीं अगोदर येऊन धर्मशाळेची जागा सर्व अडविली होती. ह्मणून आह्मांस जागा मिळेना, व आमचे मंडळीस बाहेर वसण्याचें साहस होईना. शेवटीं एका रात्रीचें एका लहानशा खोलीचें १॥ रुपाया भाडें देण्याचें

कबूल करून आह्मीं त्या खोलींत राहिलों ! या गडबडींत आमची मागची मंडळी आह्मांस कशी भेटते याचा आह्मांस विचार पडला होता. रात्र अंधारी, मनुष्य ओळखूं येईना, सबब सडकेचे मध्यावर मी एकसारखा उभा होतों. बराच वेळ ती दृष्टीस पडली नाहीं यावरून ती मागले गांवीं मुक्कामास राहिली कीं काय असा संशय आला, पण तसें होणें शक्य नाहीं, मी दृष्टीस पडल्याशिवाय ते मुक्काम करणारच नाहींत अशी खात्री होती. असा विचार करीत असतां कंदील लावून ही मंडळी आली असें जेव्हां दृष्टीस पडलें तेव्हां सर्वांना आनंद झाला ! मंडळी रात्रीं केवळ चहा पिऊन, फराळ करून व पाणी पिऊन निजली. मंडळीस अविश्रांत श्रम पडल्यामुळें त्यांना रात्रभर गाढ झोंप लागली.

दुसऱ्या दिवशीं उजाडल्यावर आह्मांला तेथला सर्व देखावा दृष्टीस पडला. धर्मशाळा दुमजली असून फार प्रशस्त आहे. तिच्या मागें मोठें आवार असून त्यासभोंवतीं चार मोठमोठे सोपे आहेत. जवळ दोन लहान लहान देवालयें असून सर्वत्र पाण्याची चांगली सोय आहे. सरकार स्वारी शिकारीस गेली होती, ती त्या दिवशीं आली. तिच्याकरितां धर्मशाळेचीं वरची माडी दिली होती. आपण धर्मशाळा अडकविल्यामुळें यात्रेकरूंची गैरसोय होईल ती न व्हावी ह्मणून सरकार स्वारीनें आपले खाजगी तीन चार तंबू मैदानावर उभारून ते योग्य यात्रेकरूंना देण्याबद्दल तेथील अधिकाऱ्यास ताकीद केली होती. पण यात्रा अफाट जमते, तेथें २।४ तंबूंनीं काय होणार हें खरें आहे, पण स्वराज्य असलें ह्मणजे आपले रयतेविषयीं ( यात्रेकरूंविषयीं ) राजाच्या मनांत असाच आदर असतो, हें दाखविण्याकरितां हें सांगितलें. याशिवाय कोणी साधुसंत थकला भागला असून किंवा आजारी पडल्यामुळें चालण्यास असमर्थ असेल, तर सरकारी डॉक्टरकडून

विभाग क्रमांक



अनुक्रमांक

त्याला औषध देऊन सरकारी कंडी किंवा झंपान देऊन त्याला रवाना करण्याची तेथील अधिकाऱ्यांस सक्त ताकीद होती. असे अपंग साधु झंपानमध्यें व कंडीमध्यें जातांना मी पाहिले. ह्या परोपकाराचें पुण्य राजाला मिळतें. सरकारनें अशा डोल्या ठेविल्या किंवा सदावर्तें ठेविलीं ह्मणजे सर्वच लोक त्याचा उपभोग घेतात असें नाहीं, पण असें मुक्तद्वार ठेविल्यामुळें राजाचा उदारपणा, प्रजावात्सल्य व खरी धर्मनिष्ठा हीं चांगलीं व्यक्त होतात.

सकाळीं यात्रेबरोबर आह्मींहि निघालों. चंद्रागढी ही सुद्धां सीतागढीप्रमाणेंच चढण्यास कठीण आहे, पण हिच्यांत सोयी विशेष आहेत, ह्मणून त्रास वाटत नाहीं. सोयी ह्मणजे हिच्यावर सर्वत्र जंगल आहे, रस्त्यावर दगड गोटा नसून तो तांबड्या मातीचा मऊ आहे व एकदम तेवढा चढही नाहीं. शिवाय दवामुळें सडक ओली होती, यामुळें हा प्रवास विशेष त्रासदायक झाला नाहीं. या गढीची चढण मागच्याप्रमाणें तीन मैलांची व उतरण २ मैलांची आहे. हिच्या शिखरावर आल्यावर हिमालयाच्या रांगा विशेष स्पष्ट व शोभादायक दिसूं लागल्या. त्या खालीं उतरलों तरी थोड्याबहुत दिसतच होत्या. ह्या टेंकडीवरून नेपाळच्या खोऱ्याची स्थानशोभा दिसून काटमांडू हें राजधानीचें शहरही लांब असल्यामुळें नीट लक्षपूर्वक पाहिल्यास दिसत होतें. ही टेंकडी उतरल्यावर दर्शनींच एक पाण्याचा ओढा व एका तंबूत एक भाजीपुरी बनविण्याचा कारखाना होता. जितके यात्रेकरू येतील त्यांना ही भाजीपुरी सरकारतर्फे मिळत होती. थकलेल्या भागलेल्या यात्रेकरूंना हें ताजें अन्न किती मिष्ट लागत असेल व त्याबद्दल त्यांचे संतुष्ट आत्मे राजाला किती दुवा देत असतील? खरें अन्नदान तें हें! या ठिकाणीं खाऊन व झऱ्याचें पाणी पिऊन यात्रेकरू पुन्हां चालूं लागतात. राजाचें हें अन्नसत्र जरी सर्व

यात्रेकरूंना खुलें असलें, तरी हा फायदा घेणार आहेत तेच घेतात; ह्मणजे पोटार्थी घेतात, सुखी लोक घेत नाहींत. मीही एथें उतरण्या-करितां जागा पहात होतों, पण ती मिळाली नाहीं. या ठिकाणास

**थानकोट**

ह्मणतात. हा २५।३० घरांचा गांव आहे. येथून पुढें श्रीपशुपती-श्वरास जाईपर्यंत उत्तरेकडे हिमालयाचीं हिमशृंगें आपल्याकडे कोणी मर्त्य माणसें येत आहेत कीं काय हें पाहण्याकरितां मधून मधून डोकावत असतात ! त्यांना पाहिल्यावर खरोखरच कौतुक वाटतें. येथें अगदीं खालीं उतरल्यावर यापुढें सपाट सडक आहे ह्मणून चार घोड्यांच्या शृंगारलेल्या गाड्या, मोटारी, शृंगारलेले घोडेस्वार असून पोलिसचा कडेकोट बंदोबस्त व सशस्त्र सैन्याची तुकडी असें वैभव दृष्टीस पडलें. हें कोणाचें वगैरे विचारतां आज सरकारची स्वारी शिकारीहून परत आली आहे, ती आपले राजधानीस जाणार आहे तिची ही तयारी आहे. असें समजलें. तेव्हां मला वाटलें अनायासें राजदर्शन होईल, आणि त्यांत स्वतंत्र राजाचें होईल हें विशेष ! पण माझी निराशा झाली. कोणी ह्मणे स्वारी १२ वाजतां येईल, कोणीं कोणी २ वाजतां, तर कोणी केव्हां येईल हें सांगतां येत नाहीं असें ह्मणे ! सारांश, राजे लोकांचा कारभार असाच अनियंत्रित असाव-याचा. कोणी ह्मणेल कीं, हा नेटिव्ह राज्यकारभार ह्मणून, तर असें नव्हे. आपले विलायतचे पंचम जॉर्ज आले, त्यावेळीं सुद्धां असेंच झालें. स्पेशलीं सुटत होत्या त्यांत राजाची स्पेशल कोणती व ती केव्हां गेली याचा कोणासच पत्ता नाहीं, मग त्याच्या डब्याचें अगर त्याचें दर्शन होणारच कसें ? आतां ह्यांत परराज्यांतील राजा व स्वराज्यांतील राजा ह्यांत फरक आहे. परकीय राजे असले ह्मणजे त्यांचा रयतेवर विश्वास नसतो, ह्मणून ते अपघात होऊं नये याक-

रितां नेमलेल्या वेळीं जात नाहींत. पण स्वराज्यांतील राजे अनियमितपणा करतात त्यांत त्यांचें अशा प्रकारचें राजकारण नसतें. रयतेनें राजस्वागताची स्वस्थतेनें तयारी करावी व स्वस्थपणानें दर्शन घ्यावें असा उदार हेतु असतो. असो, राजा येणार ह्मणून त्याच्या स्वागतार्थ जी जंगी तयारी दिसली तीवरून त्या राज्यांतील सरदार, मानकरी, मोठमोठे ऑफिसर्स, त्यांचा पोशाख व लवाजमा ह्यांचें अनायासें दर्शन झालें.

नेपाळांत हवा थंड यामुळें नेपाळी लोक साधारणत: गोऱ्यांतच मोडतात. हा गोरेपणा वरिष्ठ दर्जाकडे वाढतच जातो, व कनिष्ठाकडे कमी होतो. याचें कारण श्रम आहेत. साधारणत: शिपायाचा पोषाख एक काळी विजार, तांबडा कोट, डोक्यावर खिस्ती पाद्र्यासारखी साहेबी टोपी, हातांत बंदूक, पायांत साधारण बूट व कपाळास तांबडें गंध व कस्तुरीदर्शक काळा लहान ठिपका असतो. हेंच पोषाखाचें प्रमाण वरिष्ठ अधिकाऱ्याकडे वाढत जातें; त्यांचे बिल्ले चांदीचे असतात, ह्या बिल्यांवर राजमुद्रा श्रीपशुपतीनाथाचीच आहे असें दिसतें, कपडे रेशमी असतात, त्यांचेजवळ तरवार असते, केशरकस्तुरीचे ठिपके खरे असतात. गंधाशिवाय कोणी नसतें हें विशेष आहे. बायकांचे कपाळीं कुंकवाच्या ऐवजीं हरभऱ्याच्या डाळीएवढा शेंदुराचा ठिपका असतो. असा त्यांचा थोडा भिन्न रिवाजाचा व भिन्न संस्कृतीचा पोषाख पाहून मला मोठें कौतुक वाटलें. येथील लोक गौरवर्ण असल्यामुळें साधारण सुंदर दिसतातच. त्यांची ठेवण खुजी आहे, नाकें नकटीं असतात, पण एकंदर चेहरा मोहक असतो. बायकांचे बुचडे व नटण्याची तऱ्हा जपानी लोकांसारखीच असते, मात्र यांच्या कपाळीं कुंकू व कस्तुरीचा ठिपका, डोळ्यांना काजळ व अंगाखांद्यावर डागिने व हातांत बांगड्या असतात. त्यांही

मोहकच दिसतात. मी जात असतां जसजशी राजधानी जवळ येत चालली तसतसा राजदर्शनाकरितां लोकांचा जमावही जास्तच दिसूं लागला.

घोडा हा उष्ण प्रदेशांतील प्राणी आहे पण त्याला थंड देशांत मनुष्यांनीं ठेविल्यामुळें सृष्टिनियमाप्रमाणें त्याला बरीच लोंकर फुटते, व त्यामुळें ते बरेच बेढब दिसतात. ही स्वारी नव्या थाटाची होती. जुना थाट असता तर निदान दोनचार शृंगारलेले घोडे व हत्ती हें चित्र तरी दृष्टीस पडलें असतें. पण कसलाही हत्ती दृष्टीस पडला नाहीं हें विशेष अतिपरिचयामुळेंही अवज्ञा झाली असेल ! ह्या स्वारीकरितां पुष्कळ सरकारी आफिसर्स आपआपल्या लव्याजम्यानिशीं मोठ्या थाटानें आपआपल्या वाहनांतून येत होते. त्यांत हिंदुशिवाय कोणीच नव्हता, बहुतेक नेपाळीच होते. या स्वारींत मला वाद्यें व बावटे मात्र दिसले नाहींत !

ह्या ठिकाणीं बाजारांत दहीं, दूध पुष्कळ मिळत होतें, पाण्याचीही रेलचेल होती; दुकानांत उंस, संत्रीं व दुसरीं उष्ण प्रदेशांतील फळें मिळत होतीं यावरून हा उष्ण प्रदेश असावा असें दिसतें. येथें दुकानांत मुख्यत: राजगिऱ्याच्या लाह्यांचे लाडू बरेच दृष्टीस पडले. बाजारची अशी शोभा, मिरवणुकीची तयारी, तींतील सुंदर माणसें व त्यांचे व्यवहारांतील व दरबारांतील पोशाखांची मजा पहात पहात मी नेपाळ ऊर्फ काटमांडू शहराजवळ आलों. काटमांडूला काटमांडू असें कोणी ह्मणत नाहींत, नेपाळच ह्मणतात. शहरापासून एक मैलापर्यंत मंडळी रस्त्यावर बसली होती. जसजसें शहराजवळ आलों तसतसे लोक घरावरून, झाडावरूनसुद्धां बसलेले दिसूं लागले. त्यावेळीं दोन वाजले होते. आतां स्वारी येईल ह्मणून मीहि थोडासा थांबलों. अर्धा तास झाला तरी कांहीं दिसेना, तेव्हां चौकशी केली;

इतक्यांत आमचे श्रीमंतांचीही मंडळी भेटली. ते ह्मणाले, कसली स्वारी घेऊन बसलां, स्वारी संध्याकाळीं ६ वाजतां येईल तोंपर्यंत आपण पशुपतिनाथास सुद्धां पोहचूं ! आमची मंडळी तुह्मांस भेटली काय ह्मणून मी त्यांस विचारलें तेव्हां ते ह्मणाले तुमची मंडळी फार पाठीमागें राहिली आहे; आपण चला पुढें जाऊं. मी ह्मटलें येथून रस्ते दोन फुटतात, हल्लीं स्वारीची गर्दी आहे तो मार्ग राजधानीचा आहे आणि दुसरा पुलापलीकडील आपला आहे. ' **महाजनो येन गतः स पंथः** ' याप्रमाणें आमची मंडळी चुकून राजधानींत जाईल ह्मणून बसलों आहें; तेव्हां ते ह्मणाले त्यांजबरोबर कुली आहेत, चुकणार नाहींत, तुह्मीं चला. नंतर आह्मीं श्रीपशुपतीश्वराचा मार्ग धरिला. टेकडी उतरल्यापासून ह्मणजे थानकोटपासून येथपर्यंतचा मार्ग, हिमालयाचीं हिमशृंगें, राजाच्या स्वारीचा थाट व ठिकठिकाणचे यात्रेकरूंची मजा पहात वेळ केव्हां गेला याचें मला भानच राहिलें नाहीं ! ह्या यात्रेंत मला आपलेकडील पंढरपूरच्या दोन इतर जातीच्या बाया भेटल्या त्यांना मी विचारिलें ' तुह्मी कोणाबरोबर आलां ? ' त्या ह्मणाल्या, ' आह्मींच आलों; सोबत नाहीं ! ' ' तुह्मीं कशा आलां ? ' ' असें विचारीत विचारीत भीक मागत आलों ! ' तेव्हां त्यांची मला शर्थ वाटली, आणि यात्रा ही भिक्षार्थीशाची किंवा लक्षाधीशाची ह्मणतात तेंच खरें असें वाटलें.

पुलापलीकडे मोठमोठ्या दोन दुमजली धर्मशाळा लागल्या; ह्या धर्मशाळांचीं तोंडें सडकेच्या विरुद्ध बाजूस आहेत, यामुळें त्या समजत नाहींत. तेथून निघून दुसरा पूल ओलांडून आम्हीं नेपाळ शहरच्या एका भागांतून गेलों, जातांना हा भाग लागतोच. नेपाळ शहर पुण्याएवढें तरी विस्तृत असावें; सर्व घरें डोल्यासारखी दुमजली आहेत. पण त्यांचेबाहेर देवादिकांचीं लांकडी चित्रें असतात. बाजा-

रांत मोठमोठीं दुकानें असून त्यांत कांहीं विलायती मालाचींहि होतीं. त्यांत आम्हांला हरिकेन कंदिलाची कांचही मिळाली, आणि ती आठ आण्यांना मिळाली हें विशेष! येथें बहुतेक दुकानांतून घड्याळें असून एक घड्याळांचें दुकानहि दृष्टीस पडलें. तसेंच ह्या राजधानींत एक मुंबईच्या राजाबाई टॉवरप्रमाणें टॉवरहाउसही असून त्यावर चारी बाजूंना मोठमोठीं घड्याळें आहेत. त्यांत पंधरा पंधरा मिनिटांनीं गजर होत असतो. एक दोन घोड्यावर बसलेले मुख्य प्रधानांचे पुतळेही दृष्टीस पडले. सारांश सुधारलेल्या जगापैकीं येथें ट्रॅम मात्र नाहीं. बाकी टपाल, तारायंत्र, विजेचे दिव्यांची रोषनाई, टेलिफोन वगैरे सर्व सोई आहेत. ब्रिटिश वकिलातींत पोस्ट ऑफिस आहे, त्याचा नेपाळ सरकारशीं कांहीं संबंध नाहीं. गांवांत कोठेंही पोष्टाच्या पेट्या नाहींत. त्या पोष्टांत टाकलेलें पत्र जगांत वाटेल तेथें जातें. येथें मनीऑर्डर होत नाहीं, तसेंच मनीऑर्डरीनें पैसे मागितल्यास तेही मिळत नाहींत, इन्शुअर होतें, यामुळें अगदीं लहानसहान पैशाची देवघेवसुद्धां इन्शुअर्डनें करावी लागते. एक रुपया हिंदुस्थानांत पाठवावयाचा असला तरी एक रुपयाची नोट इन्शुअर करावी लागते. इन्शुअर केल्याशिवाय चालत नाहीं, कारण मध्यें पत्रें सेन्सॉर कचेरींत तपासलीं जातात. त्यांत नोटा गहाळ होण्याचा संभव असतो यामुळें इकडील लोक विशेषेंकरून महाराष्ट्रांतून गेलेले पुजारी नोटा मिळविण्याविषयीं टपलेले असतात. सबब यात्रेकरूंनीं इकडे रोख रुपये फारसे न आणितां नोटाच आणाव्या, म्हणजे त्यांची सोय होईल. येथून जाणारीं व येणारीं पत्रें राजकारणाकरितां नेपाळी सेन्सॉरकडून तपासलीं जातात! येथून रात्रंदिवस धांवत जाऊन चोवीस तासांत टपाल रक्सौल स्टेशनला जातें! थंडी, वारा, पाऊस यांची कदर बिलकूल नाहीं. गळ्याचे चढउतारालाहि डबल

शिपाई व त्यांस अंतर थोडें थोडें ठेविलें आहे. हिमालयाच्या या भागांत हिंसक प्राणी नाहींत. टपाल पेटी किंवा थैली एका टेकडी-वरून दुसऱ्या टेकडीवर तारांच्या साह्यानें—नदीवरून तराफे जसे ओढले जातात त्याप्रमाणें ओढली जाण्याची यांत्रिक योजना हल्लीं सुरू आहे. तिच्या सहाय्यानें टपाल आणखी जलद जाईल. पण हें टिकणें कठीण दिसतें, कारण दोन टेकड्यांच्या शिखरांचें अंतर बरेंच आहे, दोर टिकणार नाहीं. टेलिफोन आहे त्याच्या तारा तांब्याच्या आहेत. म्हणजे तारायंत्र व टपाल यानें नेपाळ मुळींच लांब नाहीं. सुधारणेचा हा दुपदरी दोरा झाला. आतां तिसरा पदर आगगाडीचा झाला म्हणजे तिपदरी ब्रम्हसूत होऊन त्याचा वेढा पडून सर्व सुधार-णेची माळ गळ्यांत पडेल ! व मग नेपाळचा कडवेपणा, रानटीपणा, एककल्लीपणा, अभिमान निघून जाऊन तें विश्वकुटुंबामध्यें निमग्न होण्यास मुळींच वेळ लागणार नाहीं ! ! हा सुधारणेचा ब्रह्मसिद्धांत आहे ! ! !

ह्या नेपाळ शहराची लांबीरुंदी निदान दोन मैल असावी, व येथून पशुपतीश्वर निदान दोन मैल तरी आहे. मंदीर खोलगट जागेंत आहे, म्हणून बरेच जवळ गेल्यानंतर पशुपतिमंदिराचे सोनेरी कळस झळकूं लागले व मनाची चित्तवृत्ती क्षणभर स्थिर झाली ! ह्या कळसाचें केवढें धार्मिक सामर्थ्य कीं ह्या अचेतन पदार्थानें मजप्रमाणें हजारों माणसें एकाच वेळीं ओढून आणलीं आहेत ! ! आतां आपणांस देवाचें दर्शन होऊन जिवाचें सार्थक होईल व आपल्या श्रमाचें चीज होईल अशा धीरानें जलद चाललों तों पशुपतीश्वरास पोंचण्यास पांच वाजले ! गेल्याबरोबर प्रथम उतरण्याची व्यवस्था पाहूं लागलों. कारण दिसत आहे तोंपर्यंत ती कांहीं तरी केली पाहिजे अंधारांत काय होणार ? सात आठ धर्मशाळा यात्रेकरूंनीं चिकार भरल्या होत्या.

व त्यांत उतरण्याची सोय नव्हती. ह्या देवळाचे पुजारी दक्षिणी-महाराष्ट्र ब्राह्मण आहेत असें मी ऐकिलें होतें. प्रयत्न करून त्यांचे-कडे गेलों पण त्यांचें घर मुंबई, पुणें सातारा वगैरे कडील महारा-ष्ट्रीय यात्रेकरूंनीं भरलें होतें; मग मी दुसरे महाराष्ट्र पुजाऱ्याकडे गेलों तेथें जरा बरी जागा मिळाली.

जागा मिळाल्यावर मी प्रथम श्रीपशुपतीश्वराचें दर्शन घेऊन आलों, त्यावेळीं एक पश्चिमचाच दरवाजा खुला होता यामुळें एका मुखाचें साधारण दर्शन झालें. नंतर आमच्या मंडळीची गांवाबाहेर अड्ड्यावर वाट पहात बसलों. इतक्यांत आमची कांहीं मंडळी माझा डोळा चुकवून गांवांत येऊन माझा शोध करीत हिंडूं लागली व त्यांची माझी चुकामुक झाली. रात्र पडत चालली, नऊ वाजले, तेव्हां आमचे दोन कंडीवाले दृष्टीस पडले, त्यांस उतरून घेतलें व बाकीची मंडळी कोठें आहे ह्मणून विचारतां ती आमचे पुढेंच आली असें ह्मणाले. आतां यांना शोधावयाचें कोठें? गांव अनोळखी व रस्त्यांत कंदीलही नाहींत तेव्हां विचार पडला व आलेल्या मंडळीला घर दाखवूं लागलों तों गांवांत गेलेली मंडळी माझा शोध करीत मी उतरलों होतों तेथेंच आली होती!! तुह्मीं येथें कसे आलां? ह्मणून मी त्यांस विचारतां ते ह्मणाले आह्मीं प्रथम तुमचा शोध तुमच्या पुजाऱ्याकडे केला त्यानें तुह्मीं आल्याचें सांगितलें पण तुह्मांला जागा दुसरीकडे दिली आहे असें सांगून हें ठिकाण दाखविलें. येथें तुमचें सामान पाहून तुह्मींच येथें उतरलां आहां अशी खात्री झाली. पण मला तुह्मीं ही बातमी न कळविल्यामुळें अंधारांत, थंडींत २।३ तास मला विनाकारण तुमचेकरितां रखडावें लागलें.

मी जेथें उभा होतों तेथें एका कर्नाटकी पुजाऱ्याचा गुमास्ता येऊन तो ह्मणूं लागला, ‘ असे आमचे घरीं चला नाहींतर येथें उभे

राहावयाचें नाहीं ! ' मी आपल्या मंडळीच्या शोधाकरितां येथें बसलों आहे, मंडळी भेटली ह्मणजे जाईन. तो ह्मणे नाहीं. येथें उभें राहण्याचा अधिकार नाहीं ! अशी त्याची व माझी बोलाचाली होत आहे, इतक्यांत तेथला रहिवासी एक बंगाली हुद्देदार तेथें आला. त्याला इंग्रजींत मी हें सर्व सांगितलें तेव्हां त्यानें त्याला धक्का मारून घालवून दिलें ! व पुन्हां आलास तर पोलिसचे स्वाधीन करीन असें त्यास बजावलें ! ! व हा पुन्हां आला तर त्याला खुशाल मारून घालवा असें त्यानें मला सांगितलें ! पोलिसचे ताब्यांत खटला गेल्यास पोलिस दोघांस पकडून सरकारांत नेतो मग न्याय केव्हां होईल तेव्हां खरें ? सबब पोलिसचे भानगडींत पडूं नये. असो. असे चुकत चुकत आह्मीं सर्व एकदांचे एकत्र झालों व सर्वांनीं पुजाऱ्याचे साह्यानें देवाचें दर्शन घेतलें व फराळ करून व पुजाऱ्याची मुलाखत घेऊन, व उद्यां महाशिवरात्र सबब प्रत्येकाचा देव ब्राह्मण काय करावयाचा याचा निर्णय करून आह्मीं निजलों. पुजाऱ्यानें सांगितलें होतें कीं मी उद्यां पहाटे स्नान करून जाईन तो रात्रीं सुद्धां न येतां दुसरे दिवशीं संध्याकाळीं येईन. ! !

## देव, देवस्थान व व्यवस्था.

रात्रीं आह्मीं थकले भागलेले कसे तरी निजलों. सर्वजण एकत्र मिळून जागाही बरी मिळाली स्वजातीयांचा आश्रय मिळाला व ज्याच्याकरितां आह्मीं एवढा प्रयत्न केला त्या देवाचें दर्शन झालें. हें देवानेंच गोड करून घेतलें याबद्दल त्याचे उतराई होऊन धन्यवादपूर्वक त्याचें स्मरण करून निजलों. इतकी दौड केली तेव्हां आदले दिवशीं आह्मीं पोंचलों ! !

दुसरे दिवशीं लग्नघाईप्रमाणें पहाटे ३ वाजल्यापासून सर्व नगर जागें झालें ! थंडी बरीच पडली होती; चौघडे, वाद्यें वाजूं लागलीं,

नदीवर स्नानाची एक गर्दी झाली, नदीच्या कांठावर ठिकाठिकाणीं मोठमोठ्या झगऱ्या पेटविल्या होत्या, नदीच्या दोहों बाजूला एक फर्लांगपर्यंत प्रशस्त घाट बांधून त्या सर्व क्षेत्रभर जिकडे तिकडे फरसबंदी केलेली आहे. नदीवरून जाण्याकरितां दोन ठिकाणीं प्रशस्त पूल केले आहेत; घाटांवर, धर्मशाळेंत, देवळांत व सर्वत्र जिकडे तिकडे विजेची रोषनाई केलेली आहे; पण गाभाऱ्यांत मात्र तुपाच्या दिव्याशिवाय कसलेही दिवे लावीत नाहींत. सर्व नदीवर व त्या सर्व देवळांच्या टप्यांत अंधार ह्मणून कोठेंही नव्हता; अडचणीच्या जागीं, पायऱ्यांवर जास्त दिवे लावले होते. हे हवे तितके उंच, लहान मोठे, निरनिराळ्या आकारांचे व एकापेक्षां एक एक श्रेष्ठ अशा दिव्यांची दिव्य शोभा पाहून मन अगदीं थक्क झालें ! श्रीपशुपतीनाथाचें भव्य देऊळ नदीचे कांठीं आहे व तें बहुतेक सर्व पितळेच्या पत्र्यांनींच मढवलें असून खालपासून वरपर्यंत देवादिकांच्या सुशोभित चित्रांनीं व निरनिराळ्या रंगांनीं रंगवून देवळाच्यावर बाजूला हवे तिकडे विजेचे दिवे पसरल्यामुळें तें आकाशांत नक्षत्राप्रमाणें चमकत असतें. नदींत पाणी जिकडे तिकडे वीतभर फार तर कांहीं ठिकाणीं हातभर खोल होतें; यामुळें सर्व नदीभर हजारों स्त्रीपुरुषांची स्नानाची गर्दी झाली होती, लहान मुलें थंडीमुळें रडत ओरडत होतीं पण त्यांच्या रडण्याकडे लक्ष देतो कोण ! घे पोर, बुचकळत नदींत कीं ठेव शेकोटीपाशीं शेकत ! असा प्रकार चालला होता ! शेकत बसण्यास तरी सवड कोठें आहे ? जो तो मला अगोदर दर्शन व्हावें ह्मणून चढाओढीनें प्रयत्न करीत होता ! शंकराला जलधारा ही सर्वांत प्रिय आहे सबब कांहीं लोक स्नान करून गडवा भरून घेत होते, व त्याला कोणाचा प्रत्यक्ष स्पर्श होऊं नये म्हणून कांहींनीं गडवे वर धरले होते. जाण्याच्या गर्दीत धक्काबुक्की ही व्हावयाचीच ! त्यानें

खालच्या मंडळीवर त्यांतील पाणी पडत असे, तें गार लागलें म्हणजे मंडळी ओरडत पण ऐकतो कोण ? धक्काबुक्कींत तें पाणी रहाणार कसें ! कांहीं लोक अत्यंत शुचिर्भूतपणा करण्याकरितां ओलेल्यांनींच गडवा भरून व पूजापात्र घेऊन निघाले होते. जें पाणी व फुलें शंकराला अर्पण करावयाचीं त्यांची धक्काबुक्कीनें मध्येंच विल्हेवाट लागत असे ! मग कोठें राहिलेला थेंब किंवा फूल देवाच्या वांट्यास आलें तर आलें !! जनीं जनार्दनाच्या म्हणीप्रमाणें परमेश्वराच्याच इच्छेनें हें सर्व होत होतें, त्याच्याच कृपेनें तें गंगोदक सर्वांच्या अंगावर शिंपडत होतें. एखादा दांडगा भेटला म्हणजे तो त्याचा सर्व तांब्या तेथेंच ओतून टाकी, पण ओतून टाकणार किती ? दुसऱ्याकडचें पाणी त्याच्या अंगावर पडेच ! सारांश 'आलें देवाजीच्या मना तेथें कोणाचें चालेना !' हेंच खरें, जनीं जनार्दनाची ती पूजाच होत होती. तेथें स्त्री, पुरुष, मुलें किंवा जाती असा दुजा भावच कोठें होता ? केवळ शिवदर्शन व्हावें हीच सर्वत्रांची एक वृत्ती होती. मी ही शोभा एका पुलावर उभा राहून स्वस्थपणें एक तासभर पहात होतों, प्रत्यक्ष सुवर्णमय कैलासपुरी ती हीच, अशी माझी तेथें पूर्ण भावना झाली व माझ्या यात्रेचें साफल्य झालें ! गंधर्वनगरांत किंवा प्रत्यक्ष इंद्रलोकांत तरी यापेक्षां काय जास्त असणार आहे ? शेवटीं फटफटीत उजाडलें थोडी गर्दी कमी होईल म्हणून पहात होतों, पण गर्दी कमी होण्याचें चिन्ह दिसेना, कारण एकाच वृत्तीचे मनुष्य नसतात; कोणी पहाटे स्नान करणारे असतात, कोणी सकाळीं, कोणी आठ वाजतां, कोणी दहा वाजतां, कोणी बारा वाजतां स्नान करणारेही असतात ! त्यानंतर पुन्हां कांहीं त्रिकाळ स्नान करणारे गोसावी दुपारीं व संध्याकाळीं स्नानास येतातच; असा प्रकार संध्याकाळीं सहा वाजेपर्यंत चालला होता ! ! त्यानंतर जिकडे तिकडे भजन रात्रभर चालून ती रात्र हरिजागरामध्यें गेली. हें सर्व

ठीक होतें, पण ह्या पुण्यक्षेत्रांत येऊन शिवरात्रीससुद्धां दर्शन झाल्यावर पुष्कळ लोक जेवणारे आढळले ! पण ते सर्व उत्तर हिंदुस्थानचे ब्राह्मणेतर असावे असा अजमास आहे. पण एकंदरीत हें गैर आहे. वीर वैष्णवांशिवाय कोणीही महाशिवरात्रीस अन्न घेत नाहींत.

दुसरे दिवशीं पुन्हां स्नान वंदन करून भोंवतालचीं देवालयें यथावकाश पाहून मंडळी परत जाण्यास सुरवात होते, ती शुद्ध अष्टमीपर्यंत जात असते. मध्यें फाल्गुन शुद्ध ३ ते ५ पर्यंत कधीं तरी गोरगरिबांस व विशेषेंकरून साधुसंन्याश्यांस एक दिवस शिरापुरीचें जेवण व एक रुपया दक्षिणा राजाकडून मिळते, त्या वेळीं साधुसंतांचा समुदाय सुमारें पांचशेंपर्यंत असतो अष्टमी होऊन गेली म्हणजे पोलिस घरोघर झडती घेऊन तपास करितात व कोणी वगर परवानगीनें राहिला असल्यास त्यास घालवून देतात, तो न जाईल तर सरकारमध्यें अडकवितात; म्हणजे यात्रेकरूंना शुद्ध ८ पासून १२ पर्यंत सीसागढीखालीं शेवटचा पास देऊन परत जावें लागतेंच ! प्रथम पास दिले असतात व मग परत घेतात यावरून शिल्लक किती राहिले याचा तपास लागतोच. सीसागढीखालीं मग किती दिवस राहिलें तरी चालेल असें म्हणतात. शिवरात्रीस रात्रीं बारा वाजतां राजघराण्यांतील मंडळी शिवदर्शनास येतात तेव्हां, विशेष बंदोबस्त असतो.

आमची मंडळी सकाळीं ८।९ च्या सुमारास जरा गर्दी कमी झाल्यावर नदीवर स्नानास गेली त्या वेळीं नदीचें पाणी आंत निर्माल्य, द्रोण, पत्रावळी, केर कचरा व शेकोट्यांची राख टाकल्यामुळें खराब झालें होतें पण पाणी वाहतें होतें व सर्वत्र वाळू आहे. यामुळें घाण रहात नाहीं. नदींत जरा आपल्यापुरता खाडा खणून लोक आंत बसतात व स्नान करितात. स्नान झाल्यानंतर आमची मंडळी देवदर्शनास गेली. पैकीं एक बाई जरा मागून आली. तिनें आपलें लुगडें भांडें

धक्क्यावर ठेविलें, व आपण स्नानास गेली. तिचें लक्ष तिच्या वस्त्राकडे होतेंच. इतक्यांत एक भामटा येऊन तो लुगडें घेऊन पळूं लागला! बाई धीट होती, तिनें ओलेत्यानेंच धांवत जाऊन त्याचा हात धरला, त्याबरोबर तो कपडे टाकून पळूं लागला; पण ह्या बाईनें त्यास पळूं दिलें नाहीं!! ही लठ्ठाझोंबी पोलिसांनीं पाहून त्या दोघांना पकडून त्यांनीं काटमांडूला मॅजिस्ट्रेटकडे नेलें. तेथून ती तीन दिवसांनीं मोठ्या प्रयासानें सुटून आली; भामट्याला शिक्षा झाली; पण न्याय लवकर मिळून बाईची सुटका होण्याकरितां प्रयत्न करावा लागला. नाहीं तर केव्हां तरी न्याय झाला असता! ह्याला हंसावयास नको, गोव्या-कडेही हीच रीत आहे!

श्रीपशुपतिनाथाचें देऊळ बेताचें दुमजली, ताबुतासारखें आहे. तें सर्वत्र पितळी पत्र्यांनीं व नाना प्रकारच्या रंगीत चित्रांनीं खालपासून वरपर्यंत शृंगारलें होतें. त्याला चारी दिशांस चार मोठमोठे दरवाजे आहेत. दरवाजे चांदीच्या सचित्र पत्र्यांनीं मढविले आहेत; यामुळें सर्व देऊळ सुवर्ण व रौप्य यांनीं पायापासून छपरासुद्धां कळसापर्यंत चकचकीत व तेजस्वी असें ताबुताप्रमाणें दिसतें. गाभाऱ्यांत श्रीपशुप-तिनाथाची पिंडी व लिंग आहे. लिंग सिलिंडरासारखें असून त्याचा व्यास दोन अर्डाच फूट आहे आणि तें कमरभर उंच असून त्याचे चारी बाजूस चार लहान बेताचीं मुखकमळें आहेत. या प्रत्येक तोंडाची पूजा करणारा एकएक पुजारी आहेत. देवाच्या गाभाऱ्यांत पुजाऱ्या-शिवाय कोणासच जाऊं देत नाहींत. यात्रेकरूंनां जें देवास वहावयाचें असेल तें पुजाऱ्याजवळ द्यावें, पण लोक देवावर एकदम फुलें, फळें, पाणी किंवा जी कांहीं वस्तु वहावयाची आहे ती पैशासुद्धां देवावर फेंकतात! नुसतीं फुलें, फळें व पैसे फेंकतात त्यांत विशेष हानी नाहीं, पण गंगा भरलेल्या कांचेच्या पातळ पापुद्र्यासारख्या कुप्या

फेंकतात, व त्या देवाच्या डोक्यावर फुटतात, व सर्वत्र कांचा पसरतात; व त्या मनुष्यांच्या–त्यांत विशेषेंकरून देवाच्या पुजाऱ्यांच्या हातापायांत बोंचून त्यांस इजा होते हें फार वाईट आहे. यांत काय पुण्य मिळत असेल तें असो, पण ही रीत बंद करणें जरूर आहे. पुजारी वाटेल त्याचे हातचें घेऊन त्याचे समक्ष देवास वहातात. मग असा प्रकार कां व्हावा हें समजत नाहीं. ही एकच दिवसाची गोष्ट असल्यामुळें कोणी विशेष लक्ष देत नसतील असें दिसतें. महासाध्वी अहिल्याबाई होळकरीण हिची गंगोत्रीची कावड अजूनपर्यंत महाशिवरात्रीस श्रीपशुपतिनाथाच्या स्नानास येते ! त्या महासाध्वीचा महिमा अवर्णनीय खरा.

दर्शनास प्रथम दक्षिणद्वारानें सोडतात, तेथून दर्शन घेऊन यात्रेकरू पूर्वेकडील मुखाचे दर्शनास जातात. मुखें सर्वत्र सारखीं आहेत व सर्व दिशेला मोठमोठ्या घंटा वगैरे व्यवस्था एकसारखीच आहे. पूर्वेकडून अनुक्रमें उत्तरकडच्या व पश्चिमेकडच्या मुखाचें दर्शन घेऊन शेवटीं पश्चिमेच्या मुखासमोर एक फार मोठा पितळेच्या पत्र्याचा पोकळ नंदी देवळाबाहेर अंगणांत उंच ठिकाणीं आहे त्याचें दर्शन घेऊन यात्रेकरू पुढें १२१ लिंगें एका उंचश्या चबथऱ्यावर आहेत त्याचे दर्शनास जातात व नंतर काळभैरवेश्वर वगैरे इतर देवाचें दर्शनास जातात. सर्व देवांचे दर्शनास गर्दी नसली तरी एक तास मोडण्यासारखा आहे, इतकीं तीं देवळें जरा लांब आहेत. देवळापुढचा मोठा नंदी बसला आहे तरी तो दीड पुरुषापेक्षांही उंच आहे ! रामेश्वरचा व हा सारखाच होईल असा अजमास आहे.

ह्या देवाचे पुजारी दक्षिणी ब्राह्मण असावे असा श्रीशंकराचार्यांनीं नियम घालून दिला आहे. व तो अद्यापपर्यंत एक हजार वर्षें पाळला जात आहे. दक्षिणी ब्राह्मण कोंकणस्थ, देशस्थ, किंवा पंक्तिपावन असे

असे मद्रासेकडील द्राविडी, कानडी किंवा तैलंग यांपैकीं कोणी असला तरी चालतो. पुजारी वंशपरंपरेचे नसतात त्यांच्या वर्तनांत कमजास्तपणा, अनियमितपणा दिसून येतांच त्यास रजा देण्यांत येते व दुसरा बोलावतात. हल्लीं मुख्य पुजारी द्राविडी ब्राह्मण आहेत. पुजाऱ्यास परदेशच्या भाषा—विशेषेंकरून इंग्रजी येतां कामां नये व तो मांसाहारी नसावा. तो तेथें नोकरीकरितां गेला म्हणजे त्याची परीक्षा होऊन तो पास झाला म्हणजे त्यास सक्षौर प्रायश्चित्त देऊन दीक्षा देतात व ठराविक पोषाख देतात; ह्या ठराविक पोषाखाशिवाय त्यास देवळांत जाण्याची मनाई आहे. हा पोषाख म्हणजे नेसूं कद किंवा मुकटा, अंगावर एक सखलादी तांबडा अंगरखा व त्याचीच टोपी केलेली असते ती घालतात. ही टोपी आपलेकडील वैदिक ब्राह्मण जशी पूर्वी वापरीत असत तशी कान झांकणारी असते. अंगावरून कमरेस बांधण्याकरितां एक दुपेटा किंवा पटका असतो; एखाद्याचे गळ्यांत रुद्राक्षांची माळ असते; कपाळास भस्म किंवा गंध कालानुरोधानें असतें. पुरुपानें नेहमीं क्षौरच केला पाहिजे मिशा वाढवतां कामा नये ! या पुजाऱ्यास रहाण्यास जागा, त्याच्या तैनातीस एक गडी व पोटास अन्न हें सरकारांतून मिळतें, त्याबद्दल उत्पन्नाच्या जमिनी तोडून दिल्या आहेत. शिवाय दरमहा १५।२० रुपये पगार मिळतो. शिवाय देवापुढील सर्व सामान्य मिळकत पुजाऱ्यांची असते. विशेष मिळकत भांडीं, अलंकार, त्रिशूळ वगैरे देवस्थान कमिटीकडे जमा होते. पुजाऱ्यास त्याचे घरीं जें कांहीं यात्रेकरू देतील त्यावर त्याचाच हक्क आहे. पण देवळांत जें कांहीं गाभाऱ्यांत पडेल मग तें पैसा, धान्य, वस्त्र कांहीं असो त्याचे समान ५ भाग करितात; दोन भाग मुख्य पुजाऱ्यास जातात व बाकीचा एक एक भाग एक एक पुजाऱ्यास जातो. येथें सोंवळ्याओंवळ्याचा प्रकार विशेष नाहीं. ते गाभाऱ्यांत

कोणास जाऊं देत नाहींत, पण गुरवानें आणून दिलेली पाण्यानें भरलेली घागर पुजारी सोंवळ्यानें घेतो. गाभाऱ्याबाहेर पडलेली दिडकी, पैसा गुरवाचा आहे इतकेंच नव्हे तर गाभाऱ्यांत कोणीही पुजारी नसतां पिंडीबाहेर पडलेली दिडकी, पैसाही गुरवाला उचलण्याचा अधिकार आहे; फक्त पिंडीवरचा नाहीं.

हें देऊळ व त्या सभोंवतालचीं इतर देवळें, धर्मशाळा व पुजाऱ्यांचीं घरें मिळून क्षेत्र आहे. ह्या क्षेत्रांत सर्वत्र बारमाही रात्रीं चांदणें असलें तरी विजेचे दिवे आहेत. धर्मशाळांच्या कानाकोंपऱ्यांत चांदण्या रात्रींसुद्धां विजेचा प्रकाश आहे. पुजाऱ्यांपैकीं मुख्य पुजाऱ्याचें घर जंवळच असल्यामुळें त्यास मात्र ह्या दिव्यांचा फायदा होतो, दुसऱ्यांस नाहीं. कारण त्यांचीं घरें लांब असून तिकडे वीज नेली नाहीं. या क्षेत्राशिवाय गांव अगदीं स्वतंत्र आहे. तो सुमारें पांचशें घरांचा आहे. देवस्थानचे भागास देवपाटण म्हणतात. शिवरात्र झाल्यानंतर दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशीं ह्याच पाटणांत सर्व साधूंना शिरापुरीचें जेवण दिलें जातें त्याचा थाट मोठा वहारीचा असतो. सर्व साधू त्या दिवशीं आपआपल्या धर्माप्रमाणें व गुरुपरंपरेनें नटून येतात. त्यांच्या जटांच्या बुचड्यांचे, गंधाचे व भस्म लावण्याचे किती प्रकार वर्णावे ! शिवाय प्रत्येक साधू मी मोठा असें दाखविण्याचा प्रयत्न करी. त्याचप्रमाणें जमलेल्या संतिणींचे प्रकार तरी किती वर्णावे! पुष्कळ वाचकांनीं ते पाहिले असल्यामुळें त्यांचें वर्णन करीत नाहीं. सर्वांना रांगोळ्या घातल्या होत्या, पण कांहीं साधू आपलें श्रेष्ठत्व दाखविण्याकरितां निराळे बसत! त्यांसही रांगोळ्या घालून उदबत्या लाविल्या होत्या. सर्वांचीं राजाकडून शिरापुरीच्या जेवणानें उत्तम संभावना होऊन प्रत्येकास एक एक रुपया दक्षणा मिळाली यामुळें त्यांची फार मजा झाली! सर्वांची पातळ पोटें गलेलठ्ठ बनून संध्याकाळपर्यंत हुक्का

पीत कोणी एकतारी, कोणी दोनतारी अशीं नाना प्रकारचीं वाद्यें वाजवीत गाणीं गात होते ! ! ! येथें गांवांत

## बाजार

वगैरे सर्व आहे, तरी पण यात्रेकरितां बाजार निराळा बसवून त्यांत यात्रेकरूंच्या सोईचे पदार्थ असतात. म्हणजे डाळ, तांदूळ, पीठ, गूळ, साखर, चहा, तूप, तेल, पोहे व सर्पण इतक्या जिन्नसा तशाच प्रासादिक जिन्नसा, फोटो, रुद्राक्ष, गोपीचंदन, निरनिराळ्या मूर्ती, ठसे, मिठाईचीं दुकानें असून सत्रेंही बरीं असतात. सर्व पदार्थ बरे व स्वस्तहा मिळतात. मात्र परदेशचें जिन्नस, साखर वगैरे फार महाग विकते म्हणजे दिडकाला कोठें कोठें दिडकीभारही मिळते ! पण त्याला इलाज नाहीं. सर्व माल खालून माणसांनीं पाठीवर न्यावा लागतो याशिवाय कोणत्याही वाहनांचा उपयोग होत नाहीं; आणि रस्ताही याशिवाय दुसरा नाहीं; तेव्हां त्यांचा निरुपाय आहे. येथें सत्रें पुष्कळ स्वस्त व ताजीं मिळतात, फळ फार मोठीं नसतें, बेताचें असतें. त्यांच्या स्वरूपावरून व रुचिवरून तीं परदेशचीं नसावींत असें दिसतें; पण यांच्या बागा कोठें दिसल्या नाहींत. दुसरें येथील फार

## मौल्यवान जिन्नस

म्हणजे शिलाजित, कस्तुरी, स्फटीक, पोंवळी व गंगावन हे होत. गंगावनाशिवाय येथें ह्या वस्तु स्वस्त मिळत नाहींत. यात्रा आली ह्मणजे उपाध्येबुवा ह्या वस्तु कोणास पाहिजे आहेत काय ह्मणून विचारतात कस्तुरी हलकी घतली तरी ३० रुपये तोळा असते. येथें कस्तुरी ३० ते ९० रुपये तोळाप्रमाणें मिळते असें म्हणतात. गंगावन देणाऱ्या वनगाई व कस्तुरीमृग हे मला पहावयास मिळाले नाहींत, ते याचेपुढें निरंतरच्या बर्फमय प्रदेशांत असतात असें सांगतात. हे पदार्थ येथें महाग मिळतात पण ते खरे असतात बनावट नसतात हे मात्र खरें.

कस्तुरीच्या किंमतींत इतका फरक असण्याचें कारण काय म्हणून विचारतां, कोंवळे मृगाचा नाभा कोंवळा, व जून मृगाचा जून, अत्यंत सुवासिक अर्थात् फार उत्तम व तत्काल परिणामकारक असतो असें म्हणतात. म्हणजे २।३ वेळां नुसत्या हुंगण्यानेंसुद्धां उष्णतेनें नाकांतून रक्त पडतें ! या नाभींतून अस्सल दाणा म्हणजे गोळा काढितात त्यास किंमत जास्त पडते. दाणा निघून गेल्यावर बाकीचा नाभा खरवडून भुसकुटा काढतात तोसुद्धां ३० रु. प्रमाणें विकला जातो ! ! मी येथें कस्तुरी पाहिली पण तिचा घमघमाट मात्र मला कोठें दिसला नाहीं; याचें कारण काय म्हणून मी विचारलें त्यावर ते म्हणाले येथें थंड देशांत फार वास येत नाहीं, खालीं उष्ण देशांत तिचा परिमळ विशेष येतो ! नुसता रिकामा नाभासुद्धां एक रुपयाला विकला जातो ! याचा काय उपयोग म्हणून विचारतां तो कपड्याचे पेटींत टेविल्यास सर्वांस उत्तम वास येऊन, कसर मुळींच लागत नाहीं. स्फटिक व पोंवळीं यांचे लहान लहान गणपतीही मिळतात. येथें रुद्राक्ष मिळतात ते अवश्य घ्यावे, ते खरे असून हिमालयांतीलच असतात; मलायाकडचे नसतात व फार स्वस्तही मिळतात.

याशिवाय दुसऱ्या स्थानिक वस्तु म्हणजे येथील लोंकरीचे कपडे, घोंगड्या, धावळ्या, ब्लँकेटें, हे ओबडधोबड असतात, पण कडक थंडीचें निवारण होण्यास तेच एक पूर्ण समर्थ आहेत यांत शंका नाहीं. यात्रेकरूंना सवड झाल्यास त्यांनीं ह्या वस्तु घ्याव्या.

आम्हीं येथें शुक्रवारीं संध्याकाळीं आलों. त्या दिवशीं दर्शन झालें. शनिवारीं महाशिवरात्र होती त्या दिवशींही अर्थात् झालेंच व रविवारीं दर्शन, पूजन करून निघावें असा माझा मानस होता; कारण तीनही दिवस दर्शन झालें जास्त दिवस राहण्यांत फायदा काय ? शिवाय कुली तक्रार करूं लागले कीं तुम्हीं विनाकारण राहाल तर आम्हांला

भोजनखर्च माणशीं ८ आणेप्रमाणें दिला पाहिजे; देत नसाल तर सरकारमध्यें तक्रार करून घेऊं; नाहीं तर आमच्या झाल्या मुदतीचा दाम देऊन टाका, आम्हीं दुसरी मजुरी करितों किंवा घरीं जातों ! शिवाय न राहण्याचें कारण येथील नदीचे पाण्यांत फार सूक्ष्म रेती असते ती पाणी पिण्यांत व खाण्याच्या पदार्थांच्या योगानें पोटांत जाते व त्या योगानें मनुष्य आजारी पडण्याचा संभव असतो. भिन्न हवापाणी व आहार असल्यामुळें प्रकृती स्थिर रहात नाहीं म्हणून निघण्याविषयीं मंडळीस आग्रह केला. आग्रहच करण्याचें दुसरें कारण आम्हीं ज्यांच्याबरोबर आलों होतों त्या श्रीमंतांच्या मंडळींत एक वृद्ध बाई होती, तिला कंडी केली होती पण तिला यात्राक्लेश व हवापाणी सहन न होऊन ती आजारी पडली व शेवटीं तिनें आपला देह श्रीपशुपतिनाथाला अर्पण केला ! ! तिचा दहनविधी गंगेवर चाललेला आमच्या मंडळीनें पाहिलाच होता. येथें मनुष्य विशेष आजारी पडला म्हणजे त्याला गंगेवरील एका विशिष्ट ठिकाणीं नेऊन ठेवितात. हें घर इस्पितळाप्रमाणें याच कामाकरितां बांधिलें आहे. मनुष्य कितीही श्रीमंत असला तरी शेवटची वेळ आली कीं त्याला येथें आणलेंच पाहिजे. कोणत्याही घरांत मृत्यु होतां कामा नये, झाल्यास तें जाळून टाकतात किंवा मनुष्यवस्तीस अयोग्य ठरवितात ! त्या इस्पितळांत सुश्रुषेला कितीही मंडळी असली तरी चालते. तिकडे नेलेली कोणतीहि वस्तु इकडे आणीत नाहींत. शिवाय आमच्या मंडळींतही एका बाईला अतिसार सुरु झाला होता, हें सर्व मी त्यांना सांगितलें. परंतु त्यांनीं तें ऐकिलें नाहीं, हें महास्थान आहे, एकदां येथून गेलों म्हणजे फिरून येथें कोण येतो ? शिवाय आम्हीं फार थकलों आहों, २।४ दिवस विश्रांती घेतल्याशिवाय आमचा पाय उचलणार नाहीं; तेव्हां कसेंही करून आमची एवढी विनवणी ऐका. मागें सांगितलेल्या

सर्व अडचणी त्यांनीं कबूल केल्या, कुलींचे पैसे देण्याचें कबूल केलें, व आजारी पडण्यापूर्वींच आम्हीं श्रमानें आजारी झालों आहों, आपल्या बरोबरींचे श्रीमंतही अजून निघाले नाहींत, वगैरे सांगून राहण्याचें ठरविलें. कांहीं लोक शिवरात्रीचे दुसरेच दिवशीं निघतात, कांहीं तीन दिवसांनीं, कांहीं पांच दिवसांनीं व शेवटची सरकारी मुदत आठ दिवसांची आहे. आम्हीं पांचवे दिवशीं निघालों.

चार दिवस राहण्याचें ठरल्यावर एक एक दिवस मंडळी येथून एक मैलाच्या आंत अंशुपतेश्वर व भुवनेश्वरी देवी हीं देवळें पाहण्यास गेली. भुवनेश्वरींचें देऊळ श्रीपशुपतिनाथाप्रमाणें फारच सुरेख असून त्यांत देवीचा सोन्याचा तांदवा आहे. श्रीपशुपतिनाथाच्या देवळांत जगदंबा पार्वतीची मूर्ती नाहीं तिचें हें स्थान आहे. ह्या देवळाची दुरुस्ती एका मुख्य प्रधानानें केली होती. त्याचें नांव ठिकठिकाणीं दाखविलें आहे. श्रीपशुपतीश्वरापासून ह्या देवीपर्यंत सर्वत्र फरसबंदी व प्रशस्त पायऱ्या बांधल्या आहेत. देवींचे देवळाजवळ एक तीर्थ आहे. येथें व रस्त्यांत माकडांचा उपद्रव बराच आहे. वाटेनें जातांना रस्त्याचे बाजूस देवळें व साधूंचे आश्रम आहेत. हीं देवळें सर्व मंडळींनीं पाहिल्यावर एके दिवशीं येथून सहा मैलांवर दत्ताचें स्थान आहे तें पाहण्यास गेलों. ह्या दत्तगुरूंचें दर्शन घेतल्याशिवाय ही यात्रा सफळ नाहीं असें म्हणतात. तेव्हां ह्यांत काय विशेष आहे हेंही आपल्या दृष्टीस पडेल असें जाणून एक कुली बरोबर घेऊन मी तिकडे जाण्यास निघालों. दोहोंला निघून साडेसहाला परत आलों. सर्वत्र पुळणीचा मार्ग आहे, बांधीव सडक अशी फारशी नाहीं; रस्ता सपाट असून मधून मधून लहान गांवें लागत घरांची रचना सर्वत्र एकाच पद्धतीची होती; एक मजली घर फार थोडें, बहुतेक दुमजली व त्यांचा आकार ताबुतांप्रमाणें म्हणजे वरपरें बरींच पुढें आलेलीं असून त्यांना बरेच निरके धिरे लावून

दिलेले असतात. देवळाला ह्या धिऱ्यांऐवजीं शोभेकरितां श्रीपशुपति-नाथाच्या देवळाप्रमाणें तिरकीं लांकडी चित्रें लाविलेलीं असतात. रस्त्याच्या दोन्ही बाजूला शेतजमीन दृष्टीस पडली. जमिनींतून लोकांनीं पिकें काढून नेलीं असून दुसऱ्या पिकाकरितां जमिनीची मशागत चालली होती. सर्वत्र पुळण असल्यामुळें नांगराचें बहुधा कामच पडत नाहीं; नांगराऐवजीं आंखूड दांडयाची एक मोठी कुदळ असून तिनें जमीन नांगरण्याचें व त्यांचे वाफे करण्याचें काम चालू होतें. ठिक-ठिकाणीं पाटाचें पाणी होतें. ह्या शेतांमध्यें भाजीपाला व मुख्यत्वें लसूण करितात. ही लसूण आपल्याकडील प्रमाणें लहान कांदीची नसते; तर आपलेकडील कांदा व लसूण ह्यांच्यामधली हिची स्थिती आहे, इतकी ती मोठी असते. येथून दत्ताला जाईपर्यंत हिमालयाचीं हिमशृंगें मात्र फारच मनोहर दिसत होतीं. कांहीं नीट सुळक्यासारखीं उभीं होतीं; कांहीं कललेलीं; कोणी डोक्यावर ढगाचा पांढरा, तांबडा, काळा फेटा घालून आमचें स्वागत करणेची तयारी करीत आहेत; कोणी ओणवून वांकुल्या दाखवून फसवून बोलावीत आहेत, जणूं काय खरी मजा येथें आहे तेथें कांहीं नाहीं; हिमालयाची सृष्टिशोभा, गगनचुंबित वृक्ष, बर्फ व त्यांची विविध रूपें वगैरे खरी मजा येथें आहे असें सांगत आहेत. पण करणार काय ? तेथें जाऊन येण्यास निदान पंधरावीस दिवस तरी लागतील ! शिवाय चांगला मार्ग नाहीं; उपजीविकेचीं साधनें नाहींत; या दिवसांत थंडी कडक, पुढें वैशाख, जेष्ठमध्यें कांहीं लोक फार प्रयत्न करून जातात, पण तेथपर्यंत राह-ण्यास सवड कोणाला आहे ? व परवानगी कोठें आहे ! माझ्याप्र-माणें पुष्कळ यात्रेकरू पायीं चालत होते, माझें लक्ष एकसारखें डाव्या हाताकडील हिमालयाकडे असल्यामुळें पुळणीमध्यें कधीं कधीं पाय घसरे व लोक हासत आणि म्हणत कीं, बर्फाकडे एकसारखें पाहून

काय मिळणार ? एकदां पाहिलें सोडून दिलें. अशांना सृष्टिशोभेचें व निरनिराळ्या देखाव्यांचें रहस्य काय कळणार ?

रस्त्यांतून जाणारा समाज बहुतेक यात्रेकरूंचाच होता. पण येणारा समाज निराळा होता. हे लोक नेपाळी लोकांपेक्षां निराळे होते. हे काबुली लोकांसारखे उंच, गोरे, विजार, तांबडा लांब आंगरखा, लांबी टोपी किंवा क्वचित् ख्रिश्चियन टोपी घातलेले होते. त्यांच्याही कपाळीं गंध व बायकांचे कपाळीं कुंकू होतें. सर्वांच्या पायांत बूट होते. पुरुषांच्या पाठीवर ओझें व बायकांच्या पाठीवर मुलें होतीं. हे लोक कोण ह्मणून चवकशी करतां यांना भुते ह्मणतात. हे भूतानचे राहणारे ह्मणून यांना भुते ह्मणतात. हे लोक मला नेपाळी लोकांपेक्षां सुंदर दिसले. वाटेनें जातांना खेड्याप्रमाणें कांहीं एक दोन शहरें लागलीं. हीं तटबंदीचीं असून त्यांच्या द्वारावर सिंह, वाघ यांचीं भव्य चित्रें होतीं. एका ठिकाणीं गांवाबाहेर भव्य तलाव होता; तोही चांगला चुनेगच्ची पायऱ्यांचा बांधीव असून आंत तांबडे, पिंवळे, व पांढरे मासे होते. अर्थात् ही निपज कृत्रिम होती. एकंदर शहराची रचना एखाद्या जुन्या राजधानीप्रमाणें दिसे. अशा एका शहरांतून एका श्रीमंताची स्वारी देवपूजेकरितां निघाली असतां तिचा थाट विशेष प्रेक्षणीय दिसला. प्रथम वाद्यें वाजत होतीं त्यांत ताशासारखें रणवाद्य बिलकूल नव्हतें. सर्वच अति मंजुळ वाद्यें होतीं; सतार, सनई, बाजाची पेटी व निरनिराळ्या प्रकारचीं अलगुजें व पावे वाजत होते; निरनिराळ्या तुताऱ्या, शंख व निरनिराळ्या प्रकारचीं शिंगेंही मधून मधून वाजत. एकंदर स्वारीमध्यें पन्नास तरी मंडळी असावी व त्यांत २५।३० निरनिराळीं वाद्यें वाजविणारे असावे, त्या सर्वांचा आवाज अत्यंत प्रेमळ व मंजूळ होता, इतका कीं ती स्वारी दिसेनाशी होईपर्यंत मी तिजकडे एकसारखा पहात

होतों. ४।५ मंडळीच्या हातांत पूजापात्रें व बाकीची मंडळी लवाजम्याच्या थाटाची होती; आंत बायका मुलींच नव्हत्या. पूजापात्रांत एक दोन दोऱ्या जळत होत्या, त्यांचा सुगंध तर बहुमोल होता; मी पुष्कळ सुगंध पाहिले पण रस्त्यासारख्या अगदीं उघडया जागीं इतका गोड व मधुर घमघमाट देणारा सुगंध पाहिला नाहीं ! निःसंशय त्यांत पुष्कळशी उंची करतुरी असलीच पाहिजे. कस्तुरीचा वास अत्यंत मधुर आहे. त्या आवाजानें व सुगंधानें मला वेडें केलें इतकें कीं त्यांच्यामागून आपण जावें असें मला वाटलें. त्यांच्यामागें गेलों असतों तर त्यांच्या रीतीभाती, पूजा करण्याची रीती पूजेचा संकल्प व मंत्र हीं समजलीं असतीं, पण वेळच नव्हता. मी कितो उशीर तरी तेथें उभा होतों, अखेर ती मिरवणूक दिसेनाशी झाल्यावर परत चालूं लागलों. हा कोणी उमराव आहे असें मला कुलीनें सांगितलें. याचा व त्या बरोबरच्या मंडळीचा पोपाख हिंदुस्थानी रिवाजाचा अगदीं साधा होता; एक धोतर नेसूं होतें व एक पांघरलेलें होतें. डोक्याचे केस राखलेले होते व तें उघडें होतें. यापुढें लवकरच एक बडा गांव लागला. गांवचे रस्ते अरुंद होते, पण काशीप्रमाणें दगडी होते. घरें मात्र दुमजली मोठीं होतीं पण तीं जुनीं होतीं; नवें घर त्यांत एकही नव्हतें. त्याच गांवांत हें दत्ताचें देऊळ होतें.

त्या दिवशीं दत्तदर्शनाकरितां बरीच यात्रा आली होती. देवळाच्या पुढें गरुडस्तंभ होता; एक मोठा उंच खांब असून त्यावर गरुडाची देवाला हात जोडलेली व पंख पसरलेली मूर्ती होती. थोडी गर्दी कमी झाल्यावर मी देवदर्शन घेतलें. देऊळ साधें पण उंच जोत्याचें होतें, मूर्तीला एकच तोंड व दोनच हात होते. मी विचारलें ही मूर्ती कोणाची? तर दत्ताची. मग हिला तीन तोंडें नाहींत तीं? तर हें आद्यस्वरूप आहे असें पुजाऱ्यानें उत्तर दिलें! याला दत्त मानीत असावेत

एवढेंच, बाकी नेपाळांत दत्ताला मानीत नाहींत. नंतर मी दुसऱ्या देवतांचें दर्शन घेऊन परत आलों. नेपाळचीं शहरें, खेडीं, लोकांची राहणी व धर्मसमजुती कळाव्या व हिमालयाचें थोडें प्रशस्त स्वरूप समजावें हाच या यात्रेचा उद्देश दिसला आणि म्हणूनच हें दर्शन झाल्याशिवाय श्रीपशुपतीश्वराची यात्रा सफळ नाहीं असें म्हटलें असावें. ही यात्रा सहा मैल लांब आहे म्हणून आमची मंडळी गेली नाहीं. तसेंच यापुढची हिमालयांतील मुक्तिनाथ व दामोदर कुंड यांची यात्रा करावयाची परंतु ती येथून १०० शंभर मैल आहे ! व जाण्याचीं साधनें, सडका, चट्ट्या चांगल्या नसून कडक थंडी आहे. जास्त राहण्याला सरकारची परवानगीही नाहीं. केवळ गोसावी होऊन ही यात्रा करावी लागते सबब सोडून देणें भाग पडलें. दामोदर कुंडांत शंख, गोगलगाईसारखे जिवंत शालिग्राम सांपडतात. या दामोदर कुंडांतून गंडकीचा उगम असून येथेंच भारतांतील 'गजेंद्रमोक्ष' झाला, म्हणूनच तेथील शालिग्रामशिला विष्णुस्वरूपी मानून वंदनीय व पूज्य झाली आहे. शालिग्रामाला भोंक असतें; त्यांत जीव असतो, तो मरून गेला तरी शंखाची जशी पूजा करतात तशी त्याचीही करितात. या दामोदरकुंडाच्या यात्रेमुळें सर्व हिमालयाची मुख्य ऊर्फ मधली रुंदी २०० मैल पाहिली जाऊन त्यांतील हवा, पाणी, पशु, पक्षी व सृष्टिकार्यें दृष्टीस पडतात व सर्व हिमालयाचें स्वरूप कळतें.

याप्रमाणें रोज आसपासचा सर्व प्रदेश पाहिल्यावर दुसरे दिवशीं म्हणजे आल्यापासून पांचवे दिवशीं आम्हीं निघालों तों यात्रेच्या छतांशासुद्धां लोक राहिले नव्हते ! परत जातांना रस्ता परिचयाचा होता तरी एक दोन ठिकाणीं विशेषतः कोरड्या नदीच्या रस्त्यावर मंडळीचे फार हाल झाले, कारण ती चाल आम्हीं भैसापासून भीक्षाथोरीपर्यंत बावीस मैलांची केली ! बावीस मैल म्हणजे फारसे जास्त

नाहीं, पण ऊन झालें, मार्ग दगडाळ, पाणी कोठेंही मिळेना. सबब यापुढें येणारानें हेटोडा येथें मुक्काम करून हा मार्ग सकाळीं किंवा जेऊन दुपारीं दोन वाजतां क्रमण्याची व्यवस्था ठेवावी, जेवल्याशिवाय निघूं नये. याप्रमाणें चालून शेवटीं आम्हीं रक्सौलला येऊन गाडींत बसलों. रक्सौल स्टेशनवर आल्यावर तेथें बडोद्याच्या राजघराण्यांतील पुरुषाचें मला दर्शन झालें ! मला पाहून ते एकदम मराठींतच बोलूं लागले. मराठींत बोलणारे हे कोण थोर गृहस्थ असावे याचा मला विचार पडला. मग त्यांचें व माझें मनमोकळेपणानें भाषण झालें. प्रवासांत थोर माणसें आपला मोठेपणा बाजूला ठेवितात. हे माझ्यासारखे यात्रेकरू नसून नेपाळच्या राजाचे पाहुणे होते; अर्थात् राजाच्या मोटारींतून त्यांचा प्रवास झाला ! बडोद्याच्या राज्यांतील महाराजांची विद्येची आवड, विद्वानांस आश्रय व प्रजाप्रेम याविषयीं आमचें प्रशस्तपणें भाषण होऊन ते आपल्या सेकंड क्लासच्या रिझर्व्ह डब्यांत बसले व मी शेवटला नमस्कार करून मी आपल्या डब्यांत बसलों. येतांना सर्व यात्रेचीं ठिकाणें मोडकळलेलीं व ओसाड अशीं दिसत गेलीं. येतांना गोरखपूर हरीहरवरून येण्याचा बेत होता, पण गंडकीचा पूल अद्याप दुरुस्त न झाल्यामुळें आम्हीं फिरून मुझफरपूरवरूनच आलों. येतांना आम्हांला रिझर्व्ह डबा मिळाला नाहीं, पण मंडळीला अदल घडल्यामुळें ती अगदीं व्यवस्थित होती. मी बहुतेक त्यांना बायकांच्या डब्यांतच बसवीत असे व मी दुसरे डब्यांत बसे. ज्या ठिकाणीं गाडी बदलावी लागे त्याच्या आदल्या स्टेशनवर मी त्यांस पुढील स्टेशन उतरावयाचें आहे असा इषारा देऊन ठेवी. यामुळें जो तो आपलें गाठोडें घेऊन तयार असे. तरी वाटेंत सोनीपूर जंक्शनवर आमची गाडी लेट आल्यामुळें काशीची गाडी चुकली; पण त्यामुळें आम्हांला तेथील गंडकीचें स्नान व हरिहरेश्वराचें दर्शन

ही यात्रा अनायासें झाली. गोरखपूर येथें मच्छींद्रनाथ व गोरखनाथ या महात्म्यांचे पवित्र आश्रम आहेत. इकडून जाणारानें ते अवश्य पहावे. आतां मच्छींद्रनाथ व गोरखनाथ यांचीं दर्शनें राहिलीं पण त्यास इलाज नाहीं. याच बाजूला जनकपूर आहे. हेंही रामायणांतील प्रख्यात स्थान आहे, तेंही अवश्य पहावें. येथें सीतेच्या विवाहासंबंधीं झालेल्या पणाची जागा, रामानें धनुर्भंग केलेलें ठिकाण व त्या वेळीं रावणाची झालेली फजिती हीं मुख्य आहेत या वेळीं त्या ठिकाणीं जगांतील प्रख्यात राजे रावणासुद्धां पणाला आलेले होते. कुरुक्षेत्र पाहिलें असतां भारतीय युद्धाचा साक्षात्कार होतो तसा हें ठिकाण पाहिल्यानें रामायणाचा होतो.

श्रीपशुपतिनाथ हें नेपाळच्या राजाचें एक वैभवस्थान आहे. येथील नाण्यावर व राजकीय शिक्यावर कोणाचाही मुखवटा नसतो. येथील राजचिन्ह पशुपतिनाथाचेंच आहे. येथील देवळाला संस्थानांतून एक लक्ष रुपयांचें उत्पन्न तोडून दिलें आहे. पुजारी, वाजंत्री, फुलारी, गंध उगाळणारा, पाणी भरणारा, पहारा करणारा, झाडणारा, शिपाई प्यादे वगैरे कामें करणाऱ्यांस पगार नसून जमिनी दिल्या आहेत; त्या बहुतेक भाताच्याच आहेत. त्यांचें उत्पन्न ५ मणापासून ३० मणापर्यंत जसा नोकर तसें असतें.आणि ५५ते६० मणपर्यंत इतर पुजाऱ्यांपैकीं प्रत्येकास व मुख्य पुजाऱ्यास ३०० मण उत्पन्नाची २८४ एकर जमीन दिलेली आहे. मुख्य पुजाऱ्याला श्रीरामवल असें म्हणतात, कोणी राऊळ म्हणतात. देवळासंबंधानें याचा अधिकार फार मोठा आहे. मंदिराकडे एकंदर ८० नोकर आहेत. त्यांवर व त्यांचे कामावर नजर ठेवणें, देवळाचे दुसऱ्या मजल्यावर देवाचे २५।३० हजारांचे सोन्याचे दागिने, चांदी सोन्याचीं भांडीं व उंचा वस्त्रप्रावर्ण असून भंडाऱ्यांत लाखों रुपयांचा ऐवज आहे. अगदीं बिकट प्रसंगाशिवाय

याचा कधीं उपयोग करीत नाहींत, व केला तरी सवड होतांच पुन्हां परत कोठींत आणून टाकतात. या सर्वांवर मुख्य पुजाऱ्याची देखरेख आहे. दुसऱ्या मजल्यावर हा अधिकारी नसतां झाडलोट करण्याचाही कोणास हुकूम नाहीं. मुख्य पुजाऱ्याचा अधिकार नीट चालावा म्हणून त्याला आपल्या अधिकारांत नोकरांस ५०रुपये दंड व १५ दिवसांची शिक्षा करण्याचा अधिकार दिला आहे! देवळाचे उत्पन्नाचें एक ज़ंगल आहे, त्याचें कराचें उत्पन्न व यात्रा पर्वणीचे वेळीं जीं दुकानें घालतात त्यांचें उत्पन्न हें देवस्थान कमिटीकडे जमा होतें. सुमारें ८।१० दिवसांनीं मुख्य पुजाऱ्यास मुख्य प्रधानाकडे देवळाच्या व्यवस्थेची हकीगत सांगण्याकरितां जावें लागतें; तसेंच महिन्यांतून एकदां तरी अधिराजाकडे चंदन, तीर्थ व प्रसाद घेऊन जावें लागतें.

दर महिन्याच्या दोन्ही एकादशा, प्रदोष, पौर्णिमा, शिवरात्र व इतर पर्वण्या व सणवार ह्या दिवशीं देवाची पूजा, व उत्साह मोठ्या थाटाचा होतो. दररोज बालभोगाकरितां शिरा, एतद्देशीय ब्राह्मण करितात. महानैवेद्यास रोज १२ शेर तांदूळ, १॥ शेर मुगाची डाळ, २ शेर खिरीस दूध, १॥ पाव तूप व एक पाव साखर लागते. ही साखर येथें उत्पन्न केलेली असते. रोज रुद्राची एकादशणी करून पंचामृती पूजा करून पूर्णकलश झाल्यावर बालभोग व महाभोग यथाकाळीं अर्पण करितात. दर पौर्णिमेस नित्यनैमित्तिक पूजेनंतर सरकारी प्रदोष पूजा होते. तिचा आरंभ संध्याकाळीं ४-४॥ वाजल्यापासून होतो व ती ८-८॥ वाजेपर्यंत चालते. यावेळीं पंचामृतें प्रत्येकीं ८० शेर असतात! यांपैकीं तूप व साखर पुजारी घेतात, बाकी वाजंत्री, गुरव वगैरेंस मिळतें. हे वाजंत्री जुन्या पद्धतीचे वाजविणारे आहेत. महाभोग सहा पोतीं तांदुळाचा असतो व भाज्या, चटण्या, पापड वगैरे

मिळून ८४ जातीचे पदार्थ असतात. हा भोग येथील नेपाळी ब्राह्मण क्षौर करून व धुपट वस्त्र नेसून करतात व तो कुचले ह्मणजे बाजंत्री लोक वाटून घेतात. याच मंदिराचे आवारांत भैरवनाथाचे रात्रीचे महा-पूजेनंतर त्यास रेडा, मेंढा, बोकड, बदक, व कोंबडा असें पांचांचें बलिदान होतें. वर्षांतून दोन वेळां धनुर्मास करितात, त्यावेळीं पुजाऱ्यांस रात्रौ एक वाजल्यापासून पूजेला आरंभ करून ती पूजा सूर्योदयाचे आधीं संपवून खिचडीचा असाच महानैवेद्य अर्पण करावा लागतो. मग त्या दिवशीं मात्र संध्याकाळपर्यंत पुजाऱ्यांस सुटी असते; नाहीं तर रोज सकाळचे ८ वाजेपासून संध्याकाळीं ३ वाजेपर्यंत काम चालतें; मग यापुढें पुजाऱ्याचें जेवण! सारांश यात्रा नसली तरी श्रीपशुपतिनाथाची 'नित्यश्रीर्नित्यमंगलम्!' सुरु आहेच.

## सामाजिक माहिती.

नेपाळांत ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा चातुर्वर्णाची प्रजा आहे, व त्यांचीं धर्मबंधनें प्राचीन पद्धतीचीं आहेत! म्हणजे ब्राम्हण इतर खालचे वर्णाचे स्त्रीशीं लग्न लावितो याप्रमाणें क्षत्रिय, वैश्य व शूद्रांचे स्त्रीशीं विवाह करितो याप्रमाणें अनुलोम विवाह अद्याप चालतात. मात्र अशा रीतीनें विवाह झाल्यास नवरा बायकोचे हातचें खात नाहीं! स्वजातीय बायको असली म्हणजे मात्र तिच्या हातचें चालतें. श्रीमंत व मध्यम वर्गांचा आहार भात, वरण, भाजी हा आहे. येथें चातुर्वर्ण्यांत परस्परांत स्त्रियासुद्धां विटाळ मानीत नाहींत. विटाळ फक्त परधर्मीयांचा! त्यांत मुसलमानांचा फार, ख्रिश्चियनाशीं नुसतें शेकहँड केलें तरी वस्त्रांतर करावें लागतें. अंत्यजाचा विटाळ झाल्यास जानवेंही बदलावें लागतें! इतकें अस्पृश्यत्व आहे. नेपाळी ब्राम्हण बकरा, मेंढा, हरिण व मासे खातात पण कांदा लसूण मात्र निषिद्ध मानितात. व अंडीं खात नाहींत. पुनर्विवाहाची चाल आहे, केशव-

पनाची नाहीं. अनेक बायका करण्याची चाल आहे, अनेक पतित्व नाहीं. येथील ब्राम्हण मांसाहारी आहेत तरी त्यांचा सोंवळ्या ओंवळ्याचा प्रकार जरा चमत्कारिक आहे. यांचा स्वयंपाक करण्याचा चौका आहे त्यांत स्वयंपाक होतो. बाहेरून कोणीही कसाही पदार्थ दिला तरी चालतो; पण त्यानें चौक्यांत येतां कामा नये आल्यास सर्व स्वयंपाक बाटतो. एकदां चौक्यांतून निघाल्यास आंत जाण्यास पुन्हां स्नान करावें लागतें!! धर्मांतर करणारास व करविणारास कडक शासन आहे. न्यायाची पद्धतीही पूर्वीची आहे म्हणजे प्रत्यक्ष वादी प्रतिवादीचें म्हणणें ऐकून घेऊन त्याचा न्याय न्यायाधीश आपले अकलेनें करितो; वकील, बॅरिस्टर नाहींत व खरे खोटे साक्षीदार करून खटला बनावट करूं देत नाहींत; मात्र अधिकाऱ्यांस सवड होईपर्यंत दोघांस बंदींत राहावें लागतें !!

येथें आणखी एक चमत्कारिक प्रकार आहे. आपली मुलगी किंवा कोणतीही दासी सावकाराकडे गहाण ठेवून पैसा उसनवार काढतां येतो. तिच्या चाकरीनें पैसा फिटला म्हणजे ती घरीं येते. तेथें 'एका जातीच्या' लोकांच्या मुलींची तर कायमची खरेदी विक्रीही होते ! १०० ते २०० रुपयेपर्यंत त्यांच्या रूपगुणांवर त्यांची खरेदी विक्री होते व १० ते ५० पर्यंत गहाणवट चालते ! अर्थात् व्यभिचाराचा दोष मानीत नाहींत !! देवाधर्माविषयीं त्यांच्यांत फार श्रद्धा आहे. हिमालयाच्या दोन्ही रांगांमध्यें हा प्रदेश असल्यामुळें अवर्षणाची धास्ती नसते, यामुळें दुष्काळ पडत नाहीं. प्रापंचिक वस्तु सुलभ मिळतात. अर्थात् खून, मारामाऱ्या यांचीं कारणें अनायासें नाहींशीं झाल्यामुळें हे प्रकार सहसा होत नाहींत.

## धंदे, कलाकौशल्य व सुधारणा.

येथील लोकांचा मुख्य धंदा शेती, मजुरी व मेंढ्या पाळणें. मेंढ्यांपासून लोंकर काढून त्यापासून घोंगड्या, धाबळ्या वगैरे जाडेंभरडें लोकरीचें कापड थंडीच्या निवारणार्थ करणें हा आहे. गोरसाची उत्पत्ती स्थानिक आहे व्यापारोपयोगी नाहीं. येथें माकड, गाई, बैल यांस ठार मारावयाचें नाहीं असा कायदा आहे. येथील दगड व लांकूड यांजवरचें कोरींव काम प्रेक्षणीय असतें, व तें घरोघरीं थोडेंबहुत दृष्टीस पडतें. देवळांवर लांकडाच्या मूर्ती सुबक कोरलेल्या दिसतात. येथें रुद्राक्षांचीं मोठमोठीं झाडें आहेत, हीं जांभळीसारखीं असतात व पानेंही तशींच असतात. फळाची साल काढली म्हणजे आंतून रुद्राक्ष निघतो. पंचमुखी रुद्राक्ष पुष्कळ, एकमुखी रुद्राक्ष, दोनमुखी व गौरीशंकर म्हणजे जोड रुद्राक्ष क्वचित् सांपडतात. एकमुखी रुद्राक्षावर सरकारचा हक्क आहे असें म्हणतात. हे फळांतून बाहेर काढून मग भोंकें पाडून काशीस वगैरे इतर ठिकाणीं विकावयास पाठवितात. याच्या रुद्राक्ष व भद्राक्ष अशा दोन जाती आहेत. यांच्या लहानपणावर त्यांची किंमत आहे. येथील रुद्राक्ष देशी असल्यामुळें अवश्य घ्यावे. येथें मोठे कारखाने नाहींत पण उंसाचा गूळ, साखर, बांगड्याही येथेंच पैदा होतात. नेपाळांत एका प्रकारच्या झाडाच्या सालींच्या रंध्यापासून कागद करितात, तो फार पातळ असतो; शाईनें लिहिलें कीं मागें फुटतें पण तो अत्यंत चिवट असतो; कितीही चुरला किंवा फडक्यासारखी गांठ मारली तरी फाटत नाहीं, गांठ सोडली कीं पुन्हां साफ होतो पण त्यास आगीचा स्पर्श झाल्याबरोबर सर्व कागद जळून खाक होतो ! ! याशिवाय टांकसाळ, बंदुक व तिची दारू, यांचे सरकारी कारखाने प्रमुख आहेत. नेपाळांतून कस्तुरी, रुद्राक्ष, कापडी बूट, कागदांचीं फुलें, पोंवळीं, कुकरी,

चाकू व तेथील धोंगड्या हीं आणण्यालायक असतात. येथें अशा वस्तु उत्पन्न होतात, पण परदेशीं पाठविण्यासारखा पुरवठा नसतो. शिक्षण नाहीं तरी आतां कांहीं थोड्या शाळा, हायस्कूलें व कॉलेज हीं निघालीं आहेत; दवाखानाही स्थापन झाला आहे. त्यांवर शिक्षक व अधिकारी बंगाली आहेत. एक बिजलीचें पॉवर हौस आहे, त्यावर पंजाबी नोकर आहेत. हल्लीं जें रेल्वेचें काम चालू आहे, त्यांत ख्रिश्चियनही इंजिनियर आहेत. नेपाळांतून परदेशांत जाण्यासारखें कांहीं नाहीं. परदेशांतून नेपाळांत मात्र विलायती चिजासुद्धां थोड्या फार प्रमाणांत सर्व जातात! आगपेट्या, कापड व घासलेट मात्र फार जातें, आणि हें सर्व मजुरांच्या पाठीवर न्यावें लागतें!! याशिवाय दुसरी कसलीही सुधारणा नाहीं.

## पौराणिक, ऐतिहासिक व राजकीय माहिती.

आधीं हिमालय उंच व त्या पलीकडे तिबेट म्हणजे फार उंच असा समज म्हणून त्यास स्वर्गद्वार, मोक्षद्वार, त्रिविष्टप अशीं स्वर्गवाचक नांवें पुराणांत दिलीं; त्यापैकीं त्रिविष्टप याचाच अपभ्रंश तिबेट आहे. आपल्या पौराणिक ग्रंथांत यक्ष, गंधर्व, किन्नर, भूत वगैरे देवयोनीविशेष सांगितले असून ते मोठे सामर्थ्यवान, सुंदर व विलासी आहेत अशीं वर्णनें आहेत. भारतीय योद्धे कौरवपांडव यांचीही त्यांशीं युद्धें झालीं आहेत. चित्ररथ गंधर्वाची हकिकत प्रसिद्धच आहे. हें सर्व वर्णन नेपाळी लोकांस त्यांच्या कृतीवरून अद्याप पूर्ण लागू पडतें, हें मागील वर्णनावरून ध्यानांत येईल. भूते हे भूतानकडचे राहणारे. नेपाळांत व भूतानांत अद्यापही श्रीमंत, राजेरजवाडे व सरदार यांच्या मुलींस नृत्य, गायन, चित्रकला शिकविण्याची चाल आहे. भूते लोकांच्या व यक्षगंधर्वांच्या चालीरीती विशेष चमत्कारिक म्हणून त्यांस देवयोनीविशेष म्हणतात. ह्या नेपाळ देशाचे घोग्रा ऊर्फ शरयू, गंडकी

व कुशी अशा मोठ्या नद्यांनीं मुख्य तीन भाग झाले आहेत. नेपाळचें क्षेत्रफळ चौपन्न हजार चौरस मैल आहे व लोकसंख्या सुमारें साठ लक्षपर्यंत आहे. त्यांत निरनिराळे वंश राज्य करीत होते. त्यांच्या राजधान्या, कीर्तिपूर, पाटण व भाटगांव ह्या होत्या; ह्या सर्वांवर नेवारी वंशाची सत्ता होती. त्या वेळीं मागें सांगितलेलीं तटबंदीचीं शहरें असून जाण्यायेण्यास मोठमोठ्या वेशी राखल्या होत्या. ते सर्व वंश जंगबहादूर यानें १५० वर्षांपूर्वीं नाहींसे करून सर्व नेपाळचें एक राज्य केलें आहे; व पूर्वींच्या राजधान्या हीं मुख्य कारभाराचीं ठिकाणें करून त्यांचे राजवाडे ह्या सरकारी कचेऱ्या झाल्या आहेत, व त्या राजवंशास सरदार जहागिरदार केलें आहे. हल्लीं येथें जो राजवंश आहे तो नांवाचा आहे, यांना तीन सरकार म्हणतात. यांस रोजच्या खर्चासाठीं ५०० रुपये मिळतात; व सर्व सत्ता मुख्य प्रधानाचे हातीं आहे यांस पंचसरकार म्हणतात. हा अधिकार आपलेकडील पेशव्यांप्रमाणें वंशपरंपरेनें असतो. हल्लींचे प्राइम मिनिस्टर उर्फ मुख्य प्रधान चंद्रसमशेर जंगबहादूर हे आहेत. त्यांस पुष्कळ पदव्या व किताब आहेत. हल्लीं हे आपल्या राज्याचा चांगली सुधारणा करीत आहेत. ह्यांनीं हल्लीं गुलामगिरीची पद्धत बंद करण्याचा कायदा करून जुने गुलाम त्यांचे धन्यांस पैसे भरून सोडवीत आहेत; यामुळें संस्थानास फार खर्च येत आहे.

## उपसंहार.

श्रीपशुपतिनाथाची यात्रा ही मुख्य यात्रा नव्हे, उपयात्रा आहे. याची मुख्य पौराणिक यात्रा केदारनाथ व तिची उपयात्रा ही आहे ही यात्रा प्रथम पांडवश्रेष्ठ अर्जुनानें केली व त्याला तपापासून पाशुपत अस्त्र प्राप्त होऊन त्यानें भारतीय युद्ध जिंकिलें. म्हणजे येथील तपश्च-

येनें मनुष्याला असामान्य सामर्थ्य प्राप्त होतें याचें उदाहरण गुरखे लोकांचें दिसतच आहे.

श्रीपशुपतिनाथ हें महेश्वराचें शिर व केदारनाथ हा शरीराचा इतर भाग म्हणजे धडासारखा आहे. म्हणजे हिमालयाचा एवढा भाग श्रीमाहेश्वराच्या विराट स्वरूपाचा मुख्य भाग *मानला आहे असें दिसतें. यापेक्षां एवरेस्त ( गौरीशंकर ) हें त्याचें शिर असें सांगितलें असतें, तर विराट स्वरूपाला विशेष शोभण्यासारखें झालें असतें. कारण याच्याइतकें श्रेष्ठ डोकें ह्या पृथ्वीतलावर नाहींच; पण गौरीशंकर हा प्रदेश दुर्गम आहे, म्हणून त्याच्या पायथ्यानजीकच्या प्रांताची ही यात्रा सांगितली आहे; व ही यात्रा केल्याशिवाय श्रीकेदारेश्वराची यात्रा सफल नाहीं असें बजावलें आहे. याचें कारण ही यात्रा झाल्याशिवाय हिमालयाचें सामान्य स्वरूप व आर्यांचें वसतिस्थान समजणार नाहीं. आर्यांचें माहेरघर कसें होतें, जुन्या चालीरीती कशा होत्या, त्या हल्लीं सुद्धां व्यवहारांत असतां त्यांचा शरीरावर, मनावर व समाजावर काय परिणाम होतो, आर्यधर्माचें मूळचें स्वरूप काय होतें व त्याचें पुढें कसें रूपांतर झालें हें नेपाळी लोकांच्या हल्लींच्या राहणीवरून सुद्धां समजतें. म्हणजे ब्राह्मणांनीं इतर त्रैवर्णिकांशीं लग्न करणें, त्यांनीं हरीण, बकरा व मेंढा यांचें मांस व मासे खाणें, बकऱ्यामेंढ्यांचे कळप पाळणें वगैरे हल्लींच्या त्यांच्या रूढ गोष्टींवरून ते आर्यांचे खरे वंशज आहेत यांत शंका नाहीं. गौतमबुद्ध याच प्रांतांत जन्मला तरी बुद्धधर्मीयांचा पगडा येथें आहाराविहारांत सुद्धां फारसा बसला नाहीं. असें दिसतें. नेपाळांत आहार तांदुळांचा आहे, तांदुळ खाणारे लोक फोपशे व निरुपयोगी असतात हा लोकांत असलेला समज या यात्रेनें दूर होतो. केवळ भात खाऊन ताकदवान् व काटक झालेले लोक नेपाळी गुर-

* किंवा आर्यवस्तीचा श्रेष्ठतम भाग.

त्यांसारखे जगांत कोठेंही नसतील. आर्यभूमातेनें हे आपले सत्पुत्र प्रसंगीं आपली लज्जा राखण्यास उपयोगीं पडावे म्हणूनच एका बाजूला राखून ठेविले असावे असें दिसतें. आणि खरोखर विचार केला असतां तसा प्रसंग येईल तेव्हां हे लोक जसे तिच्या उपयोगीं पडतील तसे इंग्रजी बी. ए, किंवा अलीकडील विद्वान् खचित उपयोगीं पडणार नाहींत. विद्वानांचें हें काम नाहीं. त्यांत हल्लींच्या विद्येनें व सुधारणेनें मनुष्याला तेजशून्य असें नपुंसकत्व मात्र येतें हें सर्व या यात्रेवरून लक्षांत येतें. आर्यांचें मूळचें वसतिस्थान उत्तरध्रुव असें वेदांवरून लोकमान्य टिळकांनीं सिद्ध केलें आहे. उत्तर ध्रुवावर हे केव्हां, कोठून आले, किंवा तेथेंच उत्पन्न झाले याचा अद्याप पत्ता नाहीं. पण इतकी गोष्ट खरी कीं ध्रुवावर असतां वेदरचना झाली असावी. त्यानंतर त्यांनीं तिबेटांत बरेच दिवस वस्ती केली. तेथील मानस सरोवर व कैलास पर्वत यांचें सृष्टिसौंदर्य अप्रतिम वाटून त्यांनीं त्यास त्रिविष्टप म्हणजे स्वर्ग असें नांव दिलें. व तेथील मंडळी तीच देव असें ठरवून त्यांचा हवाला मग पुराणांतून वारंवार दिला आहे. येथील राजा इंद्र याची राजधानी, सर्वांत उंच अशा पामीरच्या प्रदेशांत किंवा काश्मीरांत श्रीनगर येथें मानली असावी. इंद्राच्या दरबारांत व स्वर्गांत परोपरीच्या सुंदर अप्सरा असतात हें पौराणिक वर्णन हल्लींच्या काश्मिरासही लागू पडतें. कारण काश्मीर हें मनुष्याच्या सौंदर्याकरितां अद्यापही प्रसिद्धच आहे. याच्या उत्तरेस कैलास पर्वतावर शिवाचें वास्तव्य ठरवून त्या प्रदेशास कैलासपुरी हें नांव दिलें तसेंच बद्रिनारायणास विष्णुपुरी हें नांव दिलें. चिनई तार्तरी, स्वतंत्र तार्तरी येथील अडदांड लोकांनीं ( राक्षसांनीं ) त्या देवांवर स्वाऱ्या केल्या म्हणजे हे देव घाबरून इंद्राकडे शिवाकडे, व विष्णूकडे त्यांच्या नाशाच्या युक्तीकरितां जात असत, असें वारंवार वर्णन पुराणांत येतें, याच्याशीं

जुळतें, तार्तर लोकांच्या स्वाऱ्यांपासून उपद्रव होऊं नये म्हणून चिनी लोकांनीं चीनचा मोठा तट बांधिला हें प्रसिद्धच आहे. याच इंद्राच्या दरबारांत अर्जुन आला होता असें दिसतें, आणि हेंच संभाव्य आहे. आकाशांतला इंद्र ही काव्य कल्पना दिसते. नंतर तिबेटांतून हिमालयांत आल्यावर व्यासांनीं वेदाचे चार भाग केले व पुराणांची रचना केली. व त्यांत आर्यांचे म्हणजे देवांचे पराक्रम वर्णन करून तुम्हींही असेच युक्तीचे पराक्रम करीत जा नुसती अनार्यांसारखी दांडगाई करूं नका असें सांगितलें. पुराणें येथेंच रचलीं असें म्हणण्याचें कारण पौराणिक देवतांची उत्पत्ती येथूनच सांपडते, ती वेदांत नाहीं. यानंतर खालीं आल्यावर प्रथम रामायण व मग भारताची रचना झाली. यावेळीं आर्यांची रहदारी हिमालयाच्या पश्चिमेस कंदाहारपासून पूर्वेस जरासंधाचे मगध देशापर्यंत म्हणजे हल्लींच्या पाटणा शहरापर्यंत हिमालयाच्या कांठानेंच झाली होती. उत्तर ध्रुवावर, वीज, पाऊस, सूर्य, उषा ( प्रभात ), चंद्र वगैरे सृष्टि-कार्यांचाच वरचष्मा असल्यामुळें आर्यांनीं तीं दैवतें मानलीं. पुढें हि-मालयांत आल्यावर विष्णु व शिव हे सुखदुःखाचे अधिकारी देव मानले गेले; व त्यांचीं स्थानें कैलास बदरीनाथ झालीं. हिमालयांत आल्यावर आर्यांना वैभवाची गोडी लागली व त्यांना वैभव प्राप्त झालें म्हणून त्यांच्या देवता विष्णु व लक्ष्मी ह्या मानून त्यांची पूजा सुरू झाली व भागवत धर्माचा जारीनें प्रसार झाला. म्हणजे लोकांचें लक्ष वैभवाकडे जास्त लागलें. अर्थात् त्यामुळें वैभवाकरितां चढाओढ व भांडणांस सुरुवात झाली. व ते जसजसे दक्षिणेस गेले तसतसा लक्ष्मी व सरस्वतीमुळें त्यांच्या भांडणास ऊत येऊन वीरशैव व वीरवैष्णव हे पंथ उत्पन्न होऊन त्यांच्या झगड्याचा कळस झाला. तेव्हां त्याला कंटाळून व्यवहार सुखरूप व्हावा म्हणून दक्षिणेंत आल्यावर शिव व विष्णु यांना परब्रह्माचा म्हणजे

ॐकाराचा आधार घेऊन श्रीगजाननाची स्थापना केली, आणि ही देवता समुदायाची पोषण करणारी, सर्व भांडणें, तंटे व संकटें नाहींशीं करून एकी करणारी, ऋद्धि, बुद्धि, सिद्धि देणारी असें मानून शैव व वैष्णव यांनीं सुद्धां भांडण मोडून सर्व मंगल होण्याकरितां याला अनन्यभावानें भजावें म्हणून त्याला शिवाचा मुलगा व प्रत्यक्ष विष्णूचा चतुर्भुज सायुध अवतारच मानिला. व सर्व कार्यारंभीं याची स्थापना व पूजा करावी म्हणजे तीं कार्यें निर्विघ्न होतील, असा संकल्प केला. अर्थात् इतकी एकी झाली म्हणजे निर्विघ्न कार्य होणारच.

**विद्यारंभे विवाहेच प्रवेशे निर्गमे तथा ।**
**संग्रामे संकटे चैव विघ्नस्तस्य न जायते ॥**

अशी याची कामगिरी आहे. मग हा देव कोणाला आवडणार नाहीं ? याचा अनुभव पाहून दैत्यांनीं सुद्धां याची पूजा केली.

**पूजितो यः सुरासुरैः ।**
**सर्व विघ्नहरस्तस्मै श्रीगणाधिपतये नमः ॥**

अशी याची प्रार्थना आहे. यामुळें याला ऐहिक व पारलौकिक सुखाच्या भोक्त्यांनीं सुद्धां प्रेमानें वंदन केलें आहे. लोकमान्य टिळकांना सर्व समाजांत एकी करण्याकरितां याच देवतेची आवश्यकता भासून त्यांनीं सर्व सामुदायिक असे गजाननाचे उत्सव सुरू केले. आर्य लोक दक्षिणेंत आल्यावर हा देव उत्पन्न झाला असें म्हणण्याचें कारण अष्ट विनायकांचीं स्थानें उत्तर हिंदुस्थानांत नाहींत. यामुळें महायात्रांमध्यें यांची गणनाही करीत नाहींत. ह्या अष्ट विनायकांच्या उत्पत्तीच्या कथा अशाच पद्धतीच्या आहेत कीं, शिव व विष्णु यांना कार्यसिद्धींत यश येण्याकरितां त्यांनीं याची ठिक-

ठिकाणीं पूजा करून ते याला शरण गेले व कृतकार्य झाले. म्हणजे शिव व विष्णु यांच्या पुढची देवता ही झाली.

या देवांच्या एकीकरितां पुढें आणखी एका त्रिगुणात्मक अशा दत्ताची स्थापना झाली. याचीही उत्पत्ति पुढें चित्रकूटाजवळ अत्रि ऋषींच्या आश्रमांत झाली. त्याचें वर्णन तिसऱ्या भागांत येईलच. या भागामध्यें नेपाळांत दत्ताचें स्थान सांगितलें आहे. पण तें विष्णूचें देऊळ दिसतें. कारण उत्तरेस दत्ताचा महिमा कोठेंच नाहीं. अशा रीतीनें एकी होण्याकरितां व एका देवाचेंच भजन होण्याकरितां अनेक प्रयत्न झाले पण मनुष्य स्वभावाप्रमाणें एकीच्या ऐवजीं अनेक दैवतें व धर्मपंथ मात्र उत्पन्न झाले ! ते इतके कीं, त्या देवांची संख्या तेहतीस कोटी म्हणजे अनंत झाली ! ! पण सर्वांचे पूजेचे प्रारंभीं ' श्री परमेश्वरः प्रीत्यर्थम् अमुक इष्ट देवता पूजांच करिष्ये किंवा जपं करिष्ये ' असें म्हणून त्या देवतेची पूजा, प्रार्थना किंवा जप करितात. नंतर

**आकाशात् पतितम् तोयं यथा गच्छति सागरं ।**
**सर्वदेवनमस्कारः केशवं प्रतिगच्छति ॥ १ ॥**

असें म्हणतात. तसेंच पितरांची पूजा केली तरी

**सकल पितरस्वरूपी जनार्दन वासुदेवः प्रीयंतां नमम ।**

असें म्हणावें लागतें आणि अगदीं शेवटीं तर

**तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु ।**

हा एकीचा खूण मंत्र सर्वांनीं म्हटलाच पाहिजे. व तो सर्वांनीं मान्यही केला आहे. ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

आर्य तिबेटांत आले त्यावेळीं त्यांनीं शंकराची स्थापना कैलासावर, विष्णूची बदरिकाश्रमीं, इंद्राची काश्मिरांत श्रीनगर येथें, त्याच्या भोंवतीं त्याचें नंदनवन, शिवालिक पर्वताचे जवळ कुबेर, व मानस

सरोवरावर वरुण अशी देवांची स्थापना केली होती, व सर्व तिबेट-भर आर्य पसरले होते त्यांनाच पुढें पुराणांत देवत्व आलें. या देवांवर भोंवताळचे प्रांतांतील मांगोलियन, तार्तर, हूण वगैरे स्वतंत्र रहाणाऱ्या अनार्य लोकांनीं रात्रंदिवस अचानक व वारंवार स्वाऱ्या केल्या व आर्यांना ह्मणजे देवांना त्रासवून सोडलें. त्या स्वाऱ्यांचें रसभरीत वर्णन पुराणांतरीं आहेच. या अनार्यांनाच ते असीरिया वगैरे देशांतील ह्मणून असुर किंवा राक्षस म्हणत. यांच्यामध्यें चेंगिजखानासारखे काळपुरुष उत्पन्न झाले व त्यांचा छळ अनावर झाला ह्मणजे कांहीं तरी युक्ति योजण्याकरितां ते कैलासावर शंकराकडे किंवा बदरिकाश्रमीं विष्णूकडे अथवा काश्मिरांत इंद्राकडे मदत मागण्यास जात व कोठून तरी युक्ति निघून दैत्यांचा पराभव होई व संकट टळे. ह्याचें दिग्दर्शन मागें आलें आहे, शिवाय ह्या गोष्टी पुराणांतरीं प्रसिद्ध आहेत. त्या या ठिकाणीं पूर्णपणें जमतात. या तार्तर लोकांपासून आपणांस असा वारंवार उपद्रव होऊं नये म्हणून चिनी लोकांनीं आपले देशाभोंवतीं मोठा तट बांधिला आहे ही गोष्टहि मागें सांगितली आहे. चिनी लोकांनीं भित बांधून आपलें रक्षण केलें पण आर्यांना अखेर हा देश सोडून जावें लागलें. ते सिंधु व ब्रह्मपुत्राचे मार्गानें हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांना शांति मिळाली व त्यांच्यांत विद्या व कला यांचा उत्कर्ष झाला व त्यांचीं प्रदर्शनें इंद्राच्या दरबारांत भरूं लागलीं. यापुढें वायव्य प्रांताच्या खिंडींतून त्यांच्यावर टोळधाडीसारख्या स्वाऱ्या होतच असत. पण त्या कधीं काळीं होत असत. हल्लींसुद्धां इंग्रज सरकारास वायव्य प्रांताच्या आफ्रिडी लोकांच्या स्वाऱ्यांची धास्ती वाटतेच. व म्हणूनच आतां त्यांनीं त्या प्रांतांत रेल्वे रस्ता केला आहे. आर्य हिंदुस्थानांत आले तरी त्यांनीं तिबेटांत असतां जें सुख भोगिलें

त्याची त्यांना वारंवार आठवण होऊन त्यांनीं त्या गोष्टी आपल्या पुराणांत नमूद करून ठेवल्याच, आणि सांगितलें कीं, ज्याला सामर्थ्य असेल त्यांनीं फार प्रयत्न करून—तपश्चर्या करून—आर्यांची म्हणजे आपली ही पुण्यभूमी एकवार तरी पाहून येऊन स्वर्गसुखाचा आनंद उपभोगून आपल्या जन्माचें सार्थक करावें. म्हणून या प्रांतांत कैलास व मानस सरोवर यांच्या यात्रा ठेविल्या आहेत असें दिसतें.

अशा रीतीनें आर्य उत्तर ध्रुवावरून तिबेटाकडे आले. त्यांची उत्तर ध्रुवाची हकीकत वेदांतावरून व तिबेटची ऊर्फ त्रिविष्टपाची म्हणजे—स्वर्गाची—हकीकत मागें सांगितल्याप्रमाणें पुराणांमधून मिळते. ध्रुवापासून तिबेटचे मैदानावर पोंहोचेपर्यंत मधल्या प्रदेशाची हकीकत पुढील समुद्रमंथनाच्या श्लोकावरून दिसून येते.

**लक्ष्मीः कौस्तुभ पारिजातक सुरा धन्वंतरिश्चंद्रमाः**
**गावः कामदुहा सुरेश्वरगजो रंभादि देवांगनाः ।**
**अश्वः सप्तमुखा विषं हरिधनुः शंखोमृतम् चांबुधेः**
**रत्नानीह चतुर्दश प्रतिदिनं कुर्यात् सदा मंगलम् ॥ १ ॥**

ह्मणजे प्रत्येक दिवशीं व शुभ प्रसंगीं मंगलाकरितां हा श्लोक ह्मणत जावा असें ठरविलें आहे. प्रत्येक दिवशीं ह्मणण्याचें कारण यांत आर्यांच्या मूळ प्रगतीचा इतिहास आहे. हें समुद्रमंथन ह्मणजे गोबीच्या वाळवंटाच्या वाळूच्या समुद्राचें मंथन,—ह्मणजे त्यांतून केलेला प्रवास असा अर्थ दिसतो. दुसरा अर्थ संभवत नाहीं, आणि हा प्रवास देवांनीं दैत्यांच्या मदतीनें केला असा स्पष्ट उल्लेख पुराणांतरीं आहे. हे दैत्य ह्मणजे त्या वाळवंटांत राहणार अनार्य होत. ह्या वाळवंटांत एका पुरुषाची सत्ता होती. तो रंगानें काळा होता तरी तेजस्वी व मनामिळाऊ होता. त्यानें त्या वाळवंटाचे प्रदेशांतून जातांना

आर्यांना चांगली मदत केली. आर्यांनीं त्याला विष्णु असें अन्वर्थक नांव दिलें ( विष्=शिरणें या धातुपासून विष्णु शब्द साधला अर्थात् विष्णु ह्मणजे प्रवेश करून देणारा. ) व लक्ष्मी ह्मणजे सर्वांचें लक्ष आपल्याकडे लावून घेणारी अशी धनधान्य संपत्ति ही त्यानें दिली किंवा दाखविली ह्मणून लक्ष्मी ही त्याची बायको असें मानिलें. असा हा शांत व सत्वगुणी पाहून त्यांनीं याला आपला पुढारी केला. पुराणांत विष्णूचा मंथा किंवा घुसळण्याची रवी केली असें ह्मटलें आहे. अर्थ एकच. अशा रीतीनें तो त्यांच्या सर्वस्वी उपयोगी पडला, संकटांतून त्यांचें रक्षण केलें ह्मणून आर्यांनीं त्याला आपला देव मानिलें व ते त्याची स्तुती करूं लागले, व केव्हांही विशेष प्रसंगीं त्याची सल्ला घेऊं लागले. हा ह्या वाळवंटाच्या सप्तसमुद्रांत ह्मणजे वाळवंटाच्या पड्यांत राहतो अशीं याचीं पुराणांत वर्णनें आहेत. पुराणांत मंदराचलाचा दांडा केला असें ह्मटलें आहें तरी त्याला खालीं विष्णूचा आधार होताच ह्मणजे विष्णूच्या साह्यानेंच हें मंथन झालें. हा मंदराचल ह्मणजे बोलताग ध्यानशान पर्वत असावे, त्यांच्या भोंवतीं हे फिरले असा अर्थ. शेषाची दोरी केली होती ह्मणजे त्या त्या ठिकाणचे गरीब निरुपद्रवी लोकांची मदत विष्णूच्या सांगण्यावरून मिळाली. ह्या शेषावरच विष्णु निजतो ह्मणजे राज्य करितो असा अर्थ. ह्या सर्पाचें तोंड राक्षसांकडे होतें ह्मणजे त्यांची भाषा राक्षसांना समजे व शेंपूट देवांकडे होतें ह्मणजे ती त्यांची माहिती राक्षसांकडून देवांना समजे. असाच अर्थ जुळतो. सप्तसमुद्र ह्मणजे पाण्याचे समुद्र व त्यांतून हीं रत्नें निघालीं असा अर्थ कोठें जुळत नाहीं. ह्यानें त्या वाळवंटांतील सुपीक स्थळें पाण्याच्या जागा व उत्तम उष्ण हवेमुळें वस्तीस योग्य अशीं ठिकाणें दाखविलीं. ह्या प्रवासा-

मुळें आर्यांना वरील गोष्टींची माहिती झाली किंवा तीं रत्नें मिळालीं असें ह्मटलें आहे.

प्रथम त्यांस लक्ष्मी मिळाली. ह्मणजे धनधान्य पीकपाण्याची माहिती व जागा मिळ.ल्या त्यामुळें पुढें ते स्वतः तिबेटापासून शेती करूं लागले. पुढें कौस्तुभ रत्न ह्मणजे त्यांतील पर्वतांच्या खाणींची व रत्नांची माहिती मिळाली. पारिजातकासारखीं सुवासिक झाडें सांपडलीं. थंड प्रदेशांत झाडांस फुलें येतात, त्यांना निरनिराळ्या प्रकारचे रंग येतात, पण वास नसतो तो वास उष्ण व समशीतोष्ण प्रदेशांतील फुलांस त्यांना प्रथम आढळला. ह्या उष्ण व समशीतोष्ण प्रदेशांत हिंडतांना श्रम होऊन थकवा येऊं नये ह्मणून अनार्यांनीं त्यांना दारूची कृति व तिचा उपयोग समजावून दिला. ह्या दारूच्या सेवनानें उष्णता व थंडी बाधत नाहीं, श्रम परिहार होतो, असें आर्यांना समजल्यावर त्यांनीं तिची रत्नांत गणना केली. पण हिच्या अति सेवनानें मनुष्य झिंगून बुद्धिभ्रष्ट होतो व अतींद्रिय वादाचे विचारास हिचा फार अडथळा होतो, ह्मणून पुढें ब्राह्मणांनीं ह्मणजे ऋषींनीं हिचा त्याग केला. पुढें उष्ण प्रदेशांत आल्यावर अनार्यांच्या सहवासानें त्यांच्या खाण्यांत चवी उत्पन्न झाल्या. अर्थात् रोगांचाही प्रादुर्भाव झाला व त्याला काय उपचार करावे याचें ज्ञान त्यांना धन्वंतरी रूपानें मिळालें. कडक थंडीमध्यें नानाप्रकारचीं अन्नें नाहींत, चवी नाहींत, अर्थात रोगही नाहींत! कुजण्याची क्रियाच नाहीं! यापुढें आल्यावर त्यांना चंद्रमा सांपडला, ह्मणजे दृष्टीस पडला. पूर्वी तो त्यांस दिसत नव्हता. कारण चंद्रसूर्याच्या कक्षेमध्यें पांच अंशाचा कोन आहे, आणि ध्रुव प्रदेशीं सूर्याचें भ्रमण क्षितिजाच्या आसपास थोडें खालवर होत असतें. ह्मणून त्यांच्या संधिप्रकाशांत तो दिसणें शक्य नव्हतें. पुढें पंचेचाळीस अंशाच्या सुमारास ते आले

तेव्हांच त्यांना त्याचें भ्रमण दिसलें. व प्रकाश दिसला हेंच खरें. यामुळें या मंथनांतून चंद्रमा उत्पन्न झाला असें त्यांनीं ह्मटलें. तसेंच पुढें त्यांना दुधाळ गाईसारखीं मनुष्याला उपयोगी पडणारीं जनावरें आढळलीं. तसेंच माणसाळण्यास योग्य अशीं हत्तीसारखीं अजस्त्र अशीं जनावरें दृष्टीस पडलीं. पुढें सर्वांना भोग्य अशा सुंदर स्त्रिया दृष्टीस पडल्या ह्या वेळीं आर्य काश्मिरापर्यंत ( हिमालयापर्यंत ) आले असावे असें दिसतें. पुढील उष्ण प्रदेशांत त्यांना घोड्यासारखीं सुंदर, बहुगुणी व अत्यंत उपयोगी अशीं जनावरें मिळालीं. ह्मणून घोड्याला त्यांनीं सप्तमुख ह्मणजे बहुगुणी असें ह्मटलें आहे. यापुढें आर्य व अनार्य यांमध्यें या रत्नांच्या वाटणीसंबंधानें लढा उपस्थित होऊन त्यांच्यांत भांडणाचें विष निर्माण झालें. तेव्हां अनार्यांच्या किंवा दैत्यांच्या नाशाकरितां त्यांनीं धनुष्यबाणाची युक्ति काढली. शंखासारखीं रणवाद्यें व विजयसूचक ध्वनि करणारीं साधनें त्यांनीं मिळविलीं व त्यांनीं दैत्यांवर विजय मिळविला. व हें सर्व एकीमुळें व जुटीमुळें मिळालें असें समजून तें ऐक्यरूपी अमृत सर्वांनीं प्राशन केलें. व ते अजरामर झाले ह्मणजे श्रेष्ठ होऊन त्यांना कोणापासून भीती राहिली नाहीं. ह्मणजे यापुढें आपणास जुटीनेंच वागलें पाहिजे तरच आपला दैत्यांपासून निभाव लागेल असें त्यांनीं ठरविलें.

अशा प्रकारें आर्यांची प्रगति उत्तर ध्रुवाकडून झाली. असा ह्यावरून इतिहास दिसतो. ते तिबेटांत आल्यावर कैलास व मानस सरोवराचे टापूंत त्यांनीं मागें सांगितल्याप्रमाणें फार दिवस वस्ती केली. निसर्गाच्या बहारीच्या सौंदर्यामुळें त्यांना तो प्रदेश अत्यंत आवडला. पण निरुपायानें त्यांनीं सिंधु व ब्रह्मपुत्र या नद्यांचे उगम व रस्ते शोधून काढून त्यांच्याच काठानें पुढें वस्ती करीत करीत ते हिंदुस्थानांत आले असा ऐतिहासिक व पौराणिक आधार मिळतो. तिबेटांत आल्यावर

उत्तम हवापाण्याच्या योगानें व बैल गाई इत्यादि माणसाळलेले उपयोगी पशु मिळाल्यामुळें त्यांनीं प्रथम शेती करण्यास आरंभ केला. आणि या शेतींत यश यावें म्हणून त्यांनीं कल्याण करणाऱ्या देवाची; म्हणजे शिवाची ऊर्फ शंकराची प्रथम स्थापना केली, ह्या देवाचा आकारही त्यांनीं नांगराप्रमाणें केला. शंकराच्या पिंडीचा आकार तसाच आहे. पाणी पडतें तो भाग नांगराच्या फाळासारखा आहे. या शंकराची बायको महाकाळी म्हणजे विस्तीर्ण काळी जमीन; तिलाच पार्वती म्हणजे हिमालय पर्वताचे जवळची सुपीक जमीन अशा अर्थानें हें नांव मिळालें आहे. हिचे (ह्याची अर्धांगी) सान्निध्या शिवाय त्याचें चालावयाचें नाहीं जमीन असल्या शिवाय नांगराचा उपयोग काय? काहीं नाहीं हल्लीं सुद्धां जमीन महावसूला काळीचा वसूलच म्हणतात. याचें वाहन वृषभ म्हणजे बैल हा नांगरण्याला अवश्य पाहिजेच. तसेंच हा देव स्मशानवासी म्हणजे गांवाबाहेर शेताजवळ राहणारा, याला भस्म म्हणजे मातीचें नेहमीं लेपन पाहिजे, नेसावयास लंगोटी शिवाय दुसरें वस्त्र नको, नग्नस्थिति सुद्धां चांगली. कारण शेतकऱ्याला माती चिखलांत राबावें लागतें मग कपडा असून उपयोग काय? कामें सुटसुटीतपणें कशीं होतील? याच्या डोक्यावर नेहमी गंगा ऊर्फ आकाशगंगा म्हणजे पाऊस पाहिजे तो असला म्हणजे हा नेहमीं प्रसन्न असतो, म्हणजे शेतीचीं कामें चालतात. कदाचित् पाऊस पडला नाहीं तरी याच्या डोक्यावर संतत धार धरलीच पाहिजे. म्हणजे शेतीला कालव्याच्या पाण्याचा तरी पुरवठा केला पाहिजे, तरच शेती होणार. अशा प्रकारें त्याचें अमंगल्यशील म्हणजे खताड्यांत राहण्याचा त्याचा स्वभाव असला तरी तोच पुढें धनधान्य व त्यायोगें तेजस्वी संतति देऊन खरें मंगल देणारा आहे. अशी त्यांची खातरी झाली.

अमंगल्यम् शीलं तव भवतुनामैवमखिलम्।
तथापि स्मर्तृणाम् वरद परमम् मंगलमासि ॥

अशीं त्याचीं ते स्तोत्रें गाऊं लागले, व सर्व लोक त्याच्या भजनीं लागले. त्यांनीं मेंढ्या व गुरें पाळून भटकण्याचा पूर्वीचा धंदा सोडून ते एका ठिकाणीं राहून शेती करूं लागले. पंजाबांत आल्यावर तर त्यांना पंचगंगा भेटल्या, जमीन सुपीक सांपडली, यामुळें शेतीला उत्तेजन येऊन नाना प्रकारच्या धनधान्यांनीं लोक श्रीमंत बनले, त्यांना वैभवाची चटक लागली, शहरें, बाजार निर्माण झाले, देवघेव व्यवहार सुरूं झाले. मग त्यांनीं मागल्या वैभवाची देवता विष्णु व त्याची बायको लक्ष्मी यांचें स्मरण राहण्याकरितां त्यांचे पुतळे उभारले व त्यांना सालंकार व वैभवसंपन्न केलें व त्यांची स्थापना बदरिकाश्रमीं केली व पूर्वीप्रमाणें कैलासास व सप्त वाळवंटांत राहणाऱ्या विष्णुकडे जाणें सोडून दिलें. त्यांनीं कैलासांतील शंकराची स्थापना केदारेश्वरीं केली व विष्णुची बदरिकाश्रमीं केली. पण केदारेश्वराचें दर्शन घेतल्याशिवाय बदरिनारायणाचें दर्शन घेऊं नये असें सांगितलें. याचें कारण मूळ शेती सोडूं नये. शेती धरून साधल्यास व्यापार करावा असें स्पष्ट दिसतें. अशा रीतीनें पुढें निरनिराळ्या उद्देशानें त्यांनीं निरनिराळे देव मानले. तरी खरें वैभव त्यांना शंकराकडून मिळालें म्हणून त्याला महादेव म्हणजे मोठा—आदिदेव—असें म्हणूं लागले. हा देव भोळा आहे म्हणजे याचे मदतीनें धनधान्य उत्पन्न होण्यास फारशी अक्कल लागत नाहीं हा थोड्या श्रमानें विपूल धान्य देतो अर्थात् पाहिजे तें देतो. पण विष्णू ही व्यापार देवता आहे अर्थात् व्यापारांत पैसा मिळविण्यास विशिष्ट प्रकारचें कौशल्य व

युक्ति लागते. खऱ्याखोऱ्याची जरूर पडते. म्हणूनच " उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ट नोकरी" म्हणजे ताबेदारी अथवा परस्वाधीन जिणें करणें हें त्यांनीं निंद्य मानिलें म्हणूनच त्यांच्यांत तशी म्हण पडली. हल्लीं व्यापारी राजे झाले व त्यांनीं धातूचें नाणें सर्वत्र मोठ्या प्रमाणांत खेळविलें, लोक मिजासी बनविले म्हणून शेतीकडे लोकांचें दुर्लक्ष झालें. तरी खरी लक्ष्मी तीच आहे असें दुष्काळ पडल्यावर त्यांचे लक्षांत आल्याशिवाय राहत नाहीं. मग पाऊस पाडण्याकरितां त्यांना शंकराच्या अनुष्ठानाकरितां धांव घ्यावीच लागते. शंकर भोळे असल्यामुळें ते कोणाचा फारसा अंत पहात नाहींत. तरी वेड्या हौसेच्या नादीं लागून मला विसरूं नका असें मधून जाणवतातच.

याप्रमाणें आर्यांच्या म्हणजे आमच्या पूर्वजांच्या किंवा सुशिक्षित जगाच्या पूर्वजांच्या प्रगतीची माहिती मला या यात्रेमुळें म्हणजे येथील स्थानें पाहून झाली किंवा माझ्या ती ध्यानांत आली असें म्हटलें तरी चालेल. ही यात्रा केली नसती तर ह्या गोष्टी समजल्या नसत्या, म्हणूनच श्रीपशुपतेश्वराची यात्रा केल्याशिवाय हिमालयांच्या यात्रांचें श्रेय मिळणार नाहीं असें पूर्वजांनीं लिहून ठेविलें. त्याचें हें प्रत्यंतर आलें. ज्याच्या कृपाप्रसादानें ही माझी यात्रा सफळ झाली त्याच्याच चरणीं ही अनन्यभावानें अर्पण करून मी आपल्या यात्रेचें मावंदें पुरें करितों. कारण त्याच्याच कृपा प्रसादानें मला हें ज्ञान प्राप्त झालें. नाहींतर माझी योग्यता कसली ?

**काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें ।**
**परि त्या विश्वंभरें बोलविलें ॥**


**हेंच खरें.**

---

# परिशिष्ट.


## श्रीपशुपति नाथाचे मार्गांतील मुख्यमुख्य स्थळें, त्यांचीं अंतरें, सोई वगैरे.

| ठिकाण | रक्सौल स्टेशनपासून | अंतर मैल | रस्त्याचा प्रकार व सोई. |
|---|---|---|---|
| वीरगंज | ,, | २ | पुळणीचा मार्ग, पास घेणें, कुली करणें. |
| परवाणूपूर | ,, | ८ | चांगली प्रशस्त सडक. |
| सिमराबसा | ,, | २० | सडक, पाण्याची पुष्करणी. |
| भिक्षाथोरी | ,, | २८ | मोठें जंगल, रस्ता वाळूंतून. |
| हेटोडा | ,, | ४० | त्रासदायक दगडाळ नदीमार्ग, |
| भैसा | ,, | ५० | सडक डोंगराचे पडदे. |
| भीमफेरी | ,, | ६० | ,, पास बदलणें, डाक्टर तपासणी. |
| मारकु | ,, | ६५ | सीसागढी चढून उतरणें, खडी चढण व उतरण शेंड्यावर पुन्हा पास बदलतात. |
| कुलेखानी | ,, | ७७ | वारंवार नद्या ओलांडाव्या लागतात. |
| चितलांग | ,, | ८५ | एकदंतागढी चढून जाणें, मार्ग वृक्षहीन. |
| थानकोट | ,, | ९० | चंद्रागढी चढून उतरणें खडी चढण व उतरण शेंड्यावरून हिमशृंगें दिसतात. |
| नेपाळ ऊर्फ काटमांडू शहर | ,, | ९७ | चांगली सडक, वृक्षहीन मार्ग. |
| पशुपतिनाथ | ,, | १०० | रस्तापुळण |
| दत्तस्थान | | १०६ | ,, |
| मुक्तीनाथ | ,, | १२६ | ,, सोई नाहींत. |
| गंडकी कुंड ( उगम ) | | १९० | ,, ,, |



हें पुस्तक वाचल्यानें यात्रेचें रहस्य समजेल

महाशिवरात्रीचा वाघमति-गंगेचा प्रातःकाळचा देखावा.




वर्णन ५९ पृष्ठ पहा.

तिसरा भाग दक्षिण हिंदुस्थानच्या यात्रेचा लवकरच प्रसिद्ध होईल